

# माणूस

बुधवार, ९ सप्टेंबर १९७० चाळीस पैसे



आपण आणि आपले काम
या वृत्तीने पन्नासहून अधिक वर्षं
पुस्तक–व्यवसायात रमलेले

**ग. रा. भटकळ**

बुधवार, ९ सप्टेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सोळावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ रोखलेल्या बंदुका उठलेली जनता ' ह्या लेख वाचला. मी सुद्धा तरुण आहे, येथील (बिहार, आसाम, आंध्र) जमीनदारी बघून, माझे सुद्धा रक्त तापले. याचा अर्थ असा नव्हे की गरीबी, दारिद्र्य घालविण्यासाठी नक्सलवाद उपयुक्त आहे. लेखकाने ज्या परिस्थितीत नक्सलवादाचे समर्थन केले ते योग्य नव्हे. यासाठी दुसरी अहिंसक पण क्रांतिकारक समर्थ उपाययोजना शक्य आहे.

२९ ऑगस्ट, १९७० — कैलासचंद्र मदान, बार्शी

◻ " रोखलेल्या बंदूका उठलेली जनता " ह्या लेखात राष्ट्राच्या खऱ्या चित्राचे एका भागाचे वर्णन वाचायला मिळाले. पोलिसी दहशत, वेगळी भाषा, अपरिचित मुलूख यातून कसाबसा मार्ग काढीत श्री. अनिल बर्वे यांनी आपली शोधयात्रा पुरी करून अशा वादग्रस्त, ज्वलंत विषयावर लिखाण लिहिल्याबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन. सदाशिव पेठकर ह्यांनी फार दिवसानंतर दिल्ली—दरबार भरविला. कळावे.

२८ ऑगस्ट, १९७० — राजेश्वर इतावे, पैठण

द्विसाप्ताहिक माणूस : १०२९ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी ' माणूस ' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# दुसरे पर्व....

जमीन कबजा आंदोलनाचे पहिले पर्व समाप्त झाले आहे. मोहिमेचे नेते हिशोबाचे ताळेबंद जमविण्यात गर्क आहेत—अमुक इतकी लाख एकर जमीन 'मुक्त' झाली, प्रश्नाची निकड शासनाला जाणवली वगैरे वगैरे. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्षाने आंदोलनाचे पुढचे पाऊल म्हणून निवडक खेड्यात जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची चळवळ सुरू करण्याचा मनोदयही जाहीर केलेला आहे. म्हणजे पहिल्या पर्वात ताबा घेतला गेला नाही, घेण्याची योजनाही नव्हती हे उघडच झाले. मग 'मुक्त' झाली म्हणजे काय ? ही आध्यात्मिक परिभाषा कशासाठी ? अजूनही या आंदोलनाचे पाय जमिनीवर टेकल्यासारखे त्यामुळे वाटत नाहीत. 'नळी फुंकिली सोनारे, इकडून गेले तिकडे वारे' अशी सर्व गत आहे. असे असताही नेते मंडळी आंदोलन यशस्वी झाल्याच्या समाधानात असतील, लोकांना तसे भासवीत असतील, तर तो एक अज्ञानाचा किंवा प्रचाराचा भाग म्हणून समजले पाहिजे. पक्ष म्हटल्यावर प्रचारालाही काही हरकत असू नये. पण प्रचाराच्या मुळाशी वस्तुस्थितीचा, सत्याचा थोडाफार तरी अंश असावा, सगळीच हवा नको, ही किमान अपेक्षा तरी पूर्ण व्हावी.

आंदोलनाचे दुसरे पर्व सुरू झाले, डाव्या पक्षांनी जोर लावला तर अशी शक्यता आहे, की कमाल जमीन धारणेची मर्यादा थोडीफार खाली येईल. पण याने कबजाचे मूळ उद्दिष्ट कितपत साध्य होणार हा खरा प्रश्न आहे. आजही बिहार, ओरिसा, आंध्र या राज्यांपेक्षा महाराष्ट्रात जमीनधारणेची मर्यादा कमीच आहे. तरीही मंत्री, वडे बागायतदार व सधन शेतकरी यांनी कायद्यातील पळवाटा हुडकून जास्त जमीन स्वत:कडे राखलीच आहे. उद्या ही मर्यादा आणखी दहा–पाच एकरांनी खाली आली तर या पळवाटा बुजतील याची शाश्वती काय ? दत्तक भाऊ, नातेवाईक, एकत्र कुटुंब, अनाथ विधवा, अज्ञान व्यक्ती हे राजरोस मार्ग तेव्हाही उपलब्ध असतीलच. कायदा आला, की पळवाटाही आल्याच. पळवाटा तेव्हाच अडवता येतात, रोखता येतात, जेव्हा स्थानिक लोकशक्ती जागृत असते, संघटित असते, वेडेवाकडे पाऊल टाकणाऱ्या शोषकाला ती वेळच्यावेळी, जेथल्या तिथे मना करू शकते. ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी लागतात. शहरातून चार दिवस पाहुण्यासारखे जाऊन काहीही साधता येत नाही. उलट अशा पाहुण्यांच्या मागोमाग आंदोलनात भाग घेतलेल्यांची गावात मागाहून फरपट होते. त्यांना खड्यासारखे वेगळे काढले जाते. सोसायटीची कर्जे, विहीरींसाठी तगाया इत्यादी साध्या गरजांबाबतही त्यांची अडवणूक होऊ

लागते. हे क्षणकालचे बंडखोर नाइलाजाने शेवटी शरणागती पत्करतात, चळवळ मार खाते, पुन्हा ती वर उचलणे कठीण होऊन बसते.

दोन महिन्यापूर्वी कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा महालात मी हिंडत होतो. एका डाव्या पक्षाच्या प्रेरणेनुसार या भागातील काही शेतकरी-शेतमजुरांनी जंगल जमिनी ताब्यात घेण्याची चळवळ सुरू केली. धरपकड झाली. पक्षाचे पुढारी कोल्हापुरात. कार्यकर्त्यांची साखळी नाही. चळवळ करणारे एकटे पडले. पोलिसी चक्रामुळे जेरीस आले. कोल्हापुरला जाऊन पुढाऱ्याकडे दाद मागितली. पुढारीच तो. त्याने सांगितले, 'एवढया थोडया लोकांकरता मी काही करू शकत नाही. तुम्ही सर्वांनी मिळून, मोठया संख्येने चळवळ सुरू करा. गावेच्या गावे उठली पाहिजेत. तर काही करण शक्य होईल.' अरे गृहस्था, तू कोल्हापूरात बिंदुचौकात फार तर उभा राहणार. गावेच्या गावे उठणार कशी? जे कुणी उठले आहेत त्यांना मदत कर. आपोआप इतर मागे येतील. चळवळीवर लोकांचा विश्वास बसेल. पण हा मार्ग कष्टाचा, लांबचा, कंटाळवाणा. यात भपका नाही, नजरबंदी नाही. वर्षानुवर्षे अज्ञातवासात राहून संघटना बांधण्याचे काम चालू ठेवावे, तेव्हा असे एखाददुसरे आंदोलन लढवता येण्याची शक्यता. गांधींनाही तीस वर्षाच्या कारकीर्दीत फक्त तीनच आंदोलने उभारता आली. २०, ३१ व ४२. दर दहा-बारा वर्षांनी एक. मधला काळ धीमेपणाने संघटना मजबूत करण्यासाठी-वाढविण्यासाठी-कार्यकर्ते तयार करण्यासाठी, दूरदूरवर ते पेरून ठेवण्यासाठी घालवावा लागला. कोण करतो ही दूरदृष्टीची बांधाबांध? आले मनात, फुंका रणशिंग. करा मुक्तीच्या घोषणा. लोकांच्या पदरात प्रत्यक्ष काही न का पडेना. मला भेटलेले आजरे भागातील शेतकरी-शेतमजूर पार मोडून गेलेले होते. माफ्या वगैरे मागून तुरुंगातून सुटून आले होते. चळवळीचे पुन्हा नावही काढायला तयार नव्हते बिचारे.

गावपातळीवर ज्यांना जमीन हवी आहे त्यांच्या संघटना तयार होणे यासाठी अवश्य आहे. कोणाकडे किती जमीन आहे, कोणाला जमिनीची खरी गरज आहे, वाटप कसे केले पाहिजे याचे ज्ञान अशा गावसमित्यांना जेवढे असेल तेवढे दिल्ली-मुंबईतल्या कुठल्याही पक्षाच्या, कुठल्याही सत्ताधाऱ्याला वा कोणत्याही श्रेणीच्या सरकारी अधिकाऱ्याला असणे शक्य नाही. ही बैठक जोवर तयार नाही, तोवर कायदा काहीही असो, कसेल त्याची जमीन या तत्त्वाचा अंमल होऊ शकणार नाही. ही मूळ बैठक तयार करण्याच्या कार्याकडे आमचे राजकीय पक्ष वळणार आहेत काय?

'इथे थांबून चालणार नाही. एरव्हीची गोष्ट वेगळी असते. आता ७२ साल जवळ आलेले आहे. प्रत्यक्ष बदल घडलेला लोकांना दिसेल अशा दृष्टीने पुढची चळवळीची दिशा ठरवली पाहिजे'. जमीन कबजा आंदोलनात भाग घेतलेला एक संसोपा कार्यकर्ता मला सांगत होता. यवत येथील जमिनीवर सत्याग्रह केल्याबद्दल

त्याला अटक झाली होती. सुटून आल्यावर मला सहज भेटला होता.

'म्हणजे नेमके काय केले पाहिजे असे तुम्हाला वाटते ?' मी.

'जिल्हा पातळीवर समिती स्थापन करून गावोगाव तिच्या शाखा काढल्या पाहिजेत. प्रत्येक गावच्या जमिनीचा प्रश्न वेगवेगळा असतो. कुठे जमीन पडीक पडून असते. कुठे जादा जमीन बेकायदेशीररीत्या मालकांनी दावून ठेवलेली असते. दोन्ही ठिकाणच्या उपाययोजनाही त्यामुळे वेगवेगळ्या असायला हव्यात. गावच्या परिस्थिती प्रमाणे वाटपाचा व त्यानंतर कसणुकीचा कार्यक्रम ठरवायला हवा. जिल्हा समिती व गावोगावच्या शाखा यांच्यात एकसूत्रता आणून ठरलेला कार्यक्रम पुढे रेटला पाहिजे. तरच या आंदोलनातून भरीव असे यश पदरात पडू शकेल '.—संसोपा कार्यकर्ता.

'असे काही घडू लागले तर उत्तमच आहे. पण निवडणुकीवरच दृष्टी असलेल्या पक्षांकडून असे काही घडविले जात नाही असा आजवरचा अनुभव आहे'. मी

'सगळ्यांनाच आता या प्रश्नाची निकड जाणवू लागलेली आहे. नक्षलवादी येऊन डोकी टांगतील ' ही खरी भीती आहे. राज्यकर्त्यांना तर आहेच पण लोकशाही—समाजवाद मानणाऱ्या आमच्यासारख्यांनाही आहे काहीतरी केले हे पाहिजेच '—कार्यकर्ता मनापासून सांगत होता. ग्रामीण भागातील असल्याने वस्तुस्थितीची त्याला विशेष जाणीव असणे स्वाभाविक होते.

ठाणे जिल्ह्यात तलासरी महालात कोचईवाला येथे एका गुजराथी गृहस्थाची खूप जमीन आहे. जमीन कबजा आंदोलनाचे वारे वाहू लागल्यावर या जमिनीचाही प्रश्न निघाला. सरकारने या गृहस्थांकडची जादा जमीन काढून ती भूमीहीन आदिवासींना वाटून देण्याची तयारी दाखवली. 'आम्ही वाट पाहत आहोत सरकार हे काम केव्हा सुरू करत आहे, किती जमीन जादा म्हणून धरली जात आहे, वाटप कसे होत आहे, मूळ मालकाकडे किती जमीन शिल्लक राहते आहे, याची. आमच्या मनाप्रमाणे सर्व घडून आले तर प्रश्नच नाही. नाहीतर आहेच लढ्याचा मार्ग. पण उगाच मी आदिवासींना लढ्यात उतरवणार नाही. कोचईवाला येथील जमिनीचा प्रश्न कसा सोडवायचा, तिचे पुनर्वाटप कसे करायचे, कुणाला यापैकी किती जमीन द्यायची यासंबंधीचा तपशीलवार आराखडा आसपासच्या शेतकरी समित्यांनीच बैठका भरवून तयार करून ठेवलेला आहे. मीच सध्या सबुरीचा सल्ला देत आहे. सरकारला काय करायचे ते करू द्या. शेतकरी समित्या आपले धोरण व कार्यक्रम नंतर अंमलात आणतीलच—श्रीमती गोदावरी परुळेकर नाशिकला गेल्या १५ ऑगस्टला भेटल्या होत्या तेव्हा मला सांगत होत्या.

सर्वोदयवाद्यांच्या ग्रामसमित्या, डाव्या कम्युनिस्टांच्या शेतकरी समित्या... प्रयत्नांची दिशा तर समान दिसते आहे. पुढची वाटचाल ? मेख तिथेच आहे.

—श्री. ग. मा.

# सीमा-भागातील मराठी जनतेची क्रूर फसवणूक थांबवा

आपल्या देशातील राजकारणी मंडळींना एखाद्या प्रश्नाचा किती पद्धतशीर विचका करता येतो याचा मासलेवाईक नमुना सांगायचा झाला तर महाराष्ट्र आणि म्हैसूर यांच्यातील सीमा-प्रश्नाचा उल्लेख करणे अतिशय उचित ठरेल. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नेते गेले कित्येक दिवस या प्रश्नासंबंधी राणा भीमदेवालाही मागे टाकणारी जोरदार भाषणे करीत आहेत. यांचा व्यासपीठावरचा रुबाब पाहून घ्यावा. एखाद्याला वाटावे, एवढे तडफदार नेतृत्व ज्या प्रदेशाला लाभले आहे त्या प्रदेशापुढच्या समस्या सुटायला फारसा अवधी लागू नये. परंतु 'गर्जेल तो पडेल काय' हेच खरे.

खरे म्हणजे चौदा वर्षे भिजत पडावा एवढा हा सीमा-प्रश्न मुळात मुळीच जटिल नाही. भाषावार राज्य पुनर्रचना करण्याचा केंद्र सरकारने निर्णय केला तेव्हाच दोन राज्यातील सीमाभागाबाबत काहीतरी वादंग निर्माण होईल याची कल्पना यायला हवी होती आणि हे वादंग सामोपचाराने मिटावे यासाठी काही सर्वमान्य तत्त्वे सहज निश्चित करता आली असती. परंतु केंद्र सरकार भाषावार राज्यपुनर्रचना करायला तयार झाले तेच मुळी अनिच्छेने. वस्तुतः राज्यांची भाषावर फेररचना करण्याची गरज शासकीय सौकर्यातून जन्म पावली होती. इंग्रजांनी हा देश जसजसा त्यांच्या ताब्यात आला तसतसे प्रांत आखले. त्या प्रांत आखणीमागे कोणताही विचार नव्हता. त्यामुळे स्वातंत्र्याच्या मागणी-प्रमाणे भाषावार प्रांतरचनेची मागणीही स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसच्या व्यास-पीठावरून करण्यात येऊ लागली. स्वातंत्र्याचा लाभ होईपर्यंत केवळ मागणी करण्यापेक्षा या आग्रहाला फारसा अर्थ नव्हता.

१९४७ मध्ये आपण स्वतंत्र झालो आणि त्यानंतर स्वाभाविकच लोकांची अशी कल्पना होती की काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून भाषावार प्रांतरचनेची मागणी करणारे पं. नेहरू प्रधानमंत्रिपदावर आरूढ झाल्यानंतर, नवजात लोकशाहीला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या भाषावार प्रांतरचनेला चालना देतील. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की भाषावार राज्यरचनेची काहीच गरज नाही असे स्वतः नेहरूच सांगू लागले. त्यासाठीच दार-समितीचा बनाव रचण्यात आला. दार-समितीनंतर

नेहरू, पटेल आणि पट्टाभी सीतारामय्या या तीन काँग्रेस-श्रेष्ठांच्या समितीनेही भाषावार राज्यपुनर्रचनेची मागणी फेटाळून लावली. त्यानंतर आंध्रच्या श्री. पोट्टी श्रीरामलु यांनी या मागणीपायी आपल्या प्राणाचे बलिदान केले आणि या बलिदानामुळे आंध्रमध्ये असंतोषाचा असा काही भडका उडाला की तो विझविण्यासाठी पं. नेहरूंना वेगळ्या आंध्रच्या निर्मितीची घोषणा करावी लागली.

येथपासून भाषावार राज्यपुनर्रचनेला पुन्हा चालना मिळाली आणि १९५६ च्या नोव्हेंबरमध्ये नवी राज्ये अस्तित्वात आली. केरळ, मद्रास (आताचे तामीळनाडू), आंध्र, म्हैसूर अशी एकभाषिक राज्ये नकाशावर दिसू लागली. त्याचवेळेला महाराष्ट्राची आणि गुजरातची निर्मिती केली असती तर हा साराच प्रश्न मिटला असता. परंतु मुंबई शहर महाराष्ट्राला मिळू द्यायचे नाही या हट्टापायी काँग्रेसश्रेष्ठांनी विशाल द्विभाषिक जन्माला घातले. हा विशाल द्विभाषिकाचा बनाव केला जात असतानाच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने निर्धारी धोरण स्वीकारले असते तर पुढे जो गोंधळ निर्माण झाला तो बऱ्याच प्रमाणात टळला असता. परंतु या वेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला महाराष्ट्रापेक्षा पं. नेहरू श्रेष्ठ असल्याचा साक्षात्कार झाला आणि तेव्हापासून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस आत्मवंचनेचे राजकारण खेळू लागली. या वंचनेपायी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांची तोंडे इतकी काळवंडली की दिल्लीहून पुण्याला परतताना मुंबई टाळून मनमाडमार्गेच ये-जा सुरू झाली. विशाल द्विभाषिकाच्या बनावाला त्यावेळच्या मुंबई विधानसभेतील कानडी सदस्यांनी पाठिंबा द्यावा म्हणून मोरारजीभाई देसाई यांनी मुंबई राज्यात असलेले चार कानडी जिल्हे म्हैसूरमध्ये समाविष्ट करण्याला संमती दिली. या कटापायी बेळगाव आणि कारवार या जिल्ह्यातील मराठी भाषिक प्रदेश आपल्यापासून दुरावत आहे हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या नेतृत्वाला उमगून आलेच नाही. हा मराठी भाषिक प्रदेश एकदा का दुसऱ्या राज्यात समाविष्ट झाला की तेथल्या सरकारच्या मंजुरीशिवाय तो आपल्याला परत महाराष्ट्रात आणता येणार नाही आणि अनायासे हाती आलेला प्रदेश आपण होऊन कोणीच सोडत नसते हा मानवी स्वभावाचा साधा नियमही महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांच्या ध्यानात येऊ नये यामागे त्यांची दिल्ली-श्रेष्ठांच्या मेहेरबानीवर जगण्याची दुबळी मनोवृत्तीच दिसून येते.

विशाल द्विभाषिकाच्या निर्मितीनंतर संयुक्त महाराष्ट्रासाठी लोकांनी विराट आंदोलन सुरू केले आणि त्यातून १९६० च्या मेमध्ये वेगळ्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तेव्हापासून गेली दहा वर्षे सीमा भागातील जनता महाराष्ट्रात सामील होण्यासाठी आसुसली असतानाही तिची ही न्याय्य मागणी मान्य करण्याची दिल्ली श्रेष्ठानाही गरज वाटली नाही आणि त्याबाबत आपण नमते घेणार नाही

पृष्ठ ६३ वर

# मुंबई मराठी पत्रकार संघ

रविवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी मुंबई मराठी पत्रकार संघाचा वर्धापन दिन मोठ्या थाटामाटाने 'दादर भगिनी समाजा'च्या सभागृहात साजरा झाला. भाषिक वृत्तपत्र व्यवसायाला आज चांगला काळ आला असून मराठी वृत्तपत्रव्यवसायही बाळसं धरू लागला आहे याचं प्रत्यंतर प्रतिवर्षी 'मुंबई मराठी पत्रकार संघा'च्या वाढत्या सदस्य संख्येवरून दिसून येतं. यावर्षी (वर्गणी रु. ३ वरून ५ रु. झाली तरीही) सदस्यसंख्या १२९ वरून १६५ वर गेली आहे.

मुंबईतील सर्वच दैनिकांचे संपादक संघाचे सदस्य आहेत. पण संपादकीय वा वार्ताहर विभागातील अनेक मंडळी संघाचे सदस्य होण्यास उत्सुक असावीत असं दिसत नाही सर्वात अधिक सदस्य 'महाराष्ट्र टाइम्स'चे आहेत-२७ नवाकाळचे १९ तर 'लोकसत्ता', 'नवशक्ती' व 'मराठा'चे अनुक्रमे ११, १० व ४ असे आहेत. या संदर्भात आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे 'सोव्हिएत देश'साठी काम करणारे एकूण ९ पत्रकार संघाचे सदस्य आहेत. (स्मरणिकेत 'सोव्हिएत देश'ची जाहिरातही आहे) तर 'युसिस'चा एकही पत्रकार संघाचा सदस्य नाही व केव्हाही नव्हता. बी. आय. एस. व 'लोकशाही जर्मनी'चे प्रत्येकी एक एक पत्रकार संघाचे सदस्य आहेत. श्री. एम. विश्वम् ('स्टेटसमन') हे अन्यभाषिक पण मराठी बोलू शकणारे पत्रकारही संघाचे सदस्य आहेत; पण मराठी वा इंग्रजी पत्रव्यवसायात असणारी अनेक मराठी भाषिक मंडळी मात्र संघाची सदस्य नाहीत.

स्मरणिकेतील श्री. ल. ना. गोखले यांचा 'आत्मसंशोधना'त्मक लेख, वृत्तपत्र-व्यवसायाच्या शिक्षण क्रमाबाबत त्याचप्रमाणे इतरांसाठी 'रिफ्रेशर कोर्स' व वृत्तपत्रांनी लहान टाईप वापरून वाचकाला अधिक मजकूर देणं, वगैरे गोष्टींवर भर देणारा आहे.

संघाचे सदस्य कोण होऊ शकतं याबाबतचे जे नियम आहेत त्यात मुद्रण तपासनीसांचा अंतर्भाव आहे (श्री. मामा दाते, श्री. पां. वा. गाडगीळ आदि नावाजलेल्या पत्रकारांनी त्यांच्या या व्यवसायाची सुरुवात मुद्रण तपासनीस म्हणूनच केली होती.) पण जुळाऱ्यांचा मात्र समावेश यात नाही.

वर्धापन दिनाचे महनीय प्रवक्ते होते श्री. मामासाहेब दाते. यावर्षी संघाचे अध्यक्ष म्हणून श्री. कृ. पां. सामक यांची निवड झाली आहे. एखादा वार्ताहर संघाध्यक्ष होण्याची ही पहिलीच वेळ. नव्या अध्यक्षाची कारकीर्द यशस्वी होईल अशी आशा आहे.

□ □ □

# चर्च आणि निवडणुका

सध्या केरळात गडबड चालू आहे. एक निवडणुकीची आणि दुसरी फादर पुथेनपुराची. केरळातल्या घटना या नेहमीच आंतरराष्ट्रीय बातम्या होतात. केरळातल्या निवडणुका देखील. फादर पुथेनपुरा प्रकरणामुळे तर साऱ्या जगात धमाल उडवून दिली आहे. कोचीनजवळचा हा ख्रिश्चन पाद्री अनेक मुलींना कॅथलिक शिक्षणासाठी युरोपात पाठवतो. युरोपीय चर्चेसमध्ये नन्स् म्हणून भरती होणाऱ्या मुलींचा तुटवडा सध्या फार भासू लागला आहे. याचे कारण तेथली सुबत्ता. आणि केरळात दरिद्री मुलींना काय तोटा ? त्यामुळे युरोपातल्या श्रीमंत चर्चेसनी केरळातल्या मुली मोठ्या प्रमाणावर आयात करायला सुरुवात केली. देवाण घेवाण आली तिथे नफा तोटाही आलाच. युरोपला पाठविलेल्या प्रत्येक मुलीमागे साडेचार ते पाच हजार रुपये फादर पुथेनपुराला मिळू लागले. पाठविलेल्या मुलींचं विमानाचं तिकीट आणि तिचा खर्च फादर पुथेनपुरा यातून भागवीत असे. उरलेले आपल्या मिशनसाठी खर्च करी.

असा व्यवहार सर्वच चर्चमध्ये चालतो. हिंदुस्थानातील चर्चेस गरीब असल्यामुळे युरोपातील चर्चेसकडून प्रत्येक बाबतीत पैसे घ्यायला त्यांना काहीच वाटत नाही. शिवाय या मुली युरोपीय चर्चेसनी मागविलेल्या होत्या. प्रशिक्षण झाल्यावर त्या युरोपातच राहून धर्मशिक्षणाचे काम पुढे चालविणार होत्या. केरळातून अशा मुली फार मोठ्या प्रमाणावर जातात, त्यामुळे या व्यवहाराला मुलींच्या व्यापाराचे स्वरूप आले. लंडनच्या संडे टाईम्समध्ये ही वस्तुस्थिती प्रकट होताच सर्वत्र खळबळ माजली. व्हॅटीकनने चौकशीसाठी एक अधिकारी नेमला. ब्रिटीश आणि भारतीय पार्लमेंटात या प्रश्नावर खडाजंगी झाली. आणि भारतसरकारने या प्रकरणी चौकशी सुरू केली. या वादळामुळे फादर पुथेनपुरांचा व्यवहार तात्पुरता स्थगित झाला आहे.

कुणी या खळवळीचा संबंध केरळातल्या निवडणुकांशी जोडतात. केरळातलं

चर्च निवडणुकांमध्ये नेहमीच कम्युनिस्टांच्या विरोधी पवित्रा घेते. केरळामधील ६२ चं कम्युनिस्ट सरकार उलथून पाडण्याच्या चळवळीत कॅथलिक चर्चचा मोठा हात होता. याही निवडणुकीत चर्चचा जोरदार कम्युनिस्ट विरोधी प्रचार चालू आहे. त्यामुळे या चर्चला बदनाम करण्याच्या हेतुने कम्युनिस्टांनी खळबळ माजविण्याचा डाव टाकला आहे असे म्हणतात.

ते काहीही असो. केरळच्या निवडणुकीत आता चांगलाच रंग भरू लागला आहे. विधानसभेच्या १३३ जागांसाठी आता ५०६ उमेदवार उभे आहेत. दोन उमेदवारांमध्ये सरळ सामना फक्त १८ मतदार संघात आहे.

राज्यात निवडणूक आघाड्या ठिकठिकाणच्या मतदारसंघात कोसळून पडत असल्या तरी खरा सामना तीन मुख्य गटात आहे. एका बाजूला मार्क्सिस्ट–कम्युनिस्ट, त्यांचे जोडीदार संयुक्त समाजवादी आणि इतर स्थानिक पक्ष, तर दुसऱ्या बाजूला उजवे कम्युनिस्ट, सत्ता काँग्रेस, मुस्लीम लीग आणि इतर आघाड्या. मुख्य लढत या दोहोतच आहे. ती म्हणजे जुनी काँग्रेस आणि केरळ काँग्रेस यांच्या लोकशाही आघाडीची.

या लोकशाही आघाडीला स्वतंत्र आणि जनसंघाचा पाठिंबा राहीलच. पण कॅथलिक चर्च आणि केरळच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेली कम्युनिस्ट–विरोधी नायर सर्व्हिस सोसायटी या संस्थेचेही या आघाडीस पाठबळ मिळेल. केरळातील वाढते कम्युनिस्ट–विरोधी मत आता याच आघाडीला मिळेल अशी आशा व्यक्त केली जाते. या आघाडीचा पाया शेवटपर्यंत टिकला तर दोन्ही कम्युनिस्ट पक्षांचे आपापल्या विजयासंबंधीचे अंदाज चुकू शकतील.

विशेषत: आघाड्यांच्या प्रश्नावरून सत्ता काँग्रेस आणि समाजवादी पक्षामध्ये जी फूट पडली आहे त्याचा फायदा या लोकशाही आघाडीलाच मिळणार आहे. संयुक्त समाजवादी पक्षाचे पुढारी जनार्दनन् हे स्वत:च आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या विरोधात उभे आहेत. सत्ता काँग्रेसच्या मल्लपुरम् जिल्हा शाखेने तर पक्षाविरुद्ध सरळ बंडाचा झेंडा उभारून पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध आपले उमेदवार उभे केले आहेत. कम्युनिस्ट पक्षाशी सहकार्य करण्याच्या प्रश्नावरूनच ही तेढ निर्माण झाली आहे

याचा परिणाम म्हणूनच की काय पण सत्ता काँग्रेसतर्फे नुकतेच असे जाहीर करण्यात आले की पक्ष कोणत्याही आघाडीत नाही. पक्ष स्वतंत्रपणे स्वत:च्या बळावर निवडणुका लढणार आहे. पण हे जाहीर करायच्या आधी उमेदवारांचे वाटप होऊन गेलेले होते. १३३ जागांपैकी ज्या ठिकाणी उजवे कम्युनिस्ट उमेदवार उभे नाहीत अशा ठिकाणच्या फक्त ५५ जागाच सत्ता काँग्रेस लढविणार आहे!

पण आघाड्यांचे राजकारण कसेही असले तरी एक गोष्ट मात्र निश्चित की निवडणुकानंतर केरळात राजकीय स्थैर्य निर्माण होईल ही आशा करणे शहाण-

पणाचे नाही. हे सव पक्ष एकत्र यताहेत ते कुठल्याही तत्त्वासाठी म्हणून नव्हे तर केवळ सत्तेसाठी. त्यांच्या एकजुटीमध्ये अथवा आघाड्यांमध्ये तत्त्वाला जागा नाही. महत्त्व आहे ते सत्तेला, निवडणूक जिंकण्याला.

## फॉर्म्युले

महाराष्ट्र–म्हैसूर सं मेसारखाच दुसरा एक प्रश्न पतप्रधान इंदिरा गांधींना सतावीत असला पाहिजे. तो म्हणजे तेलंगणाचा. महाराष्ट्राचे नेते ज्याप्रमाणे अधूनमधून दिल्ली वाऱ्या करून इंदिरा गांधींना सीमाप्रश्नाची जाणीव करून देतात त्याचप्रमाणे आंध्र प्रदेशातील तेलंगण प्रजा समितीचे पुढारी देखील आपला प्रश्न बाईंना समजावून सांगण्यासाठी दिल्लीला जाऊन येतात. नुकतेच समितीचे अध्यक्ष डॉ. चेन्ना रेड्डी दिल्लीला जाऊन आले. आल्यानंतर त्यांनी वार्ताहरांना आपल्या दिल्ली भेटीचा वृत्तांत सांगितला. वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तरे दिली. हा वृत्तांत महाराष्ट्रातल्या लं कांनी वाचण्यासारखा आहे.

डॉ. रेड्डी म्हणाले, आमच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी इंदिराबाई सध्या एका नव्या पर्यायाचा विचार करीत आहेत. आतापर्यंत सुचविलेल्या तोडग्यांपेक्षा हा पर्याय वेगळा आहे. येत्या एक दोन आडवड्यात या नव्या पर्यायांचे निश्चित स्वरूप समजेल.

वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. रेड्डी म्हणाले, मी आपणहून इंदिरा गांधींना भेटायला गेलो नव्हतो. त्यांनीच मला बोलावले.

रेड्डी म्हणाले, आपला प्रश्न सोडविण्यासाठी प्रधानमत्री अतिशय उत्सुक असल्याचे दिसले. पण प्रधानमंत्र्यांनी याबाबतीत माझ्यापुढे निश्चित अशी कोणतीच सूचना मांडली नाही.


आता वरील तीन परिच्छेदात डॉ. रेड्डींच्या ऐवजी श्री. नाईक घाला आणि पुन्हा वाचा ! आहे की नाही गंमत ? म्हणजे प्रधानमंत्र्यांचे फॉर्म्युले ठरले आहेत. अरे कोण आलंय रे ? महाराष्ट्राचे नाईक का ? मग काढ आपला फॉर्म्युला–बी. पण ती फॉर्म्युल्याची फाईल जपून ठेवा बरं का ! तेलंगणाचे, विदर्भाचे लोक आले म्हणजे लागेल ती फाईल–वगैरे.

प्रधानमंत्र्यांचे असे बरेच रेडीमेड फॉर्म्युले अनेक प्रश्नांच्या बाबतीत ठरून गेले आहेत हे बारकाईने पाहिल्यास लक्षात येईल. हरियाना, चंदीगडच्या बाबतीत त्या हेच फॉर्म्युले वापरत होत्या. विवक्षित काळ गेल्यानंतर मात्र हे फॉर्म्युले बदलावे लागतात. अर्थात कोणत्याही राजकारणात हे आलेच. सारेच जण फॉर्म्युले वापरत असतात.

—अरुण गोसावी

श्रीक्षेत्र गोमन्तक

# तूर्त शांतता !



गोव्यात एक प्रचंड वादळ होऊन गेलं. दोन महिन्याहून अधिक कालावधी हे वादळ रोंरावत, घोंघावत होतं. या झंझावातानं येथील यु. गो. व म. गो. या दोन्ही राजकीय पक्षांची खूपच पडझड झाली. असं म्हणण्यापेक्षा वाऱ्याच्या या रुद्रावतारानं प्रचंड अशी राजकीय उलथापालथ करून टाकली. आणि या झंझावातानं घाबरून गेली होती ती सामान्य जनता ! केळी-पोफळीप्रमाणे भेलकांडत वादळाच्या शेवटाची वाट पहात होती.

अखेर वादळ संपलं, शमलं. पालापाचोळा दूर उडून पडला. आणि झालेल्या नुकसानीचा अंदाज घेत, पडलेली खिंडारं बुजवून टाकण्याच्या कामाला दोन्ही राजकीय पक्ष लागले. कुणीतरी म्हटलं, 'गोव्यात वादळानंतरची शांतता नांदू लागली.'

निसर्गाचा हा रुद्रावतार थांबण्याच्या सुमारासच १८ पुढाऱ्यांची 'गोवा मुक्ती आघाडी' बाहेर आली. स्वतःचं राजकीय पुनर्वसन करून घेण्यासाठी, गेलेली 'पत' परत मिळविण्यासाठी ! आणि त्यांनी धडक दिली ती एवढ्या प्रचंड वादळानंतरही शाबूत राहिलेल्या त्या उन्मत्त वृक्षावर ! कारण तो अभंग होता. गोव्याच्या मातीत खोलवर त्याची पाळेमुळे गेली होती. आणि या तथाकथित अठरा पुढाऱ्यांच्या धडकेनं तो वृक्ष थोडासा शहारला. त्याची पाने सळसळली. बस्स. वृक्ष घट्ट राहिला.

याच वेळी ते राजकीय दशावतार आले. तो वृक्ष हाणून पाडण्याची, त्याची

पाळेमुळे खणून काढण्याची ईर्षा मनी धरून! विनाशायच दुष्कृताम् असा उच्च-रवानं उद्घोष करीत गोव्याच्या राजकीय जीवनात हे दशावतार अवतीर्ण झाले.

मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकरांवर त्यांनी आरोप केले. 'मुख्यमंत्रिपदाचा गैरफायदा घेऊन श्री. बांदोडकरांनी स्वतःचा धंदा वाढविला. स्वकीयांचं कल्याण केलं.' या आरोपाची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली. हे आरोपपत्रक न्यायासाठी जनतेच्या दरबारात ठेवले. नायब राज्यपाल श्री. नकूल सेन, पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांच्यापाशी त्यांनी मागणी केली– 'मुख्यमंत्र्यांच्या या कृत्यांची चौकशी झालीच पाहिजे.'

या निमित्ताने बहुतेकांनी दिल्ली वारी केली. वृत्तपत्रकारांशी बातचीत केली. संसदेत हा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. दिल्ली दरबार गाजवून सोडला.

या प्रकरणात बांदोडकर बरेचसे शांतच राहिले. ते म्हणाले, मी स्वच्छ आहे ना? मग भीती का?

मला कोण काय करणार? त्यांचं म्हणणं अवताराचं कार्य दुहेरी असावं. परित्राणाय साधूनां पण हवे. यांच्याकडे कार्यच नाही. मग साध्य काय होणार? होऊन जावू दे. या दशावतारांनाही स्वतःचं बळ अजमावून पहाण्याची संधी हवीच होती. 'मी तयार आहे.'

वाटेत मला कुणीतरी प्रश्न केला,

'या दिल्ली यात्रेसाठी पैसा कुठून आला?'

कोण जाणे कोणत्या 'विश्वासाने' हे पाऊल त्यांना उचलायला लावलं. बहुतेकांच्या मते – बोलविता धनी वेगळाच आहे.

## श्रीफळ महागले!

गोव्याच्या राजकारणाचं हे असं खोबरं झालं, आणि इथं नारळ महागला, कधी नव्हे इतका! श्रावण महिना हा व्रतांचा महिना. इतर ठिकाणांप्रमाणेच गोव्यातही व्रतवैकल्ये, उपासतापास यांचा पाऊस या महिन्यात पडतो. श्रावणाला लागून येणाऱ्या गौरी गणपति; आणि अशावेळी नेहमीच्या दुप्पट नारळ लागतो. येथे कोणत्याही पूजेच्या प्रारंभी गणपति पूजनाला एक अखंड नारळ हवा असतो. साधारणपणे पाच माणसांच्या एका कुटुंबाला दिवसाला दोन नारळ खायला लागतात. शुद्ध धारोष्ण दुधाचा अभाव गोमंतकीय भरून काढतो नारळाच्या दुधाने! चहा सोडून कुठेही हे दूध वापरले जाते. आणि अशा परिस्थितीत नारळाचे भाव बेसुमार वाढलेले, आकाशाला भिडल्यागत!

एका नारळाची किंमत एक ते दीड रुपया! नारळापेक्षा तिच्या करवंटीची

अधिक सलगी असलेला इथला सामान्य गरीब कातावला. या नारळापायी त्याच्या संपूर्ण मिळकतीचं खोबरं होण्याची पाळी आली.

या गोव्यात नारळ किती पिकतो माहिती आहे? सरकारी माहिती सांगते, सुमारे २० हजार हेक्टर जमीन नारळाच्या लागवडीखाली आहे. येथे प्रतिवर्षी सुमारे ८० दशलक्ष नारळांचे उत्पादन होते. आणि यापैकी सुमारे ५० टक्के म्हणजे फक्त ४० दशलक्ष नारळ गोमंतकीय खातात. अर्थात राहिलेला गोव्याबाहेर जातो,

नारळाच्या भाववाढीने संत्रस्त झालेल्यांनी वृत्तपत्राद्वारा ओरड करायला सुरुवात केली.

श्री. मधुकर भोसले म्हणाले, 'भाटकारांनी माडांची निगा नीट न केल्याने माड-नारळाची झाडे वांझोटी झाली, उत्पादन घटले. नारळावर लेव्ही बसवावी.'

श्री. जयवंतराव सरदेसाई म्हणाले, 'हा विनोद आहे. उत्पादन घटले नाही.'

श्री. शंकरराव घोरपडे म्हणाले, 'वर नारळ खाली फेणींच्या बाटल्या असा बहुसंख्य नारळ ट्रकमधून बाहेर जातो. सरकारने त्याला आळा घालावा!'

श्री. कार्तिककुमार लोटलीकर म्हणाले, सक्तीच्या भात वसुलीप्रमाणे उत्पादकांकडून सक्तीची नारळ वसुली करावी.'

सौ. सुमित्रा नगर्सेकर म्हणाल्या, 'सहकारी संस्थांमार्फत नियंत्रित दराने नारळाची विक्री व्हावी.'

भराभर लोकांनी मते व्यक्त केली. पण नारळाचा प्रश्न सुटू शकलाच नाही—

ईश्वरान् करणी करून नारळात पाणी ठेवलं. परंतु एक रुपयावर नारळाचे भाव गेल्याने सामान्याच्या डोळ्यातून पाणी आलं. उत्पादकांच्या तोंडाला पाणी सुटलं. वर्तमानपत्रांतून काथ्याकूट होतच राहिला.

माझे स्वतःचे मत : पुढाऱ्यांनी ऊठसूठ गोव्याच्या राजकारणाचं खोबरं करायला सुरुवात केल्यानेच नारळ महागला. अर्थात धूर्त लोक खोबरं खाऊन गेल्याने बाकीच्यांच्या हाती करवंटीच राहिली हा प्रश्न वेगळा!

कल्पवृक्षाच्या या दुनियेत इतर फळांप्रमाणेच श्रीफळही श्रीमंतांचं करून टाकलं गेलं.



चर्चा
तत्त्वज्ञान
योजना
ध्येय
मला कळत नाही.
कळतं फक्त काम....

# ग. रा. भटकळ

रामदास भटकळ

**का**ही दिवसांपूर्वी पॉप्युलर बुक डेपो आणि तिच्या शाखा यात काम करणाऱ्यांचे एक घरगुती स्वरूपाचे संमेलन झाले. त्यावेळी पुस्तक व्यवसायात पन्नासाहून अधिक वर्षे काम केल्या-बद्दल आमच्या वडिलांचा सत्कार करण्यात आला. त्याचवेळी ज्यांनी संस्थेत पंचवीस वर्षांहून अधिक काम केले आहे आणि जे अजून संस्थेत आहेत अशा सतरा जणांना मानचिन्हे देण्यात आली. यातून एका मोठ्या कुटुंबाचे हळूहळू दर्शन होऊ लागले. त्याचबरोबर एक चमत्कारिक अंतरही जाणवू लागले. ते माझे वडील आणि मी त्यांचा मुलगा एवढेच आपले नाते नाही. त्याहून अधिक, त्याहून वेगळे असे काही आमच्यात दुवे आहेत असे वाटू लागले.

ह्या जाणीवेतून त्यांच्या आयुष्याकडे, त्यांच्या कार्याकडे, त्यांच्या विचारसरणीकडे पाहण्याचा मोह होऊ लागला. आणि मग जे प्रश्न आजपर्यंत

## ९ सप्टेंबर : पॉप्युलरचे
## ग. रा. भटकळ
## यांचा
## पंचाहत्तरावा
## वाढदिवस



पॉप्युलर प्रकाशनचे उद्‌घाटन

कधी विचारले नव्हते त्यांकडे मन वळू लागले.

गेली साठ वर्षे वडील मुंबईत आहेत. आमचा जन्म मुंबईचाच. भटकळ गाव मी कधी पाहिलेही नाही. त्यामुळे आमचा त्या गावाशी काही संबंध आहे असे वाटतही नाही. पण आता कळले की वडिलांचे बालपण भटकळलाच गेले. भटकळ हे कारवार जिल्ह्यातले दक्षिणेकडचे एक बंदर. पूर्वी मंगळूरला जाणाऱ्या बोटी तिथे लागत असत. भटकळला लागूनच भुईभटकळ नावाचे एक गाव आहे. माझे आजोबा हे तिथे पाटील होते. त्यांना दुसऱ्या बायकोपासून तीन मुलगे आणि दोन मुली. त्यात माझे वडील गणेश हे मधले. त्याकाळी मुलांचे शिक्षण हे बव्हंशी खाजगी शिक्षकांच्या हाताखाली व्हायचे. पण कर्मधर्मसंयोगाने आमच्या वडिलांना त्यांच्या मावशीकडे धारवाडला जाऊन चार बुके शाळेत शिकण्याची संधी मिळाली. तेवढ्यात त्यांची आई आजारी म्हणून ते परत भटकळला गेले. आईच्या मृत्यूनंतर त्यांचे वडील मुर्डेश्वरला आपल्या मेहुण्यांकडे येऊन राहिले.

वडिलांचे एक मामा काही खरेदीसाठी मुंबईला चालले होते. त्यांनी आपल्या ११ वर्षांच्या भाच्याला मुंबईला नेले. तिथे दुसरे एक मामा–मंगेशराव मुर्डेश्वर– नोकरी करत होते. त्यांना मूलबाळ नव्हते तेव्हा त्यांच्याचकडे गणेश शिक्षणासाठी राहिला. राहिला तो राहिलाच.

वडील त्यावेळी कसे दिसत असतील ते नजरेसमोर आणायचा मी खूपच प्रयत्न

करतो पण काही पत्ता लागत नाही. मी त्यांना गमतीने विचारले की तुम्ही त्यावेळी शाळेत जाताना कपडे कोणते घालत होता. त्यांना आता अजिबात आठवत नाही. पण शेंडी नव्हती हे नक्की. ते सुरुवातीला मराठी शिकण्यासाठी सेंट कोलंबामध्ये आणि पुढे इंग्रजी शिकण्यासाठी टच्युटोरियल हायस्कूल ह्या एक पारशाच्या शाळेत गेले.

१९१४–१५ च्या सुमारास मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी पहिली नोकरी धरली ती ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये. त्यावेळी त्यांनी ई. व्ही. रयू (E. V. Rieu) यांच्या हाताखाली काम केले. हे रयूसाहेब पुढे पेंग्विन क्लासिक्सचे संपादक झाले, आणि त्यांनी 'न्यू टेस्टामेंटचे' नवीन भाषांतरही केले आहे. पुढील ८–१० वर्षांत वडिलांनी वेगवेगळ्या नोकऱ्या केल्या–रेमिंग्टन टाईपरायटर कंपनी, ई. डी. ससून कंपनी, डनलॉप रबर कंपनी, वुल आणि कंपनी या सर्वात आणि तीही वेगवेगळ्या प्रकारची कामे. सायकलवर बसून सामान पोचवण्यापासून तो कागदपत्र आणि हिशेब ठेवण्यापर्यंत. त्यावेळी मंगेशराव कुलकर्णी हे वेगवेगळे व्यवसाय करीत असत. त्यांच्याकडे एका सिमेंट कंपनीची एजन्सी होती. पुस्तकांच्याही मुंबईबाहेरून पोस्टाने ऑडरी मिळवून ती पुस्तके पुरविण्याचा त्यांचा धंदा होता. मंगेशराव हे माझ्या आईचे काका. ह्या नात्यामुळे म्हणा किंवा काही कारणाने माझे वडील मंगेशरावांना ह्या धंद्यात मदत करीत.

ही सारी माहिती मी गोळा केली आणि माझ्या यापूर्वीच्या काही गोड कल्पनांना धक्का बसला. पहिली नोकरी एका विश्वविख्यात प्रकाशनसंस्थेत, त्यानंतर भारतातील एका आद्य प्रकाशकाशी घनिष्ठ संबंध, ह्या धागादोऱ्यांच्या बळावर वडिलांसंबंधी एक स्वप्नाळू कल्पना बांधलेली होती. व्यवसाय पत्करायचा तो ह्या शिक्षण आणि ज्ञानार्जनाशी संबंधित अशा कार्यक्षेत्रातच अशा ध्येयाने प्रेरित झालेला तरुण अशी कल्पना वडिलांच्या काही स्तुतिपाठकांनी करून दिलेली होती. पण असा पुरावा काही सापडेना. ह्या सुरुवातीच्या काळातच नव्हे तर त्यापुढील पन्नास वर्षातही जर त्यांनी काही उद्दिष्ट किंवा ध्येय समोर ठेवले असले तर ते म्हणजे काम—Work.

ह्या कामाच्या ध्यासापायी त्यांनी एका बाजूला इतर नोकऱ्या करत असता संध्याकाळी डी. ए. नाडकर्णी अँड कंपनी ह्या पुस्तकांच्या दुकानात काम करण्यास सुरुवात केली. त्यावेळी गुमास्ता कायद्याचे बंधनही नसायचे. तेव्हा ते संध्याकाळी ६ ते १२ आणि काही वेळा पहाटेसुद्धा हा 'पार्ट टाईम जॉब' करायचे. त्यावेळी ह्या दुकानाची मालकी नायम्पल्ली नावाच्या एका गृहस्थांकडे होती. पुढे ते नायम्पल्ली निवृत्त होऊन त्याच नावाचे दुसरे एक गृहस्थ आले. जसजसे माझे वडील त्या व्यवसायात गुंतत चालले तसतसा त्यांना भागीदारीचा दर्जा मिळत गेला.

१९३२ च्या सुमारास माझ्या वडिलांचे मुंबईतील मामा मरण पावले. तेही

पृष्ठ ५६ वर

# कात्रणे । कात्रणे

## दिलमें बिठाई तसविर !

संगीत संशयकल्लोळ

प्रवेश दुसरा

(चरणशेट स्वतःशीच बोलत फिरतो)

चरण–

मी आज करणार आहे त्या गोष्टीला, माझ्या जिवलग मित्रांचाही मनापासून सल्ला नाही आणि त्यांचंही म्हणणं वाजवी आहे. पण काय करावं ? ऐन सत्तेच्या पंचविशीत लागोपाठ तीन बायका दगावल्या. वेल लावावी, खतपाणी घालावे आणि अशी कुठं फळाफुलाला येते न येते तोच अचानक काही रोग पडून मरून जावी, तशातला माझ्या तिन्ही बायकांचा प्रकार झाला ! शेवटी जिकीरीस येऊन नामांकित ज्योतिषी आले होते, त्यांना पत्रिका दाखवली. पत्रिका पहाताच त्यांनी सांगितलं –' तुम्हाला मंगळ अत्यंत अनिष्ट असून भार्यास्थानावर सर्व दुष्ट ग्रहांची पूर्णदृष्टी आहे. लग्नाची बायको काही तुम्हाला लाभायची नाही ! तेव्हा या भानगडीत पडू नका. लग्नाचा काही ' प्रकार ' करून पाहिलात तर मात्र स्त्री-सुखाचा संभव दिसतो. ' माझ्या सुदैवाने सत्ता नायकिणीची मुलगी कमला त्रिपाठी ही हवी होती त्यापेक्षा दसपट चांगली मिळाली ! जवळजवळ वर्षभर तिच्या घरी रावता ठेऊन परीक्षा पाहिली. पण तिच्यात व्यंग तर दिसलं नाहीच, उलट तिच्या मनात माझ्यासारख्याशी लग्नाच्या स्त्रीप्रमाणे संबंध ठेवून जन्माचा संसार करावा असं आहे : हा रुमझूम रुमझूम आवाज कसला बरं ? अथवा प्रश्न कशाला ? तिच्याच पैंजणांचा ! रुमझूम रुमझूम...ओहो ! यावं यावं...तृषित-चातकमेघमाले – यावं–

पद

(लावणीची चाल)

सुकांत चंद्रानना पातली भ्रूधन सरसावुनी ।।
कटाक्ष खरशर सोडुनि भेदित हृदयाची गजगामिनी ।।
रदन दिसती जणु जगुंबिबाचे, खंड मुखी खोविले ।।
कुरळ केस, यशवंत नासिका, नेत्र कमलिनीदले ।।

(कमला त्रिपाठी येते)

कमला : खाशी ! खाशी ! तान तर खूप ठेवून दिली ! इतके दिवस हा गुण चोरून ठेवला होता म्हणायचा !

चरण : हो. तो तसाच प्रसंग आल्याशिवाय कसा बाहेर निघायचा ?

कमला : मग आज प्रसंग आला वाटतं ?

चरण : असं या प्रफुल्लीत मुखकमलावरून वाटतं–

या मिठ्ठास नाटकाची मराठी माणसांना अधिक वानगी नको.

भा. क्रां. द. च्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक दिल्ली येथे २८ ऑगस्टला भरली होती. या बैठकीत सत्ताधारी कॉंग्रेसशी रीतसर 'लग्न' करून संसार करण्याचा विचार चरणसिंगानी रद्द केल्याचे घोषित केले. परंतु कमला त्रिपाठींच्या इंदिरा कॉंग्रेसशी, आपले आहेत ते संबंध तसेच चालू रहातील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

रायटर-प्रोडयुसर-डायरेक्टर-चरणसिंग यांच्या या नाटकाच्या अखेरच्या प्रवेशात, इंदिराजींसमोर कमला आपले मन मोकळे करते. या प्रवेशातील तिचे आर्तसूर लवकरच समस्त रसिकांच्या तोंडी खेळू लागतील–

जो दिलमे बसाईथी तसविर मिटा देना
आखोमे बसायाथा, नजरेसे गिरा देना...

◻

## पळू नको थांबरे गवळिया तू ।।

---

आमचे मित्र द. मा. मिरासदार यांनी लिहिलेल्या – 'मी लाडाची मैना तुमची' या खुमासदार वगाचा एक बहारदार खासगी प्रयोग आम्ही नुकताच पाहिला. या वगाचे प्रयोग महाराष्ट्रात गर्दी खेचत रहातील याबद्दल आम्हाला मुळीच संशय नाही. प्रश्न तो नाही. हा प्रयोग पहाताना, आमच्या शेजारी मराठीतील वग-नाट्याचे एक गाढे अभ्यासक बसले होते.

पडदा वर गेला. गण झाला. गौळणींचे नूपुर रंगमंचामागून चढत्या लयीत ऐकू येऊ लागले. आता गौळणी येतील. कृष्ण त्यांची वाट आडवील. आम्ही खुषीत होतो. इतक्यात आमचीच 'बाही' पकडून अभ्यासक म्हणाले–

"आम्हाला तमाशाच्या या फॉर्मचा आता कंटाळा आला आहे. तशाच गवळणी, तेच नाचणं, तेच दह्या-दुधाचे विनोद–

सासुरवासी घरच्या नारी । जात होतो मथुरेच्या बाजारी
रंग भरोनी मारी पिचकारी–

किंवा हा हृषिकेशी...धरतो माझ्या पदरासि...!"

इकडे स्टेजवर गवळणी आल्या. ग. दि. माडगूळकरांच्या एका झकास तोंडाच्या गवळणीचे सूर प्रेक्षकांना गुंगी चढवू लागले.

अभ्यासक अस्वस्थ होता. माझाच दंड हलवून म्हणाला–

'यात नवीन काय आहे. तोच द्वाड कृष्ण – तो बघा लागला अडवायला. आता मडक्यात काय आहे ते विचारील – कंटाळा आला–!'

गवळणीची वाट अडवणाऱ्या या कृष्णाला कुणीतरी अडवायला हवा, धडा शिकवायला हवा, हा आमच्या वग अभ्यासकांचा सल्ला कुणी ऐकेल काय ? परंतु यंदा गोकुळाष्टमीला – या गोविंदाला मुंबईत भेंडीबाजारात खरोखरच मुसलमान-बंधूंनी अडवला. दहीहंड्या फोडीत उद्दामपणे धावणाऱ्या गोविंदावर त्यांनी सोडा-वॉटरच्या बाटल्या मारल्या. गोविंदाला या भागातून जाऊ देणार नाही हा हट्ट तर त्यांनी पुरा केला. यासाठी 'हाशम' नावाचा एक मुस्लीमबंधू 'हुतात्मा' झाला. समस्त पेंद्या कंपनीने गोविंदाला सांगितले – 'शांतताभंग होऊ नये म्हणून तुम्ही दुसऱ्या मार्गाने जा–' पेंद्या कंपनी असे कसे हो म्हणेल–'तुम्ही याच मार्गाने जा. कुणाची माय व्यायली आहे तुम्हाला अडवण्याची ! ही दंडेली आम्ही सहन करणार नाही.' पेंद्या कंपनी म्हणाली– 'किस्ना तू मुळी तिकडून जाऊच नकोस !'

यापुढे वगनाट्यात हा नवा प्रकार घालायला काय हरकत आहे ? गण संपतो. 'इंदु शिरावर सिंधु बुद्धीचा बंधु करूनि घे कसा। कार्यसिद्धीकरी इतर देवता बाग वर्षे बसा–' हे शब्द विरतात न विरतात तोच – नाचत ठुमकत गवळणी येतात. मथुरेची वाट धरतात. लंगड्या पेंद्याच्या खांद्यावर हात ठेवून गोविंदा येतो. सुदर्शनचक्र हरवलेला गोंद्या दहीहंडीसाठी जाऊ लागतो. तितक्यात हाशम येतो. आणि सोडावॉटरची बाटली फेकून मारतो. कृष्णाचा कपाळमोक्ष झालेला आहे आणि पेंद्या त्याला म्हणतो आहे–

'तू किस्ना इकडून कशाला ले आलास ?' या गोविंदाला पेंद्या कंपनी असे कधीच सांगणार नाही– 'पळू नको थांबरे गवळिया तू !'

दह्या-दुधाचे विनोद आता बंद !

– सेना महाराज



# महाराष्ट्रभाषाभूषण

सांस्कृतिक मुंबई

रवींद्र पिंगे

ओळीने पन्नास–साठ वर्षं सतत दुसऱ्यासाठी खपत आलेला आपला देह महाराष्ट्रभाषाभूषण ज. र. आजगांवकरांनी सोडलेल्याला परवा पंधरा वर्षं पूर्ण झाली. प्राचीन मराठी संत-साहित्याचा परिचयात्मक परामर्ष घेण्यात त्यांनी उभी हयात घालवली. फुटकळ पुस्तके तर बहुत लिहिली. ह्या सर्व पसाऱ्या-वरून एकदा सफाईचा हात फिरवावा आणि मग नव्या आवृत्त्या काढाव्यात ही आजगांवकरांची अखेरची इच्छा होती. वृद्धापकाळ ग्रासत होता. तरीही शासनाने दरमहा दीडशे रुपये मानवेतन सुरू केल्यामुळे सत्तरी ओलांडल्यावरही ते उमेदीने कामाला लागले. पण काम पुरं न होंताच वयाच्या ऱ्याहत्तराव्या वर्षी पंचावन्न साली त्यांचं देहावसान झालं. त्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी ‘प्राचीन मराठी संतकवी–भाग पहिला’ हा आजगांवकरांचा संकलीत ग्रंथ प्रसिद्ध केला. अजून दोन भागांचे आजगांवकरांनी हात फिरवलेले हस्तलिखित तयार आहे. त्याची प्रकाशनार्थ व्यवस्था कशी लावावी ह्याचा विचार करण्यासाठी सत्तावीस तारखेला दादरच्या ‘हरिनिवासा’त ग्रंथप्रेमी चहाते यांची अनौपचारीक सभा भरली होती. आजगांवकरांचे विमा कंपनीत काम करणारे चिरंजीव वडिलांच्या ग्रंथ प्रकाशनाचे काम पहायचे. पण दुर्दैवाने दोन वर्षांपूर्वी पन्नाशी नुकतीच कुठे ओलांडीत असताना त्यांना अचानक मरण आले. आता प्रका-शनाचं हे सगळं काम ‘हरिनिवासा’त राहाणाऱ्या त्यांच्या सूनबाईंवर पडले आहे. त्यांची गेली बरीच वर्षे खटपट चालू आहे. परवा त्यांनी बोलावलेली सभा तशी निराशाजनकच ठरली. कारण सभेला फक्त पाच सहाच मंडळी आली. अशा सभांना जायचं म्हणजे पैशांच्या खटपटींना हातभार लावणं हे उघडच होतं. एवढी यातायात कोण कशासाठी करणार ?

‘महाराष्ट्रभाषाभूषण’ ही पदवी आजगांवकरांना लो. टिळकांनी अर्पण केली. आपल्या अखंड लेखनाने आणि संत-

साहित्याच्या व्यासंगाने त्यांनी ती सार्थ केली आणि मिरवलीसुद्धा. हा अस्सल कोकणी वाण पंधरा – वीस वर्षांपूर्वी गिरगावात हरघडी दिसायचा. 'विविध-वृत्ता'शी त्यांचं फार दिवसांचं घनिष्ठ वळण होतं. पायात कोकणी वहाणा, आखुड धोतर, गळाबंद काळानीळा डगलेवजा बिनइस्त्रीचा कोट, डोईस शुभ्र फेटा, आणि हातात पिशवी अशा बाळबोध थाटातली त्यांची शिडशिडीत, ठेंगणी वृद्ध मूर्ती ठाकुरद्वारच्या हमरस्त्यावरून ये–जा करताना नेहमी दिसे. कोकण आणि मराठी संतसाहित्य ह्या दोन गोष्टी सोडल्यास त्यांना दुसऱ्या कशातही रस नव्हता. मांजरांच्या पिलांवर मात्र त्यांनी मन 'लोण्याहून मऊ करून प्रेम केलं. अर्धशतक अखंड साहित्यसेवा करूनही नव्या पिढीला त्यांच्याबद्दल नेमकी अशी काहीच माहिती नसे. 'मासिक मनोरंजन' कार काशिनाथ रघुनाथ मित्र हे-सुद्धा मुळातले आजगांवकरच. बंगाली साहित्य वाचून त्यांनी आपलं आजगांवकर हे सारस्वती आडनाव पालटून 'मित्र' हे नवं बंगाली आडनाव दत्तक घेतलं! पुढे तेच साहित्यात आणि व्यवहारात रूढ झालं. ह्या 'मनोरंजन'कार आणि 'म. भा. भू.' अशा दोघा आजगांवकरांनी मराठी साहित्यातला एक काळ गाजवला होता. एकदा ह्या म. भा. भूं. बद्दल 'मौजे'त त्रुटीत माहिती आली. त्यांना ते खपलं नाही. त्यांनी तावातावाने स्वतःच्या वाङ्मयीन कर्तृत्वाची खडान्खडा माहिती देणारं एक हातभर पत्र 'मौजे'त सतरा–अठरा वर्षांपूर्वी उत्साहाने प्रसिद्ध केलं. त्यात त्यांनी लेखन केलेल्या ज्ञात आणि अज्ञात अशा पंचवीस तीस नियतकालिकांची यादी होती. ज्ञानेश्वरांपासून थेट सोहिरोबा अंबियांपर्यंत सर्वांबद्दल त्यांनी उमाळ्याने लिहिलं. पुस्तिका लिहिल्या. लहान मुलांसाठी शंभर गोष्टींचं एक पौष्टिक पुस्तकही सत्तरी ओलांडल्यावर लिहिलं. ते बाळगोपाळात फार प्रिय ठरलं. संतसाहित्यात रममाण झालेल्या ह्या कनवाळू सज्जन माणसाने तरुण पिढीशी नातं ठेवण्याचा आपल्या परीने खूप प्रयत्न केला. आकाशवाणीचे ते सर्वांत जुने आणि जाणते वक्ते. बिलंदर-पणाची झुळूकही अंगावरून न गेलेला इतका साधा नि ऐसपैस गप्पाष्टकं झोडणारा गोष्टीवेल्हाळ लेखक आकाशवाणीवर क्वचितच कधी आला असेल. ते यायचे, व चहा मागवायचे आणि खुर्चीवर पाय दुमटून अलम् दुनियेतल्या ज्या रसाळ गप्पा सांगा-यला लागायचे, ते अगदी स्टुडीओजमधले इशाऱ्याचे लाल दिवे लागेपर्यंत! मग ऐनवेळी त्यांची धावपळ व्हायची. ध्वनिक्षेपणात भलत्याच चुका व्हायच्या. पण त्यांना हजार खून माफ होते. आकाशवाणीवाल्यांना त्यांनी अक्षरशः जीव लावला होता. आणि शून्य मिनिटांची नोटीस मिळूनही कुठल्याही विषयावर आढेवेढे न घेता घडा-घडा बोलू शकणारा निर्धोक विश्वासू वक्ता पथ्यपाणीवाल्या आकाशवाणीवाल्यांना तरी दुसरा कोण मिळणार होता? ते प्रेमळ माणसांचं बाळबोध जग आता मावळलं आहे.

वांद्र्याच्या खाटिकखान्यात कापायला नेण्यात येणाऱ्या दुखरू आणि आजारी गाई-

म्हशींची सोडवणूक स्वतःचा जीव धोक्यात घालून करून, त्यांना स्वतःच्या देखरेखी खाली स्वखर्चाने जनावरांच्या दवाखान्यात औषधोपचारासाठी पोहचते करणाऱ्या ह्या संतसाहित्यसेवकाला अस्ताला जाताना मात्र विपरीत जगरहाटीचे अतोनात चटके सोसावे लागले. ज्या 'विविधवृत्ता'च्या कचेरीत तटणी सकाकूंनी पाठवलेले बेसनलाडू खात खात त्यांनी नामदार जयकर, जम्नादास मेहेता आणि बॅ. आंबेडकर ह्यांच्या समवेत गप्पांचे फड रंगवले, त्याच कचेरीत अखेरीस ते सिंगल चहालाही महाग झाले! मु. म. लाड, डॉ. बी. बी. सामंत वगैरे अधिकाऱ्यांनी मध्यस्थी केली आणि त्यांना सरकारी मानवेतन सुरू झाले. पण नव्या मजुकराची जुळवाजुळव चालू असतानाच ते संतपदी विलीन झाले.

त्यांचे ते उरलेले दोन मोठे खंड कधी प्रकाशात येणार? काम कठीणच आहे. वाचकांच्या समोर लेखकाचं नाव नाही; शासकीय संस्थांना आस्था नाही; खाजगी प्रकाशनांना ग्रंथखपाची खात्री नाही; आणि वारसांजवळ द्रव्य नाही, अशा नाड्या चहूंबाजूंनी आवळलेल्या असल्यानंतर महाराष्ट्रभाषाभूषण झाला तरी त्याच्या ग्रंथकर्तृत्वाचं क्षितिज झाकोळूनच जाणार! उदंड उपेक्षा म्हणजे ग्रंथकाराचं मरणच होय, हे डॉक्टर जॉन्सनने दोनशे वर्षांपूर्वी उच्चारलेले शब्द किती जिवंत आहेत!

## कलात्म कुंभारकाम

बंगालच्या सिरॅमिक इन्स्टीटयूटमध्ये कुंभारकामाची विद्या हस्तगत केलेल्या कलकत्त्याच्या माणिक पॉल ह्या तरुण कारागिराच्या कलाकृतींचे प्रदर्शन सध्या जहांगीर हॉलमध्ये सुरू आहे. चिनीमातीची शोभिवंत भांडी बनविण्याचा धंदा पॉल मंडळी बंगालमध्ये वंशपरंपरेने करीत आहेत. बंगालचीच माती आणि बंगालमध्येच तयार होणारे मातकामाचे पक्के रंग यांचे मिश्रण करून माणिक पॉल ह्यांनी निरनिराळ्या आकारांच्या फुलदाण्या, वाडगे, पुष्पपात्रे, बाहुल्या तयार केल्या आहेत. वस्तूंच्या लयबद्ध आकृत्या आणि विविध रगांचा संभाळलेला तोल, ही ह्या प्रदर्शनाची वैशिष्टये आहेत.


## घरंदाज गायकी

आज सच्ची ग्वाल्हेरी गायकी ऐकायची असेल तर ग्वाल्हेरच्या पं. कृष्णराव पंडितांचंच नाव घ्यावं लागेल. सत्तरी ओलांडलेले पंडितजी आजही अंगभूत उत्साहाने आपल्या घरंदाज गायकीची विद्या शागिर्दांना देत आहेत नि स्वतः अतिशय

कसोशीने गात आहेत. मुंबईचे पं. शरश्चंद्र आरोलकर हे पं. कृष्णरावांचे गंडाबंद शागिर्द. पंडितजींकडून एकटक विद्या आत्मसात करून स्वतःलाही जाणकारांकडून 'पंडित' ही उपाधी लावून घेण्यापर्यंत आरोलकरांनी आपल्या साधनेची झेप दाखविलेली आहे. गेल्या आठवड्यात मुंबईला त्यांची एक मैफिल झाली दादरच्या वैद्य हॉलमध्ये. त्यांचा आवाज तसा गोड नाही. पण त्यांनी कसून पेश केलेल्या मिया मल्हार-तराणा आणि बिहाग ह्या दोन रागातल्या जोरकस बंदिषींमुळे गायकीच्या व्याकरणाच्या अंगाचे ते प्रभावी भाष्यकार आहेत ह्याची श्रोत्यांना खात्री पटली. नारायणराव इंदूरकर आणि शांताराम जाधव ह्यांनी त्यांना साथ केली. □

## प्रदर्शन....

कलाकुसरीच्या सुंदर आणि सुबक वस्तु निर्माण करण्यात पाश्चिमात्य देशाने केवढी आघाडी मारली आहे ह्याचं प्रत्यंतर जहांगीर आर्ट गॅलरीत चालू असलेल्या युगोस्लाव्हियाच्या कलाकृतीच्या प्रदर्शनावरून दिसून येतं. ॲल्युमिनीयम आणि तांब्याची भांडी, कोरलेल्या अगडबंब मेणबत्त्या, लोकरीचे गालीचे, मातकाम, काचकाम ह्याच्या डोळे निववणाऱ्या कलात्म वस्तु ह्या प्रदर्शनात मांडून ठेवल्या आहेत. कॉफीपानाची पात्रे इतकी रंगसंगतीने युक्त आहेत की रसिकांचे पाय जागच्या जागी खिळून राहातात. वस्तु लहान असो वा मोठी असो, ती मुलायम आणि सुघटित करण्यातच युगोस्लाव्ह कामगारांनी आपली कला कृतार्थ मानली आहे. पेपरवेट, साड्या, स्कार्फ्स, गालीचे, असं जे जे म्हणून पहावं ते ते मनोहारी वाटलं. आपल्या देशातल्या हस्तकौशल्याच्या नमुन्यांची अशी दिलचस्प प्रदर्शनं परदेशात भरवली जातात काय? तशी सरकारी योजनेबरहुकूम भरविली जात असतीलही. मुद्दा आहे तो अशा राष्ट्रीय पातळीवर कलात्मतेच्या निकषावर त्या उतरतात की नाही. युगोस्लाव्हियाचे हे प्रदर्शन पाहिल्यावर भारतीय प्रेक्षक युगोस्लाव्ह कारागिरांच्या समीप जातो हे मात्र खरं. □



रतनलाल भडारी

# शूटिंग... शूटिंग

धक्याला बोट लागते आणि कोरे करकरीत कपडे घातलेल्या मंडळींचा नवा ‘स्टॉक’ रंगाने माखलेल्या गर्दीत वहात येतो. पोरांच्या जमावातील उत्साहाची लाट समोरच्या माडाच्या शेंड्यावर जाऊन आदळते. डब्यातला रंग हातावर चोपडला जातो आणि मग सावज हेरीत, नजरांनी एकमेकांना खुणावीत, काही पोरं पोर्टच्या सिमेंटच्या बाकड्यांवर बसून रहातात. भिरभिरत्या नजरेने, घाबरलेले, थोडेसे बावळट चेहरे टिपीत रहातात.

मग पोर्टच्या धर्मशाळेत सामान लावून घेण्याची चाललेली घाई कुणाच्यातरी लक्षात येते. कोणीतरी चुटकी वाजवून म्हणतं, “अरे यार, शुटींग... शुटींग.’

‘आयला, उर्मिला आली वाटते.’ पोर्टसमोर उभ्या असलेल्या हिरव्या जर्द ॲम्बॅसिडरवर नजर कोरीत कोणीतरी म्हणते, आणि मग रंगपंचमी रहाते बाजूला आणि सगळी तमाम पोरं, वय वर्षं पाच ते पंचवीसपर्यंतची, गाडीभोवती कोंडाळं करतात. त्यापेक्षा वरच्या वयाची थोर मंडळी आपलं पोरपण चोरीत नुसतीच डोकावून जातात.



पोर्ट ऑफीसर वधुपित्यांसारखे आलेल्या 'धाकट्या वहिणी'च्या वऱ्हाडाची सोय करीत असतात. खालचा सूट अरुणला, वरचा उर्मिलेला! शेजारच्या सूटमधला पोलिस अधिकारी नागरी कपड्यातून रंगीबेरंगी तमाशा पहात सूट अडवून बसलेला असतो. पोर्ट ऑफीसरचे गणित चालू असते. खालचा हिरोला, वरचा हिरॉईनला, दिग्दर्शकाला कुठे ठेवावे! गणित सुटत नसतं.

हिरव्या गाडीतल्या पुढच्या ड्रायव्हर सीटवरून दोन डोळे आजूबाजूच्या पोराटोरांना न्याहळीत असतात. 'धाकटी बहीण' चित्रपटाच्या शूटिंगची 'मंडळी' डेरेदाखल झाल्याचे वृत्त रॉकेलला काडी लावावी तसे गावाच्या आत आत घुसलेले असते. त्या उत्सुक गर्दीकडे उर्मिला जरा भेदरलेल्या नजरेनेच पहाते. न जाणो कुणीतरी रंग उडवावयाचा! हिरव्या टाईट कपड्यात तोळाभर शरीर आवळलेले असते. गोऱ्यापान नितळ चेहऱ्यावर बेदरकारपणाही असतो. खोटा! आपण कोणीतरी आहोत, 'ए सब किस झाडकी पत्ती' असा आव आणलेला असतो. पण लहान वयातली उत्सुकता डोळ्यांना मधूनच फसवीत असते. रूपाचा सार्थ अभिमान, गर्विष्ठपणा, बेफिकीरी आणि बेदरकारी ही चेहऱ्यावर चिटकवलेली फिल्मी लेणी पाघळत असतात. नाकाचा आखूड शेंडा मधूनच, उगीचच थरथरतो. ओठ काहीतरी बोलू इच्छितात, पण शब्दांना करकचून ब्रेक लावलेला असतो.

लांब राहून कोणीतरी मोठ्याने ओरडते, 'अरे, नटीच्या अंगावर रंग फेका. पंचमी आहे ना आज.'

'रंग उडवाल रे, पण सवय आहे का विचारून घ्या.' कोणीतरी तंबाखूची पिक पचकन् थुंकावी तसे शब्द थुंकतो. सगळ्या गर्दीतून जीवघेणे फिदी फिदी हसू पिचकते.

गाडीतला हिरवा ससा मान खाली घालून ओठंगून जातो. 'रेखाजी ऽ' निर्मात्यांच्या हाकेने आणि मूळ नावाच्या उच्चाराने नवा आत्मविश्वास आकार घेतो. नेहमीच्या संवयीप्रमाणे ती मानेला स्प्रींगसारखा झटका देते.

"रेखाजी उपर आईये." निर्माते बोलावीत असतात. खाड्कन् दार उघडते. हिरवा ससा बाहेर येतो. गर्दी कळसूत्रीपणे दुभंगते. आणि मग टण् टण् उड्या मारीत हिरवा ससा आपल्या बिळात जातो.

तिच्या एकंदर देहयष्टीकडे पहात गर्दीतला माणूस म्हणतो, 'आयला, भलतीच कवळी आहे.' आणि एकमेकांचे चोपडलेले चेहरे गर्दी उगाचच काही वेळ निरखीत बसतात. पण गर्दी...गर्दीला चेहरा नसतोच मुळी. असते फक्त लाल भडक नजर.

धर्मशाळेत, अवजड सामानांच्या ओळीत चंदाम्मा बसलेली असते. शरीरातले सारे अवयव किल्ली संपलेल्या खेळण्यासारखे लुळे पडलेले असतात. पांढऱ्या केसांची एक शुभ्र बट तेलकट चेहऱ्यावर लोळत असते. इतक्यात कोणीतरी तंत्रज्ञ येतो आणि तिला फर्मावतो. "ए चंदाम्मा, इथे कुठं फतकल मारून बसलीस. अजून सामान लावायचंय्."

चंदाम्मा सगळे अवयव गोळा करून उठते, आणि त्याला म्हणते, "ए पोरा, जरा तंबाखू दे ना यार. मै मिसीरी लगाउंगी."

"देंगा बाबा देंगा. जरा पहले सामान का देखने दो." तंत्रज्ञ तिला डाफरतो. ती दूरवर दिसणाऱ्या पडावांच्या फडफडत्या शिडांकडे पहात असते. जणू तिचे जातेपण ती धुंडाळीत असते.

◻

"तुम्ही माझे प्राण वाचवलेत..." उर्मिला अरूणच्या चेहऱ्याकडे न पाहताच बोलत असते. चेहऱ्यावर कृतज्ञतेचा ब्रश फिरवलेला असतो. स्नेहाळ, भारलेले डोळे स्वतःच्या शब्दात हरवलेले असतात.

"माझ्या जागी कुणीही माणूस असता तर हेच केले असते." अरूण आपली सागराचा मागोवा घेणारी नजर न हलविता सुकाणू फिरवीत असतो. नजरेत आणि शब्दात एक प्रकारचा बेदरपणा असतो.

ट्रायल संपते. दिग्दर्शक 'टेक' म्हणतात. सुकाणूच्या मागे आपला पसारा मांडून बसलेली चंदाम्मा उठते. उर्मिलेच्या चेहऱ्यावरून पावडरचे फूल फिरवते. आरक्त ओठ अधिक भडक होतात. हातातला आरसा उर्मिलेच्या समोर धरून

चंदाम्मा टक लावून बघते. हरवलेली मीनाक्षी अजून मूडमध्येच असते. दृश्य सुरू होते.

दिग्दर्शक 'ओ. के.' म्हणतात. वातावरणातला ताण ढिला होतो. अवघडलेले श्वास पुन्हा सुरू होतात.

दिग्दर्शकांनी कॅमेरा ट्रॉलरचा पाठलाग करणाऱ्या ट्रॉलरवर रोखलेला असतो. मागच्या ट्रॉलरवरून लुटुपुटीचे पोलीस पाठलाग करीत असतात. दिग्दर्शक 'लाँग शॉट' चित्रित करीत असतात. केबीनमध्ये उर्मिला आणि अरूण यांचा नर्म विनोद सुरू असतो. केबीनच्या मोकळ्या जागेतील तीन चतुर्थांश जागा अडवून चंदाम्मा त्या दोघांच्या लाडीक बोलण्यात आपली गेलेली जिंदगी हुडकत असते. आपण-देखील असेच हसायचो. उगाचच अधोमुख होऊन हिरोला घायाळ करायचो. दिग्दर्शकांचा 'शूम' असा आवाज चंदाम्माच्या कानावर आदळतो. कॅमेऱ्यातली लॅन्सीस फिरू लागतात. दूरवर दिसणारी दृश्ये कॅमेरा जवळ खेचीत असतो.

चंदाम्मादेखील अशीच होती. शोडष वर्षा, नाकी डोळी नीटस, रंग थोडा सावळा होता...गव्हाळ, पण स्क्रीन फेस मोहक होती. कधी तिने एखाद्यावर मुद्दाम बाण सोडला तर पाडाचा अंबा पटकन खाली पडावा तसे पुरुष तिच्या पायाशी टपकत असत. तिच्या बोलण्यामुळे तर भली भली सावजं अडकून रहायची. एकेका सौभाग्य-वती नटाला तर तिच्या नजरेतून सुटका करून घेता घेता ब्रह्मांड आठवायचे. पण...

पण शेवटी चंदेरी दुनियेतले चांदणे त्या धुंद आठवणी आणि तीन पोरांचा पोर-वडा मागे ठेऊन वितळून गेले. त्यांना जगविण्यासाठी चंदाम्मा आता मेक-अप्-मन झाली. हिरॉईन ते मेक-अप्-मन या प्रवासात शरीरसौंदर्याची वाताहत झाली.

थोरली बेबी आता मोठी झाली होती. पण तिच्या वाट्याला आईचे रूप फारसे आले नव्हते. तिने कुणाचे रूप चोरले होते ते चंदाम्मालादेखील सांगता आले नसते. अजूनदेखील तिचे पत्रातले शब्द तिला आठवत होते. " आई, आमच्यासाठी तू किती करतेस ? तुझी उपेक्षा झाली तरी तुझ्यातली आई अजून मरत नाही. अशा सृष्टीत तू वावरतेस की जिथे आता तुझ्यासाठी फक्त हेटाळणी शिल्लक आहे."

चंदाम्माच्या नजरेसमोर तीन्ही मुलांचे चेहरे तरळत होते. मुलांची शाळेची फी दिली पाहिजे. छोरल्या बेबीला आता साडी घ्यावयाला पाहिजे. घरमालकांचे भाडे, हिशोब घालावयाचा म्हटलं तर कितीतरी गोष्टी. या यादीला मुळी अंतच नव्हता. द्रौपदीच्या वस्त्रांसारखा त्यांचा ढीग साचला होता.

दिग्दर्शक 'कट्...कट्' म्हणून ओरडतात. इतका वेळ पाठलाग करणारे पोलीस चंदाम्माकडे उगीचच वाकून पहातात. भरतीच्या लाटांवर लेफ्ट राईट करीत डुलणारा ट्रॉलर दिशा बदलून माघारी फिरतो.

इथे पाणी शांत असते. सूर्य कललेला असतो. दमली भागलेली उर्मिला शुटींग आटोपून नांगराच्या टोकाशी एखाद्या भारलेल्या राणीसारखी बसलेली असते.

खाडीच्या दोन्ही तीरावर पाय रोऊन बसलेल्या समाधिस्थ वृक्षांचा गंभीर गारवा ती नजरेने पिऊन घेते. हिरो अरूणचे शूटिंग सुरू असते.

उर्मिलेच्या पायाशी बसून कुणीतरी फिल्मी खबरे सांगत असतो. ती बिचारी ' आजीची गोष्ट ' ऐकावी तशी हूं हूं म्हणून हुंकार देत असते. त्याच त्या कथांचे चर्वितचर्वण ऐकून ती कंटाळलेली असते. डोळे मात्र लहान पोराच्या नजरेने सृष्टीचे हिरवेगार स्वरूप टिपीत असतात.

पोलीस झालेले ' एक्स्ट्रा ' सर दुरूनच हे सारे पहात असतात. आपल्या हातातला पोलिसांचा दंडा कुरवाळीत बोलावे किंवा बोलू नये म्हणून सर अवघडून उभे असतात.

" रेखाजी, एक शेर सुनाऊं ?" सर जरा दबकतच विचारतात.

ती एकदा ' त्या ' अवतारातल्या ध्यानाकडे अविश्वासू नजरेने पहाते. " इन्हें पुलीस मत समजना. हमारे स्कूलके उस्ताद है." कोणीतरी पोलीसाच्या ड्रेसमधल्या सरांची उंची वाढवितो.

" जरूर. जरूर सुनाईये." वाऱ्यावर उडणारी आपली बट सारखी करीत उर्मिला उद्गारते.

सर जरा खाकरतात. हाफ् पॅन्ट उगीचच ' टेंपररी बाळू'सारखी वर ओढतात. क्षणभर रोखून पहातात. समोर आपली विद्यार्थीनी बसली आहे असे समजून शेर सुनावतात.

" खुशबु नही है फुलोमें, सुंगनेसे क्या फायदा ?
दिल नही है सीनेमे, मिलनेसे क्या फायदा ?"

तिला हे माहीत असल्यासारखे त्याच ओळी ती पुटपुटते. क्षणभर डोळे मिटतात आणि मग ओठातून गोड हसू फुटते. सर सुखावतात. " पसंद आया आपको ?"

" माशाल्ला ! " पुन्हा एकदा मीनाक्षांची उघडझाप होते.

हळूहळू सरकत्या उन्हाबरोबर गप्पा सरकतात. हंसा वाडकर, जहागिरदार, नाना पळशीकर यांच्या यशापयशाची चर्चा रंगत जाते. सर आपले वर्गात रंगल्यासारखे बोलत असतात. मधूनच रुपेरी दुनियेतले ऐकीव खड्डे दाखवीत असतात. तीही वर्गातल्या विद्यार्थिनीसारखी रंगात आलेला पाठ ऐकत असते. मधूनच एखादे वाक्य बोलून माहेरी आलेल्या पोरीने आपले गुपीत आईला सांगावे तसे सरांना सांगत असते. मधून मधून, बोलता बोलता, सर विद्यार्थिनीच्या मनावर धडा बिंबलाय की नाही हे पहायला चुकत नाहीत.

" मुंबईला आल्यावर आमच्याकडे या हो." औपचारीकपणा आकार घेऊ लागतो. आवाजात एका सामान्य माणसाशी बोलण्यात वेळ घालविला याची जाणीव असते.

" पण मला तुमचा पत्ता ठाऊक नाही." सरांच्या शब्दात डिफीकल्टी सोडवायला आलेल्या विद्यार्थ्याचा ' प्रॉब्लेम ' असतो.

"मी सूटवर गेल्यावर देईन तुम्हाला." या आश्वासनाने सरांना उगाचच कृतकृत्य झाल्यासारखे वाटते.

'शूटिंग क्लोज्ड' कोणीतरी पुकारा करते. उर्मिलामधली 'रेखा' क्षणार्धात आत्महत्या करते. चेहऱ्यावर उर्मिलेचा मुखवटा ती झटकन् ॲडजस्ट करते. शूटिंग संपल्यामुळे तंत्रज्ञ आणि एक्स्ट्रा लाट फुटावी तसे ट्रॉलरवर सर्वत्र घरंगळतात. हिरो अरूण कॉलेजकुमारासारखा उर्मिलेसमोर बैठक मारतो. गोड स्वरात स्वतःच मोठ्याने गाऊ लागतो, "यमुनाजळी कृष्ण बुडाला." सर बिचारे यमुनेच्या डोहात बुडालेल्या कृष्णाला धुंडाळीत असतात. ट्रॉलर वेगाने 'रिटर्न टू दाभोळ' निघालेला असतो. ट्रॉलरमध्ये पोस्टाच्या पाकीटाला चिकटविलेल्या तिकिटासारखे सर चिकटून बसलेले असतात.

पोर्ट ऑफीससमोर हिरवी ॲम्बॅसिडर गाडी दरवाजा अडवून उभी असते. आजू-बाजूला गावातल्या पोराटोरांची मरणाची गर्दी जमलेली असते. ते सारे 'नटी कशी जाते' हे पहायला जमले आहेत याची उर्मिलेला जाणीव असते. चंदाम्मा गाडीत सामान लावीत असते. पोर्ट ऑफीसर लग्नघरातल्या जबाबदार माणसां-सारखे सर्वत्र फिरत असतात. ऑफिसच्या व्हरांड्यात सर एखाद्या 'अनाहुता' सारखे अलिप्तपणे सोहळा पहात असतात. त्यांना फक्त एकच आशा असते. 'रेखाजी' आता झटकन येईल आणि म्हणेल, "हा घ्या माझा पत्ता. मघाशी प्रॉमिस केलंय ना मी."

वरच्या सूटमधून रेखाजींच्या कोणीतरी नातेवाईक बाई खाली येतात. चालण्यात सुद्धा 'नटीच्या कोणीतरी' असा रुबाब असतो. सामान नीट लावलं गेलंय की नाही ते त्या सराईत नजरेने न्याहाळतात. चंदाम्माला जवळ हाक मारतात. ती आपला स्थूल देह सावरीत त्यांच्याजवळ जाते. आपल्या पर्समधून पाच रुपयांची हिरवी नोट काढून आणि तोंडभर हंसून म्हणतात, "ही घे तुला."

"एवढेच कसे ?" चंदाम्मा घडी उलगडत म्हणते.

"अग आता एवढे तर घे. रेखा आता हिंदीत जाणार आहे. तेव्हा आम्ही तुला विसरणार नाही. एऽ तुझी बेबी कुठाय ग ?"

"हाय की घरी."

"अग तिला घेऊन ये ना बॉम्बेला. तिला छान स्कर्ट शिवणार आहे मी."

"पण..."

"आता काही सुद्धा बोलायचं नाही. हे बघ तु कोल्हापूरला गेल्यावर लेटर पाठव..."

चंदाम्माला शब्दच सापडत नाही. सगळे त्या दोघींकडे बघत असतात. परि-चयाची माणसे नेहमीचेच म्हणून आपआपल्या कामात मग्न असतात. रेखा, उर्मिला बनून पंजाबी ड्रेसात फुलपाखरासारखी बागडत सूटमधून खाली येते. लहान मुलाला

उन्हाळ्याची सुट्टी लागावी तसा तिला आनंद झालेला असतो. "बाय ऽऽबाय"

तिला समोर चंदम्मा दिसते. एखाद्या वासरासारखी ती झेपावते. "चंदाम्मा ऽ आता बॉम्बेला ये गडे तूं." ती पटकन् लहान मुलासारखा तिचा पापा घेते.

समोरचे सर तिला दिसतच नाहीत. सरांना वाटते, "आता पत्ता मागावा का?" पण त्यांच्या पायांना शक्ती नसतेच मुळी. ते खुळ्यासारखे चंदाम्मालाच न्याहळीत असतात. तिची अजीजीची बेंगरूळ मुद्रा जळवेसारखी त्यांच्या मनाला डसून बसते. पुन्हा एकदा अनुपमा गर्दीला "बाय ऽऽबाय" करते. हिरवी गाडी हॉर्न देते वेग घेते.

पोर्टच्या समोरच्या सिमेंटच्या बाकड्यात चंदाम्मा बसलेली असते. तिची नजर पाच रुपयाच्या घडी केलेल्या नोटेवरून हलत नाही. सरांना वाटते तिच्याजवळ जावे आणि तिचे घरंगळलेले अवयव गोळा करून तिला द्यावेत. मनात मघाचाच शेर डरकाळ्या फोडीत असतो.

"खुशबू नही है फुलोंमे..."

□ □ □

## लिंकनची वकिली

लिंकन अमेरिकेचा प्रेसिडेंट असताना खास त्याच्यासाठी बनविलेल्या दोन हॅटस् घेऊन दोन पगडबंध एकाचवेळी आले.

लिंकनने दोन्ही हॅटस् डोक्यावर ठेवून पाहिल्या.

प्रशस्तीची वाट पहात थांबलेल्या त्या प्रतिस्पर्ध्यांना लिंकन म्हणाला,

'या दोन्हीतील प्रत्येक हॅट दुसरीपेक्षा अधिक चांगली दिसते!'

अब्राहम लिंकनने वकिलीला नुकतीच सुरुवात केली होती. त्याच्या अशीलाने याच्याकडे एक केस सोपविली.

केसचे कागद वाचून होताच लिंकनने अधिक चौकशी केली तेव्हा त्याला असे आढळून आले की त्याने केस जिंकली तर एक विधवा आणि तिची सहा मुले यांना अक्षरश: रस्त्यावर येऊन पडावे लागेल.

तेव्हा त्याने आपल्या अशीलाला पत्र लिहून कळविले की मी तुमची केस जिंकेन यात तिळमात्रही शंका नाही; परंतु जीवनात कित्येक गोष्टी कायदेशीररीत्या बरोबर असल्या तरी माणुसकीच्या दृष्टीने त्या योग्यच ठरतात असे नाही. एक विधवा स्त्री व तिची सहा मुले यांना विपन्नावस्थेत टाकण्यापेक्षा, या केसमधून मिळणारे सहाशे डॉलर्स तुमच्यासारखी कर्तबगार व्यक्ती अन्यत्र कुठेही मिळवू शकेल!'

— इंद्रधनु



# पेटवलेल्या बंदुका उठलेली जनता

अनिल बर्वे

लेखांक : तीन

सहस्त्रस्तंभ मंदिराच्या देवदासीची घुंगुरं कानात किणकीणली–स्वप्ने सांडली ! लांब विस्तीर्ण मैदानावर हिरव्या गर्द राईत अधून मधून टूमदार बैठी कौलारू घरं डोकावत होती. गर्दी नाही, गजबजाट नाही. इतकं निरागस आणि लोभस शहर भारतात क्वचितच पहावयास मिळत असेल.

शहर वरंगळ !

काकतीय साम्राज्याची गतकाळातील वैभवशाली नगरी. दोन लाख वस्तीच्या शहरावर आता लाल सावल्या पडत आहेत. शहराच्या भिंतीवर जागोजागी विळा-हातोडा आणि क्रांतिवचने चितारलेली आढळतात--

सल्तनत बंदुक की नालीसे जनम लेती है ।

कन्यु संन्याल झिंदाबाद.

चेअरमन माओ झिंदाबाद.

भुके मरनेसे शहीद होकर मरना बेहेत्तर है ।

क्रांती चिरायु होवो.

वरंगळ शहरातील जनता अजून क्रांतीच्या तत्त्वज्ञानापासून बरीच दूर आहे. परंतु इथले विद्यार्थी मात्र क्रांतिगीतांनी भारावून गेले आहेत. इथली कॉलिजे म्हणजे भावी क्रांतिकारकांच्या पाठशाळाच बनल्या आहेत. गेल्या वर्षी चिचामल रेड्डी या मेडीकल कॉलेजच्या विद्यार्थ्यास नक्षलवादी म्हणून पकडण्यात आले आणि विद्यार्थी क्रांतिकारकांची एक भक्कम भूमिगत संघटना अस्तित्वात आली. पोलिसांच्या अमानूष दडपशाहीमुळे इथले विद्यार्थी तोंड उघडत नाहीत, परंतु त्यांचे कार्य मात्र चालूच असते. अधूनमधून शहरातील भिंती क्रांति-घोषणांनी चितारण्यात येतात तर कधी कधी सशस्त्र क्रांतीचे आवाहन असलेली पत्रके प्रसृत करण्यात येतात. नियमीतपणे अभ्यासवर्ग भरतच असतात. नक्षलवादी वाङ्मय व व मुखपत्रे यांचे वाचन चालू असते. जंगलात लढत असलेल्या नक्षलवाद्यांना विविध प्रकारची मदत बेमालूमपणे पोचवली जात असते. इथले विद्यार्थी सरकारी पोलिसांची एक डोकेदुखीच आहे.

मेडीकल कॉलेजच्या हॉस्टेलवर काही विद्यार्थ्यांना मी भेटण्यास गेलो. मला सी. आय. डी. समजून, माझ्याची उर्मटपणे वागून त्यांनी मला अक्षरशः हाकलून दिले. पाच सहा दिवसानंतर माझ्याविषयी असलेला त्यांचा गैरसमज दूर होऊन त्यांनी माझ्याशी मनमोकळेपणे चर्चा केली. सर्वस्वाचा त्याग करून निष्ठेने लढणाऱ्या नक्षलवादी नेत्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा प्रभाव त्यांच्यावर फार मोठा होता. 'सुरी' या तरुण क्रांतिकारकाचे नाव अत्यंत आदराने उच्चारले जाई. विद्यार्थ्यांकडे मला 'गुरीला वॉर फेअर'वरची काही पुस्तके व नक्षलवादी प्रचार वाङ्मय वाचावयास मिळाले. माओचे विचार मात्र मिळाले नाहीत. हे सर्व विद्यार्थी स्कॉलर व सुखवस्तू घराण्यातील आढळले. परंतु त्यांना व्यापक सामाजिक जाणीव लाभल्याने महाराष्ट्रातील स्वार्थी, स्वकेंद्रीत व करीअरच्या मागे लागलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा ते मला फारच वरचढ वाटले. वरंगळच्या प्रत्येक कॉलेजातून स्टडी सर्कल्स असून क्रांतिकारक विचारांचा अभ्यास त्यातून केला जातो. अशा एका स्टडी सर्कलला उपस्थित रहायची संधी मला मिळाली. हजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व त्यांचे राजकीय विचार पाहून मी थक्क झालो.

विद्यार्थ्यांची ही कडवी संघटना सत्यमूर्ती या वरंगळमधील शिक्षकाने बांधली. त्याने शिक्षकांचीही भक्कम संघटना बांधली होती. काही काळ तो डाव्या कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ताही होता. सत्यमूर्ती यास अटक करून तुरुंगात टाकले होते. परंतु जेलची भिंत फोडून तो पळाला. सर्वत्र अशी वंदता आहे की जेलमधल्या शिपायांनीच भिंत फोडून त्यास पळण्यास संधी दिली. सत्यमूर्तीविषयी वरंगळच्या विद्यार्थ्यांना फार आदर व प्रेम आहे. श्रीकाकुलम येथील आदिवासींचा अनभिषिक्त राजा व क्रांतिकारक 'सत्यम' हाही एक शिक्षकच होता. श्रीकाकुलममधील क्रांतिकारक संघटना शिक्षकांनीच बांधली. पैसा हाच निकष असलेल्या प्रस्थापित सट्टेबाजांच्या समाजात शिक्षकालाही त्रिकट घेऊन मास्तरडा ठरवले गेले. शाळा-मास्तरांच्या वाट्याला अवेहलना, अपमान व दारिद्रय तेवढे आले. हा शिक्षकवर्गच आता नव्या भारताचा उज्वल इतिहास घडवण्याकरता क्रांतिकारकांच्या आघाडी-वर आपल्या प्राणांचे मोल देत आहे. आचार्य देवो भव म्हणतात ते काय खोटं आहे ?

हिंदुस्थान नावाच्या साम्राज्यवाद्यांच्या प्रचंड बाजारपेठेत विद्यापीठे-संशोधन शाळांच्या पेढयांवर आपल्या 'मालकां'च्या जमाखर्चाच्या खतावण्या भरणाऱ्या बेगडी बुद्धिवाद्यांना या शिक्षकांविरुद्ध ओरडा करण्याचा काहीही नैतिक अधिकार नाही. इथल्या सहनशील, सात्विक, प्रामाणिक शिक्षकांनी सर्व मार्ग खुंटल्यावर, अत्यंत उशिरा शस्त्र हातात घेतले आहे. शस्त्र हातात घेण्याआधी कधी एकदा साने गुरुजींच्या रूपाने तो झिजून झिजून मेला आहे. फुलांवर-मुलांवर-पाखरांवर इथल्या संस्कृतीवर—माणूस जातीवर ज्याने आईच्या ममतेने प्रेम केले त्या साने गुरुजींचा इथल्या सत्ताधाऱ्यांनी व शोषकवर्गांनी 'खून' केला. त्या खुनाचे प्रायश्चित ते आता भोगत आहेत.

वरंगळ जिल्ह्यात नरसमपेठ, मुलुग व मेहबुबाबाद हे तालुके नक्षलवादी क्रांति-कारकांनी व्यापले आहेत. या सर्व विभागाला लष्करी छावणीचेच स्वरूप आले आहे. या सर्व विभागामध्ये प्रत्यक्ष निरीक्षण करण्यासाठी सारंगपाणी या विद्यार्थी दुभाष्यास बरोबर घेऊन वीस जुलैला वरंगळ सोडले. वरंगळपासून सुमारे पस्तीस मैलांवर मुलुग हे तालुक्याचे गाव वसले आहे. मुलुग जसजसे जवळ येऊ लागले तसतसे जंगल दृष्टीस पडू लागले. मुलुग ओलांडून आणखीन आत गेले की घनदाट जंगल लागते.

मुलुग बसस्टँडवरची पाच सहा किरकोळ हॉटेलच त्या गावचे दारिद्रय दाखवतात. संपूर्ण पाच हजार वस्तीच्या गावात चार चांगल्या इमारती काही नाहीत. सरकारी डाक बंगला, पोलीस स्टेशन, क्वार्टर्स सोडल्या की बाकी सर्व घर नावाची खोपटी दृष्टीस पडतात. गावात हमरस्त्यावरच कम्युनिस्ट पक्षाचे ऑफीस आहे. ते सदैव बंद असते. सभा किंवा कार्यक्रम असला की तेवढया पुरतेच ते

उघडले जाते. या विभागात उजव्या कम्युनिस्टांचा जोर असून एस्. राजेश्वरराव हा त्यांचा पुढारी आहे. परंतु तो मुलुग येथे रहात नसल्याने ऑफीस बंद असते. या विभागात नक्षलवाद्यांनी अतिशय जोर धरल्याने स्पेशल डी. एस्. पी. ची नेमणूक करण्यात आली आहे. ए. गोपाळ रेड्डी हे तेथील डी. एस्. पी. घनपूर येथे गेल्याचे समजले. तेव्हा ट्रक पकडून घनपूरला गेलो.

सर्वत्र ताडाची झाडे व ताडाच्या झाडांवर चढून ताडी काढणारे काळे टोळीवाले, गनिमी सैनिकांसारखे भासत होते. कमरेला दोर-सुरा-कोयता असलेले हे आदिवासी सरसर झाडावर चढतात. वाटेत अधून मधून भाला-कुऱ्हाडी घेऊन चाललेले शेतकरी दिसत होते. त्यांच्या नजरेतूनच त्यांची दैन्यावस्था दिसत होती.

घनपूर गाव आले. घनपूर हे पी. रामनरसय्या या नक्षलवादी क्रांतिकारकाचे गाव. जंगलामध्ये हे वसले आहे. पी. रामनरसय्या दहा वर्षापूर्वी येथे येऊन स्थायिक झाला. त्याची स्वतःची पोटापुरती दहा एकर जमीन आहे. पी. रामनरसय्या भूमिगत असल्याने त्याची जमीन त्याचा सासरा कसतो. पी. रामनरसय्याला बायको व दोन मुले आहेत. पी. रामनरसय्याने गरीब शेतकऱ्यांची व भूमिहीन शेतमजुरांची भक्कम संघटना बांधली व वेळोवेळी तो अन्यायाविरुद्ध उभा राहिला. गावात लोकांच्या अडीअडचणीच्या वेळी सदैव उपयोगी पडणाऱ्या या लोकनेत्याबद्दल गावातील पोरापासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्वांनाच आदर आहे.

संतोष चक्रवर्ती या मुलुगच्या जमीनदाराविरुद्ध पी. रामनरसय्याने ६७ साली निवडणूक लढवली. परंतु अफाट पैसा, सरकारी यंत्रणा आणि मतपेट्यांच्या आदलाबदली इत्यादी सर्व प्रकार घडून आल्याने लोकांवर जास्त प्रभाव असूनही पी. रामनरसय्या निवडून येऊ शकला नाही. संतोष चक्रवर्ती यांची दीडहजार एकर जमीन असून मोठे घर, जिपगाड्या त्यांच्याकडे आहेत. इथे मला विशेष आढळले ते हे की, जमीनदाराविरुद्ध लोकांच्या काही तक्रारी नाहीत व पोलीसच या जमीनदारावर संशय ठेवून आहेत. काळाची पावले ओळखून वागत असल्याने नक्षलवाद्यांकडून या जमीनदारास काही त्रास झाला नाही. मात्र करवसुली झाली.

संतोष चक्रवर्ती यांना नक्षलवाद्यांचा हुकूम आला. त्यात दहा हजार रुपये कर भरण्याविषयी लिहिले होते. त्वरित संतोष चक्रवर्ती यांच्या घरावर सशस्त्र पोलिसांचे पहारे बसले; परंतु गडी माणसाच्या रूपाने एक नक्षलवादी घरात शिरला. संतोष चक्रवर्तीवर पिस्तुल रोखून त्याने कर वसूल केला व त्याच्यासह त्याच्याच जीपमधून तो गावाबाहेर आला. तेथे आमदार महाशयांना उतरवण्यात आले व जीप पुढे विवक्षित ठिकाणी सोडून देण्यात आली. ही चित्तथरारक कथा ऐकून मी आमदार महाशयांना भेटण्यास गेलो, परंतु विधानसभेची बैठक चालू असल्याने ते हैद्राबादला गेले होते.

घनपूर येथे बडे जमीनदार आहेतच. पिंगळी कोदंडा रामरेड्डी या जमीनदाराची




दहा हजार एकर जमीन आहे. या सर्व विभागातले जमीनदार व पोलीस रामनरसय्याला पकडण्यासाठी आतूर झाले आहेत. धनपूर जवळच्या पालमपेठ येथील चहाचा दुकानदार मला म्हणाला, 'पी. रामनरसय्याला पकडण्यासाठी व त्याचा पत्ता काढण्यासाठी खेड्यातील गावकऱ्यांना पोलिसांनी अमानूष मारहाण केली.' सय्यद मोहीनुद्दीन हा तो लहानसा चहाचा दुकानदार सांगत होता–गावातले कित्येक लोक पी. रामनरसय्याला मदत पोचवतात.

पी. रामनरसय्या हा फारसा शिकलेला नाही. परंतु अभ्यास व प्रत्यक्ष कार्य यामुळे तो 'कम्युनिस्ट रेव्होल्युशनरी पार्टीचा' प्रथम श्रेणीचा पुढारी झाला आहे. त्यानेच प्रथम वरंगळ जिल्ह्यात सशस्त्र लढा संघटित केला. तो वरंगळ विभाग समितीचा प्रमुख असून पोलीस हात धऊन त्याच्या मागे लागले आहेत. परंतु कितीही छळ केला तरी गावकरी त्याचा ठावठिकाणा देत नाहीत.

मी गेलो त्या दिवशी धनपूरचा आठवडे बाजार भरला होता. डोंगराळ भागातले आदिवासी मीठ–मिरची घ्यायला गटागटाने येत होते. बाजाराला आलेल्या उपलय्या नावाच्या व्यंकटापूर या खेड्यातील शेतकऱ्याची मी विचारपूस केली. त्याची फक्त दोन एकर जमीन आहे. कुटुंबाचे पालन–पोषण या जमीनीवर शक्य नसल्याने अल्प मजुरीवर राबावे लागते. तो मला सांगत होता, गावातल्या ऐंशी टक्के शेतकऱ्यांची जमीन सावकाराकडे गहाण असून शेतीची संपूर्ण अवजारे कुणाकडेच नाहीत. गावातले अर्धे अधिक लोक अर्धपोटी राहतात. सावकाराचे कर्ज महिना रुपयाला दोन आणे चक्रवाढ व्याजाने मिळते. सरकारी मदत छोट्या शेतकऱ्यांना मिळतच नाही. गावात 'नरसिंह रेड्डी' या जमीनदाराची ५०० एकर जमीन असून त्यापैकी चारशे एकर जमिनीवर शेती करण्यात येत नाही. जिथे जिथे गेलो तिथे सर्वत्र हीच ओरड आढळली. नंतर नंतर मात्र ही अर्धपोटी माणसं इतकी सहनशील कशी याचेच आश्चर्य वाटू लागले.

भारतामध्ये असंख्य आदिवासी टोळया आहेत, परंतु सातपुडयातले भिल्ल व नागा, मिझो सोडले तर बाकीचे आदिवासी शांत वृत्तीचे व बरेचसे भेकड आहेत. आपणास वाटते त्याप्रमाणे क्रूर किंवा लढाऊ नाहीत. यांना एकत्र करून लढयास संघटित करण्याकरता येथल्या क्रांतिकारकांनी फार तपश्चर्या केली आहे.

मी घनपूर स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनच्या व्हरांडयासमोर वाळूची पोती रचून ठेवली होती. नक्षलवाद्यांनी पोलीस-होमगार्डस्ना बरीच दहशत बसवली आहे. डी. एस. पी. महाशय मुलुगला परतत होते. मुलुगला गेल्यावर सविस्तर माहिती देतो असे ते म्हणाल्याने त्यांचेबरोबर मीही मुलुगला निघालो. बसमध्ये तीस पस्तीस सशस्त्र पोलीस धडाधड चढले. वाटेत गावोगावी ते पेट्रोलींगला उतरणार होते. डी. एस. पी. साध्या कपडयात होते. वाटेत ठिकठिकाणी गस्ती तुकडयांना आदेश देण्याचे काम चालले होते. परंतु एवढया कडक पहाऱ्यानेही नक्षलवाद्यांच्या हालचालींवर काहीही परिणाम झाला नव्हता. कारण दोन दिवस आधीच पदीपमपुला येथे दोन जमीनदारांचा खून झाला होता व त्याच्याच तपासासाठी डी. एस्. पी. येथे आला होता.

डी. एस. पी. गोपाळ रेड्डी यांच्याबरोबर मी मुलुगला आलो. पोलीस स्टेशनसमोरच्या पटांगणात आम्ही खुर्च्या मांडून बसलो. बोलता बोलता सहज समजले की डी. एस्. पी. एकटेच बसमधून घनपूरला गेले होते. पोलीस स्टेशनभोवती फारसा पहारा नव्हता. दाट काळोख, आजूबाजूला दाट झाडी-तिची लांबलचक भेसूर सावली अशा परिस्थितीत डी. एस्. पी. ला पळवून नेणे सहज शक्य होते. आसाममध्ये नागा मिझोंनी हे तंत्र फार वापरले. परंतु आंध्रमध्ये नक्षलवाद्यांनी आजपर्यंत असा एकही प्रयत्न केलेला नाही.

खाकी कपडयातल्या अधिकाऱ्याचा अव्वल नमुना म्हणजे हा डी. एस. पी. प्रत्येक गोष्ट विकृत व खोटी सांगत होता. उदा. वरंगळमध्ये केवळ पंधरा वीस उपद्व्यापी नक्षलवादी असल्याचे त्याने सांगितले. परंतु प्रत्येकी सात आठ माणसं असलेल्या फाइटींग स्क्वाडची संख्या मात्र सुमारे दहा पंधरा सांगत होता. सुरी हा निर्बुद्ध असल्याचे एकदा सांगून नंतर तो एम्. एस्सी. असल्याचे व राजकीयदृष्टया अतिशय प्रगल्भ असल्याचे सांगत होता-सुरी !

के. पांडुरंगराव हे त्याचे खरे नाव. हा वेस्ट गोदावरीचा राहणारा. वय सत्तावीस. नाक धारदार, डोळे बोलके, कडक मिशा, मध्यम परंतु सडपातळ बांध्याचा. बारा डिसेंबर अडुसष्टला करीमनगर जिल्हयात मंथनी तालुक्यात तो क्रांतिकारकांना येऊन सामील झाला. तो एम्. एस्सी. झाला असून आंध्र विद्यापीठात प्राध्यापक होता. विद्यार्थीदशेपासूनच राजकीय चळवळीतून भाग घेत होता. बराच काळ डाव्या कम्युनिस्ट पक्षाचा सभासद होता. त्याचा प्रेमविवाह झाला असून त्याची बायको

मॅट्रीक्युलेट पास झाली आहे. दोघांना एक लहान मुलगा असून सौ. सुरीही सशस्त्र क्रांतीत सामील होऊन रानोमाळ लढा देत हिंडत आहेत. सुरीवर डाके घालण्याचा व खुनाचा आरोप ठेवण्यात आला आहे. हा विचारवंत व निष्ठावंत क्रांतिकारक अकरा जूनला ऐलापूर येथे पोलिसी चकमकीत पकडला गेला. सुरीबरोबर समावका नावाची आदिवासी क्रांतिकारक तरुणी व चिन्नी हा साथीदारही पकडला गेला. बाकीचे लोक गोळीबार करीत निसटून गेले. सुरी व चिन्नी हे दोघेही निःशस्त्र व आजारी होते. सुरी हा अंगात ताप असतानाही सुमारे तीन मैल पळाला. दरम्यान पोलीसांनी त्याच्यावर सात वेळा गोळीबार केला; परंतु सुरीने ते हुकवले. सुरीला पकडल्यानंतर त्याच्याकडून माहिती काढून घेण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी नवीनच पद्धत अवलंबिली. डी. एस्. पी. ने मिटक्या मारीत मला ती सांगितली. सुरीच्या पत्नीची काही प्रेमपत्रे पोलीस अधिकाऱ्यांना सापडली होती. तिचे लग्ना-पूर्वी सुरीआधी एकावर प्रेम होते. ती प्रेमपत्रे सुरी आजारी व बेभान असताना त्याला दाखवली गेली. त्याला रडायला लावून, हळूहळू त्याच्याकडून माहिती काढून घेण्यात आली. सुरीसारख्या उच्च शिक्षित व चांगला पगार-प्रतिष्ठा असलेला माणूस जंगलात रानोमाळ हिंडून, बायका-पोरांना वाऱ्यावर सोडून, इथल्या गोरबरिबां-करता लढतो व त्याला असहाय्य स्थितीत कोंडीत पकडन डी. एस्. पी. छळतो ही कल्पनाच मला असह्य झाली. वरंगळमधील विद्यार्थी सुरीला हिरो समजून त्याची पूजा का बांधतात हे मला सुरीचा अतुलनीय त्याग व निःस्पृह, निष्ठावान जीवन पाहून समजले. सुरीचा साथीदार चिन्नी. चिन्नी हा प्रमुख नक्षलवादी कार्यकर्ता होता. चिन्नीला गेल्या पाच ऑगस्ट एकोणसत्तरला डी. एस्. पी. गोपाळ रेड्डीने रिव्हॉल्वरने गोळी घातली होती. ती चिन्नीच्या डाव्या खांद्यावर लागली. तशा परिस्थितीत चिन्नी जंगलात पळून गेला. तो ऐलापूरच्या चकमकीत पकडला गेला. पकडला गेला तेव्हा त्याला जॉंडीस झाला होता. तो अगदी मृत्यूच्या दारात होता. नक्षलवाद्यांनी त्याला वाचविण्यासाठी भरपूर औषधोपचार केले, परंतु परिणाम झाला नाही. चिन्नी हा पोलीस अटकेत असतानाच जेलमध्ये मरण पावला.

आज नक्षलवाद्यांची दहा ते पंधरा स्क्वाड्स वरंगळमध्ये लढत आहेत. एका स्क्वाडमध्ये आठ ते नऊ माणसं असतात. प्रत्येक स्क्वाडमध्ये एक राजकीय प्रचारक असतो. तो प्रत्येक सशस्त्र हल्ल्यानंतर पत्रके वाटण्याची कामे करतो. फावल्या वेळात जंगलातील लहान लहान वाड्यातून प्रचारसभा घेऊन आदिवासी किसानांना क्रांतीचे तत्त्वज्ञान सांगत असतो. प्रत्येक स्क्वाडमध्ये राजकीय प्रचारक ठेवण्याचे तंत्र चिनी क्रांतीपासून नक्षलवाद्यांनी उचलले आहे. लोकांना राजकीय दृष्ट्या जागृत करण्यासाठी या तंत्राचा फार चांगला उपयोग होतो. नक्षलबारी व श्रीकाकुलम येथील मागील अनुभव जमेस धरून क्रांतीकरता राजकीय जागृती घडवायची, आर्थिक प्रश्नावर लढे लढवायचे नाहीत असे धोरण कम्युनिस्ट क्रांतिकारकांनी

स्वीकारले आहे. पसरा येथे मला नक्षलवाद्यांचे तेलगूमधील प्रचारपत्रक मिळाले. त्यात 'जमीनदारीचा अंत करून कसेल त्याला जमीन देण्यात यावी. शेतमजुरांना चांगली मजुरी मिळावी याकरता जमीनदार व सावकार यांना पाठिबा देणारे सध्याचे सरकार उलथून पाडणे अत्यंत आवश्यक आहे व त्याकरताच हा सशस्त्र लढा चालू केला असून जनतेने या लढ्यात सक्रिय भाग घ्यावा ' असे आवाहन केलेले होते. ही सर्व पत्रके विजयवाडा इथे गुप्तरीत्या छापून काढलेली होती. वरंगळ-मध्ये सप्टेंबर ६८ ला संघटन सुरू झाले व मार्च ६९ ला उद्रेक झाला. त्या आधीच ही पत्रके छापून काढण्यात आली होती. अलीकडे मात्र सायक्लोस्टाईल पत्रके मिळू लागली आहेत.

नक्षलवाद्यांचे हल्ल्याचे ठराविक तंत्र आहे. प्रथम ते संध्याकाळी सातच्या सुमारास गावात येऊन कोणी वर्गशत्रू आहे की नाही याची माहिती घेऊन जातात. गावामध्ये नंतर एक काडतूस व यादी प्रमुख ठिकाणी टांगली जाते. त्यात वर्गशत्रूंना शोषण थांबवण्याची तंबी दिली जाते. जे सावकार-जमीनदार कर्जावरील भरमसाठ व्याज माफ करतात; अन्यायाने बळकवलेल्या जमिनी परत करतात त्यांना नक्षलवादी त्रास देत नाहीत. परंतु एखाद्याने पोलिसी मदत घेऊन आपले उद्दामवर्तन चालू ठेवल्यास त्याचा बळी घेतला जातो. इथे एक गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे की नक्षलवादी मन चाहेल त्याला मारू शकत नाहीत. एरिया कमिटीच्या हुकमाशिवाय ते कोणावरही गोळी झाडत नाहीत. मुलुग तालुक्यात गेल्या वर्षी दहा खून पडले व पन्नास डाके घातले गेले. डाक्यात लुटलेली सर्व संपत्ती ही विजयवाडा येथील मुख्य केंद्राकडे रवाना केली जाते. त्यातून औषधे, शस्त्रास्त्रे व पक्षकार्यकर्त्यांचे खर्च चालवले जातात. नक्षलवाद्यांची आर्थिक स्थिती मात्र फार बिकट आहे.

नक्षलवाद्यांनी भौगोलिक परिस्थितीनुसार पंधरा वीस मैल लांबीचे पट्टे (बेल्ट) तयार केले असून एका पट्ट्यामध्ये एक स्क्वाड काम करीत असते. स्क्वाडमध्ये सात ते नऊ माणसे असतात. त्यात एक ऑर्गनायझर, एक कमांडर, एक राजकीय प्रचारक व बाकीचे सैनिक असतात. त्यांचे कँप अत्यंत साधे व आटोपशीर असतात. कँपचे भोवती दोन तीन फर्लांगावर पहारेकरी बसवलेले असतात. हे कँपस् सारखे बदलत असतात. त्यामुळे नक्षलवाद्यांना पकडता येत नाही. पोलीसांच्या हालचालींची माहिती आदिवासी व शेतकरी नक्षलवाद्यांना त्वरित जाऊन पुरवतात. एका घोंगडीचे तंबू आणि एका मोठ्या घोळीत सामान. ट्रान्झिस्टर, घड्याळ एवढ्याच आधुनिक वस्तू त्यांच्याकडे असतात. त्यांना तांदुळाचा पुरवठा आदिवासी व शेतकरी करतात. बाकीच्या आवश्यक गरजा शहरातून आणवल्या जातात. प्रत्येक फाईटिंग स्क्वाडपाशी अत्याधुनिक प्रथमोपचाराची पेटी असते. या स्क्वाडस्मधून कित्येक सुशिक्षित तरुणीसुद्धा लढत आहेत. काही कँपस्वर छापे घातले गेले तेव्हा नक्षल-

वादी निसटून गेले व पोलिसांचे हाती माओ वाङ्मय तेवढे सापडले. सी. आय. डी. ऑफीसमध्ये दोन ट्रकस् भरतील एवढे माओ वाङ्मय–पोस्टर्स पडून आहेत.

नक्षलवाद्यांकडे शस्त्रास्त्रांचा मात्र फार तुटवडा आहे. प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर ठासणीच्या बंदुकाच त्यांच्याकडे आहेत. या ठासणीच्या बंदुकीनें नेम धरता येत नाही व पुन्हा ठासायला दहा मिनिटे लागतात. त्यामुळे त्यांचा पोलिसांशी लढायला उपयोग होत नाही. अर्थात थोड्या फार प्रमाणावर 12 बोअर, D. B. B. L., H. B. B. L., 8 M. M. 475 ·22 रायफल्स व काही थ्रीनॉट थ्रीसुद्धा त्यांच्याकडे आहेत. यातील ·22 ही भारतीय असून ठासणीच्या बंदुकी गावरान असतात. बाकीच्या बंदुका मात्र ब्रिटिश व अमेरिकन असून ही शस्त्रे जमीनदार, सावकार, फॉरेस्ट कॉंट्रॅक्टर यांचेकडून लुटलेली आहेत. वरंगळमध्ये अमेरिकन शिकाऱ्यांकडून त्यांनी काही चांगल्या रायफली पळवल्या. परंतु काडतुसे–बुलेट्स मिळत नसल्याने ते अॅम्युनेशन फार जपून वापरतात. त्यामुळे नेमबाजीमध्ये ते प्रवीण नाहीत. आजपर्यंत कोठेही त्यांचेकडे हॅंडमेड काडतुसे वा बंदुकी मिळाल्या नाहीत. त्यांच्याकडे असलेल्या बंदुकांना बॉयनेटसुद्धा चढवता येत नसल्याने फास्ट अॅटककरता त्यांचा काहीही उपयोग होत नाही. त्यामुळेच पोलिसांशी लढण्याचेऐवजी त्यांना चुकवण्याचे धोरण त्यांना वापरावे लागते. परंतु क्वचित पोलीसांशी सामना झालाच व पोलीस क्लोजरेंजमध्ये असले तर नक्षलवादी हवेत बार काढतात. त्यामुळे पोलीस लाइन पोझिशन घेतात–म्हणजे जमिनीवर आडवे पडून हळूहळू गोळीबार झालेल्या ठिकाणाला वेढा घालतात. या सर्व कृतीस अर्धा-पाऊण तास लागतो. दरम्यान नक्षलवादी उंच व दाट झाडांचा आसरा घेऊन दोन-तीन मैल लांब पळालेले असतात.

नक्षलवादी अशा रीतीने चेगुवेराच्या गनिमी युद्धतंत्राचा उपयोग करून स्वतःचे संरक्षण करून घेतात. नक्षलवाद्यांना पोलिसांना चुकवावे लागते. कारण त्यांच्याकडे पोलिसांएवढे मनुष्यबळ, दारूगोळा, वायरलेस सेटस् आदी काहीही नसते. त्यांच्या बंदुकीची रेंजही कमी व सर्वांची सारखी नसते – बॉयनेटस् नसल्याने फास्ट अॅटक करता येत नाही. अर्थात पळ काढणं हेच युद्धशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. यशस्वी माघार हे विजयाचे महत्त्वाचे पाऊल असते.


आजपर्यंत एकदाही चिनी शस्त्रे वा दारूगोळा पोलिसांचे हाती लागलेला नाही असे कळते. भांडवलदारी वृत्तपत्रे नक्षलवाद्यांना बदनाम करण्याकरता खोटा मजकूर बेधडक छापत असतात. वर वर्णन केल्याप्रमाणे बंदुका व रानडुकरांना मारायचे गावठी बॉम्ब हीच नक्षलवाद्यांची शस्त्रे–या शस्त्रांचे सहाय्यानेच ते हल्ले चढवतात.

'पसरा'च्या जंगलामध्ये नक्षलवाद्यांनी दोन सशस्त्र हल्ले चढवून दोघांचा बळी घेतला होता म्हणून मी 'पसरा' जंगलामध्ये ट्रकचे सहाय्याने निघालो– पसराचे जंगल मुलुगहून पंधरा ते वीस मैलांवर आहे. (क्रमशः)

[ पुढील लेखांक : बुधवार दिनांक १६ सप्टेंबर अंकात ]

'बायबल'सारखा धर्मग्रंथ, आजच्या काळात, केवळ एका विशिष्ट समुदायाचा पवित्र ग्रंथ राहिलेला नसून मानवी जीवनाचा गहन अर्थ उलगडून दाखवणारी संहिता म्हणून सार्‍या वाङ्मयविश्वाशी त्याचे नाते प्रस्थापित झाले आहे. इतकेच नाही तर ख्रिस्तजन्मापासून तो ख्रिस्तवधस्तंभारोहणापर्यंतच्या कथेने आजच्या वाङ्मयाला काही लक्षणीय प्रतिमाही दिलेल्या दिसतात. चित्रकलेसारख्या दृश्य कलेमध्ये विविध देशातील चित्रकारांनी क्रूसाच्या आकाराची पुनर्निर्मिती केलेली आढळते. ख्रिस्तकथेभोवतालच्या विलक्षण वातावरणाने धर्मनिरपेक्ष पातळीवरही रसिक व सृजनशील कलावंत भारावलेले दिसतात.

मराठी भाषेला ख्रिस्तविषयक वाङ्मय परके नाही. कारण अनेक ख्रिस्ती मिशनर्‍यांनी मराठीत ख्रिस्ती धार्मिक वाङ्मय निर्माण केले आहे. परंतु ज्या मराठी लेखक–कवींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला त्यांच्या वाङ्मयात मात्र बायबलप्रभावित प्रतिमासृष्टी आढळत नाही. मराठीत मानवी अनुभवांच्या मूलाकृतीच्या आविष्करणासाठी ख्रिस्ती प्रतिमांचा वापर नववाङ्मयानेच प्रकर्षाने जाणवतो. (विशेषतः श्री. सदानंद रेगे यांच्या काव्यात.) या पार्श्वभूमीवर श्री. वि. ज. बोरकर यांची 'अनाहत' ही ख्रिस्तवधस्तंभारोहणाचा अनुभव व्यक्त करणारी कादंबरी वेगळी आणि आकांक्षी खचित आहे.



**वेगळ्या वाटेने जाणारी**

# अनाहत

**वि. ज. बोरकर**

**सौ. पुष्पा भावे**

या अनभवाच्या आणि लेखकाच्या कालातील अंतर पाहता ही पौराणिक कादंबरी मानावी काय, असाही प्रश्न येथे सहज निर्माण होतो. परंतु रूढार्थाने जिला आपण पौराणिक कादंबरी म्हणतो तिच्यामधील घटनाप्राधान्य, व्यक्तिमाहात्म्याचा दृष्टिकोन लक्षात घेता, आख्यानकाव्य आणि भावकाव्य यांच्यामध्ये असणारे अंतरच नेमके 'अनाहत' या कादंबरीत आणि रूढ पौराणिक कादंबर्‍यात आहे. कारण ख्रिस्ताचे चरित्र सांगणे हा 'अनाहत' कादंबरीचा उद्देश नसून ख्रिस्ताचा जनमानसावर होणारा संमिश्र परिणाम आणि ख्रिस्तवधस्तंभारोहणाच्या वातावरणातील विलक्षण ताण पुनर्निर्मित करणे हा तिचा

उद्देश आहे. या कादंबरीत, देवळातील खिस्ताचे चमत्कार, पतितेला दगड मारण्याचा प्रसंग, बाराब्बसची सुटका, अशी काही सुपरिचित कथानके आहेत; पण ती निमित्त-मात्र आहेत.

## इब्राहीम – केंद्रबिंदू

इब्राहीम या पात्राभोवती ही कादंबरी गुंफलेली आहे. कादंबरीची रचना निवेदनात्मक असली तरी वाचक इब्राहीमकरवीच येरुशलेममधील 'त्या' काही विलक्षण दिवसांचा अनुभव घेतो. बलदंड शरीराचा हा इब्राहीम वृत्तीनेही राकट आहे; एकटा, स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ती असूनही, वाटेवर भेटलेले एका म्हाताऱ्याचे कुटुंब त्याला चिकटलेले आहे; त्या म्हाताऱ्याच्या सुनेच्या सौंदर्याकडे पाहून हे लटांबर तो सहन करतो आहे; आपल्या शरीराच्या मस्तीत तो खुश आहे. पण तरी का कोण जाणे, पासोवरच्या सणानिमित्त नेहमी पडणाऱ्या त्या राहुट्यांच्या वातावरणात त्याला वेगळेपण जाणवते. प्राण्यांच्या व माणसांच्या कोलाहलाला भेदून येणारा ढोलाचा आवाज त्याला अस्वस्थ करतो; त्याचे स्वतुष्ट आयुष्य भेदून टाकतो : – "आणि आता शहरातील त्या भव्य, शिसवी सडकेवर त्याला एकाएकी एकाकी, अत्यंत एकाकी वाटू लागले. कधीही न वाटणारे हे एकाकीपण आजच का असे हृदयात दाटून यावे ? आणि मग एकाएकी त्याच्या लक्षात आले की साऱ्या वातावरणातच कसला तरी दाट गडदपणा भरून राहिला होता...... यंदाचा हा सण निश्चितच काही निराळेच घेऊन आला होता......घुसमटल्या-सारखे होत होते. सारे आकाशच खाली यावे आणि त्याच्या दबावाखाली गुदमरून जावे तसे काहीसे वाटत होते' (पृ. ४). नकळतपणे इब्राहीम येशूच्या अनुयायां-बरोबर मिरवणुकीत सामील होतो; पण मनात मात्र, हा खरोखर 'मेशिया' आहे का ? रोमन शिपायांनी आपल्याला याचा अनुयायी म्हणून पकडले तर ? या एवढ्याशा माणसाच्या चेहऱ्यावर भय कसे नाही ?...या प्रश्नांचा कोलाहल चालू आहे. या 'दाविदाच्या पुत्रा'ची कुचेष्टा करण्याची पहिली संधी तो गमावत नाही – आपल्या मनाचा ताबा स्वतः मिळवण्याचा जणु तो प्रयत्न आहे. मंदिरात येशूने केलेले चमत्कार प्रत्यक्ष पाहताना त्याच्या मनातील विश्वास आणि अविश्वास यांचे युद्ध तीव्र होते. त्या रात्री, म्हातारा मोठ्या आशेने आपल्या षंढ पुत्राला 'त्या'च्याकडे नेण्याची गोष्ट करत असताना तो त्याला तिरस्काराने झिड-कारतो–पण अंतर्मनात मात्र तो स्तंभित झाला आहे. आपल्या समजशक्तीच्या पली-कडचे असे काही विलक्षण त्याने अनुभवले आहे. आणि 'त्या' व्यक्तिमत्त्वाच्या मंत्रवर्तुळातून बाहेर पडण्याचा तो प्रयत्न करत आहे. दुसऱ्या दिवशी एका वेड्या स्त्रीवर समूहाने केलेल्या बलात्कारात तो सामील होतो, त्यावेळी मनात एकच समा-धान असते : 'त्याच्यापासून तो आता अगदी मुक्त झाला होता. मघापासून त्याच्या मानेवर बसलेले त्याच्या शब्दांचे भूत आता अगदी पार नाहीसे झाले होते.' (पृ. ३६)

तरीही पुन्हा पुन्हा तो त्याच्याच शब्दांचा विचार करत होता; आपण त्याच्या पायाशी लीन होऊ शकत नाही याची खंत करत होता; नकळत तो 'त्या'चा इतका विचार करत होता की येशूला अटक झाली ती वार्ता कळण्याआधीच क्रूसाचे भयानक दर्शन स्वप्नात त्याला घडते आणि दुसऱ्या दिवशीचे ख्रिस्तवधस्तभारोहणाचे दुःस्वप्न तर तो स्वतः जगतो !

राजवाड्याच्या सभोवार जमलेल्या जमावात इब्राहीम उभा राहतो; त्याच्याही हातात चांदीचे नाणे येते; तो येशूविरुद्ध ओरडतो; बाराब्बसची सुटका मागतो; पण त्याचे मन मात्र ख्रिस्ताच्या मुद्रेवर गुंतलेले आहे. आणि मग त्याला वाटू लागते, 'हे सर्व त्याने – त्यानेच तर केले नसेल ?' (पृ. ७५). गॉलगॉथच्या डोंगराकडे जाणाऱ्या मिरवणुकीत तो इच्छेविरुद्ध ओढला जात होता. आपला जीव त्याच्याकडे का ओढला जातो हेही त्याला समजत नव्हते. 'त्या'ची क्रूसावर चढायची पाळी आली त्यावेळी आपण जणू क्रूसावर चढत आहो असे त्याला वाटले. आणि त्या संज्ञाहीन अवस्थेतून तो जागा झाला तेव्हा गडद अंधार पडला होता, आणि पलीकडे क्रूसावर तीन आकृत्या दिसत होत्या. वादळी वारे सुटले होते. त्याच्याप्रमाणेच अनेकजण जमिनीवर पडले होते आणि खालची जमीन हलत होती. कोणी म्हणत होते 'तो' क्रूसावरून उतरणार. पण इब्राहीमला जाणवत होती क्रूसाची प्रचंड सावली – जग ग्रासणारी. त्यांनी ज्वाळा पेटवल्या त्या सावलीने पुन्हा पुन्हा ग्रासून टाकल्या. आणि ज्या क्षणी कोणाला तरी शरण गेल्यासारखे त्याचे डोळे थिजू लागले तेव्हा दूरवर कोकरांचा आवाज त्याने ऐकला. या इब्राहीमच्या अनुभवाची अखेर लेखकाच्या निवेदनात्मक वाक्याने होते : 'योगायोगाने की आणखी कशाने कोण जाणे, पण अजूनही उघडेच असलेले इब्राहीमचे डोळे गॉलगॉथकडे वळले होते." (पृ० ९४.)

हा अनुभव आपण इब्राहीमकरवी घेत असलो तरी तो एका व्यक्तीचा अनुभव नाही. अपार्थिव अनुभव नाकारणाऱ्या, आणि तरीही अपार्थिवाचा ध्यास घेणाऱ्या पार्थिव अस्तित्वाचा हा अनुभव आहे. एखाद्या अतिभौतिक, चेतक व्यक्तित्वाचे शब्दात वर्णन करणे अवघड असते हे जाणूनच कादंबरीकाराने इब्राहीमच्या प्रतिक्रियेतून येशूच्या मंत्रप्रभावाचे वर्णन केले आहे. ज्या 'बाराब्बस' या चित्रपटाच्या ऋणाचा कादंबरीकाराने उल्लेख केला आहे, त्यामधील येशू क्रूसावर चढल्यानंतरच्या अंधाराचा दृश्यपरिणाम त्याने शब्दातही साधला आहे. येरुशलेमचा भूभाग, शहरातील समूहाची ताणलेली मनःस्थिती यांची कादंबरीकाराने केलेली वर्णने वेधक आहेत. 'तर मग जे सीझरचं असेल ते सीझरला द्या आणि जे परमेश्वराचं असेल ते परमेश्वराला द्या!' 'ज्यानं आयुष्यात कधीच पाप केलं नसेल, त्यानं पहिला दगड मारावा' अशासारख्या परिचित वाक्यांमुळे वेगवेगळे कथाभाग जिवंत होत असले, आणि वातावरणातील ताणही तीव्रतेने व्यक्त होत असला तरी 'अनाहत' या

शीर्षकातून व्यक्त होत असलेली संकल्पना या कादंबरीतून उदित होत नाही. शब्दांमधून वातावरण उभे करण्याची चतुर कारागिरी मात्र जाणवत राहाते. अर्थात कादंबरीचा विषय लक्षात घेता हे अपयश काहीसे अपेक्षितच होते. परंतु घटनाप्रधान मराठी कादंबरीमध्ये हा विलक्षण अनुभव चित्रित करण्याचा लेखकाचा प्रयत्न आकांक्षी निश्चित आहे. चार्लस् विल्यम्ससारख्या इंग्रजी कादंबरीकारांनी अनेक अपार्थिव अनुभव सहज व्यक्त केले आहेत, आणि इंग्रजी कादंबरीला वेगळी मिती प्राप्त करून दिली आहे. अशा अनेक वेगळ्या वाटा मराठी कादंबरीला मोकळ्या होणे आज अत्यंत जरूर आहे. अशा एका प्रयत्नाबद्दल श्री. वि. ज. बोरकर यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे.

□

# नामा म्हणे

## कलात्मक जाणीवेचा अभाव

स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे एखादा विलक्षण प्रसंग रंगवून इतरांना सांगणे आणि वाङ्मयीन अर्थाने एखाद्या अनुभवाला 'कथा' हा कलात्मक आकार देणे, यामध्ये मूलभूत अंतर आहे. परंतु गोष्ट-कथा या कल्पनांच्या अतिपरिचयामुळे, वाचकांचीच नव्हे तर लेखकांचीही, कथा या वाङ्मयप्रकाराच्या कलात्मक घाटाविषयीची जाणीव ढळत असते. – श्री. विजय हरी वाडेकर यांच्या 'नामा म्हणे' या कथासंग्रहातून प्रथमवाचनी जो विशेष जाणवतो तो हाच की या लेखकाला कथा या माध्यमाची नीट जाणीव झालेली नाही. किंबहुना त्यांची कथाबीजाची कल्पनाच एखादा भडक प्रसंग, एखादा विलक्षण विरोधाभास अशी आहे. कथाबीजाच्या भावविवश स्वरूपानेच वाचकांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्नही या कथात दिसतो. कथेच्या सजावटीमध्ये मात्र आजच्या कथेच्या आविर्भावांचे, लकबींचे संस्कार झालेले दिसतात.

'नामा म्हणे' या कथेमध्ये जीवनाचे भीषण स्वरूपच पाहिलेल्या एका बालमनाचा, मुळामध्ये लक्षणीय असलेला अनुभवही, एकसुरी तपशील, 'एखाद्या कसबी अभिनेत्याला नामूचा अभिनय जमला नसता.' (पृ. ६) अशासारखी वर्णनात्मक वाक्ये, यामुळे सपाट होतो. 'इयत्ता चवथी—ब' या कथेतील अनुभव शाळेतील मुलांच्या नजरेतून मांडण्याचे प्रयोजन उमगत नाही: डॉक्टर—वेडी बायको—परिचारिका, या त्रिकोणाची प्रौढ गोष्ट डॉक्टरच्या घरासमोरच्या शाळेतील मुलां-

कडूनच संपूर्ण सांगण्याचा मोह लेखकाला आवरत नाही. बालमनाच्या अनुभवाचा आविष्कार ' फिरायला ' या कथेत मात्र लेखकाने आकर्षकपणे मांडलेला दिसतो. ' शामू ', ' कहाणी ', ' नाटक ' या सांकेतिक, भावविवश कथांचे लेखन, प्रामुख्याने वाचकांची केंद्रीभूत व्यक्तीविषयीची कणव जागृत करून यश संपादण्यासाठी झालेले आहे. ' वरात ' या कथेमध्येही वरच्यासारखाच प्रयत्न असला तरी त्यात रचनात्मक कौशल्य जाणवते.

' स्पर्श ', ' रांगोळी ', ' दुबळी ' या प्रस्तुत कथासंग्रहातील तीन उल्लेखनीय कथा आहेत. पहिल्या दोन कथात माणसाचा वर्तमान भूतकाळ घेऊनच येत असतो, ही जाणीव, लेखकाने प्रत्यक्ष घटना आणि भूतकाळातील आठवणी यांच्या प्रत्यारोपांनी साधली आहे. परंतु आपण मनोविश्लेषणात्मक कथा लिहीत आहोत या जाणीवेने लेखकाने फार भोंगळ स्पष्टीकरणात्मक वाक्ये लिहून सारा अनुभव बोजड केलेला दिसतो. उदा. ' स्पर्श ' या कथेतील नायकाचे वर्णन पाहा : ' हँगरला अडकवलेल्या कोटासारखा लोंबत पेंगुळलेलं शरीर कोटात अडकवल्यासारखं मनाचा कणखरपणा ते दाखवत नव्हतं. पँटची विस्कटलेली घडी त्यांच्यासारखीच कधी व्यवस्थित न बसलेली, धुराळलेले खूप मळकट बूट, त्याला चकाकी नाही, नवी झिलाई नाही, त्यांच्या उत्साहासारखी...' (पृ. ४५) ' दुबळी ' या कथेमध्ये एका पांगळ्या मुलीविषयी केवळ स्नेह बाळगणाऱ्या एका मुलाच्या मनातील वासनाजागृतीचे चित्र आहे. परंतु हे समर्थ कथाबीज, अनेकसूत्री कथानकामुळे व्हावे तसे परिणामकारक झालेले नाही.

' नामा म्हणे ' या संग्रहाकडे पाहात असताना एक पुष्कळ संस्कार वरवर जडवून घेतलेले वाङ्मयीन व्यक्तिमत्व दिसते. कथाबीज पुरेसे आकाराला येण्याआधीच खूप जडणघडण करून ते मांडण्याची हौस दिसते. अशा प्रकारे कधी आकर्षक तर कधी भावविवश कथानके मांडणे सोपे आहे – ती एक कारागिरी आहे. परंतु कथानकापासून लघुकथेपर्यंत जाणारा कलात्मक पुनर्निर्मितीचा मार्ग फार अवघड असतो – त्या मार्गावर जाण्याचे धैर्यही या कथालेखकाने केलेले दिसत नाही. त्यामुळे अंगी असलेले काही दुय्यम पण आवश्यक गुण कारणी लागलेले नाहीत.

अनाहत : वि. ज. बोरकर : मौज प्रकाशन गृह, मुंबई : मूल्य सव्वा रुपया.

नामा म्हणे : विजय हरी वाडेकर : श्री प्रकाशन, पुणे : मूल्य पाच रुपये.

## ◻ मध्यस्थी करणारे यंत्र

बंगलोरच्या टेलिफोन कंपनीने म्हणे असा एक टेलिफोन तयार केला आहे की एका टोकाला बोलणारा माणूस कितीही रागावून व आरडाओरडा करून बोलला तरी दुसऱ्या टोकाला ऐकणाऱ्या माणसाला त्याचा आवाज शांत व हळू ऐकू येईल. च्यायला, म्हणजे भांडणाऱ्या दोन माणसात मध्यस्थी करणारे यंत्र तयार झाले म्हणायचे. मला वाटते भांडण-तंटयाने व रुसव्या-फुगण्याने भरलेल्या आजच्या जगात या शांतता-प्रचारक यंत्राचा अनेक ठिकाणी उपयोग होऊ शकेल. अस्मादिकांच्या अगदी नेहमीच्या अनुभवातला पहिला उपयोग म्हणजे आलेल्या अर्धा डझन मित्रांसाठी चहा फर्माविणारी सिटिंग रूम व चहाची पावडर आधीच संपुष्टात आलेले स्वयंपाकघर यांच्या दरम्यान हे यंत्र ठेवले तर चहाच्या पेल्यातले वादळ नक्कीच शमेल. निदान रविवारचा ब्रिजचा अड्डा सुरळीतपणे चालावा म्हणून तरी एखादे पोर्टेबल सुखसंचारक यंत्र नक्कीच हवे. दुसरे म्हणजे स्पेलिंगच्या चुका करण्याचा जन्मसिद्ध हक्क निर्भीडपणे गाजविणारा (किंवा गाजविणारी) टायपिस्ट व




चार ओळीच्या पत्रात चाळीसपेक्षा अधिक चुका नसाव्यात अशी जुलमी अपेक्षा करणारा बॉस यांच्या दरम्यानही या यंत्राचा खूपच उपयोग होऊ शकेल. कुणी सांगावे या यंत्राची आवृत्ती इतकी सुधारलेली निघायची की बॉसने चिडून म्हणावे, 'दिवसभरात तासाभराचं तरी काम करा, मग साड्यांच्या गप्पा मारा,' पण स्टेनोला मंजुळ आवाजात ऐकू यावे, 'आज तासभर लवकर घरी गेलात तरी चालेल, अन् उद्या दिवसभर सुटी घेऊन साड्यांचं शॉपिंग करा.' याहूनही अधिक विशाल दृष्टीने विचार करायचा म्हणजे यूनोचा सरचिटणीस म्हणून उ थांटच्याऐवजी या यंत्राची नेमणूक केली तर? तर मग जगात भांडणे ऐकूच येणार नाहीत–कारण भांडणारी माणसे गोड बोलत आहेत असेच ऐकू येईल.

## झुरळांचा आंतरराष्ट्रीय मैत्री-संघ

दोन देशातली हमदर्दी कोणत्या स्वरूपात प्रकट होईल हे सांगणे कठीण आहे. थोड्या दिवसांपूर्वी लाल चीनने पाकिस्तानविषयक प्रेम दाखविण्यासाठी म्हणे एक हजार बदके पाकिस्तानला पाठवली. आता बोला ! कोणाचेही हृदय जिंकायचा मार्ग त्याच्या पोटातून असतो अशी एक आधुनिक म्हण आहे, तिला अनुसरून आंतर-राष्ट्रीय सलोख्याचा हा स्वादिष्ट मार्ग लालचीनने स्वीकारला आहे हे उघड आहे. अर्थात आता पाकिस्तानची परत–भेट म्हणून पेकिंगला चिकन–तंदूरीच्या भेटी गेल्या तर नवल नाही. फार तर पाक–चीन मैत्रीला चिकन–तंदूरी शोभेल की बिर्याणी साजेल की कबाब चालतील एवढाच मतभेदाचा मुद्दा होऊ शकेल. थोडक्यात म्हणजे चीन–पाक प्रेम–प्रकरणाचे भवितव्य आता या देशांच्या राजदूतांवर अवलंबून न राहता त्यांच्या खानसाम्यावर अवलंबून राहणार. आणखी एक गोष्ट म्हणजे मैत्रीचे अनेक प्रकार असतात–उदाहरणार्थ, जीवश्च कंठश्च मैत्री, कसं काय या प्रश्नचिन्हांकित मैत्री व दात विचकण्यापुरती मैत्री, तेव्हा या वर्गीकरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणात वापर करून चीनने निरनिराळ्या देशांना निरनिराळी पक्वान्ने पाठवायची ठरवली तर नवल नाही. उदाहरणार्थ, पाकिस्तानला बदके तर अल्बेनियाला स्वादिष्ट उंदीर अन् उत्तर व्हिएटनामला चवदार झुरळे. याच्या उलट शत्रू नंबर एक अमेरिकेला शिळ्या सुरवंटाचे हॉटडॉग, शत्रू नंबर दोन रशियाला बुरसटलेल्या गांडुळांचे लोणचे अन् शत्रू नंबर तीन भारताला तर नासक्या मच्छरांची चिमूटभर चटणी.

## ◻ रेडियो ऐकणारे मांजर

ऑस्ट्रेलियातल्या एका रेडियो स्टेशनने लोकांची गंमत करण्यासाठी काही दिवसांपूर्वी अशी घोषणा केली की आम्ही एक खास यंत्र अमेरिकेहून मागवलें आहे व त्यामुळे रेडियो ऐकणाऱ्या लोकांना रेडियोतून निरनिराळे वासही येतील. लोकांना हे खरे वाटले इतकेच नव्हे तर खरोखरीच आपल्याला वास आले अशी त्यांनी रेडियोस्टेशनला पत्रे पाठवली. एका माणसाच्या बायकोला फेसपावडरचा वास आला तर दुसऱ्या माणसाच्या मांजराला चक्क उंदराचा वास आला. म्हणजे आता आहे की नाही ? थाप जेवढी लोणकढी तेवढी ती चटकन खपते असा जरी सर्वसाधारण नियम असला तरी माणसाला पटलेली थाप मांजराला कशी पटली हा प्रश्न उरतोच. शिवाय रेडियो ऐकून मांजराला उंदराचा पत्ता लागत असेल तर तोच रेडियो ऐकून उंदराला मांजराचा सुगावाही लागू शकेल. कुणी सांगावे, यापुढे ऑस्ट्रेलियन उंदरांचे कमांडोपथक मांजराच्या गळ्यात घंटा बांधायला निघताना तळहातावर शीर घेऊन निघायच्याऐवजी हातात ट्रान्झिस्टर घेऊन निघेल.

◻ ◻ ◻

स्पर्धेमधील नाट्यसंघांचा सामान्य दर्जा आणि व्यवस्थापनातील कमालीचा गोंधळ यामुळे चालू वर्षीच्या आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा लक्षात राहतील. कोणत्या कारणामुळे देव जाणे पण सध्या 'एकदम शांत' असलेल्या महाराष्ट्रीय कलोपासक या नाट्यसंस्थेने या स्पर्धा भरवण्यास सुरुवात केली. उत्कृष्ट व्यवस्थापन, विद्यार्थीबद्दल संस्थेला वाटणारी आस्था, आणि वृत्तपत्रीय प्रसिद्धी यामुळे सस्थेच्या स्पर्धांनी लवकरच बाळसे धरले. विद्यार्थी, लेखक, दिग्दर्शक यांना उत्तेजन दिले गेले. दर वर्षी भाग घेणाऱ्या महाविद्यालयांची संख्या वाढत चालली. आपण नाट्यगुण दाखवण्यास कोणतीही स्पर्धात्मक रंगभूमी उपलब्ध नसल्याने अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेतील पुरुषोत्तम करंडक व अन्य पारितोषिके जिंकणे ही विद्यार्थ्यांच्या जिद्दीची बाब होऊन बसली.

कोणतीही पूर्वसूचना न देता गेल्या वर्षी कलोपासकांनी या स्पर्धा भरवल्या नाहीत. स्पर्धेसंबंधी विद्यार्थ्यांमध्ये असणारी उत्सुकता लक्षात घेता संस्थेमार्फत

---

# रंगभूमि

## सामान्य दर्जा कमालीचा गोंधळ

### आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा

शरद गोखले

---

काहीतरी अधिकृत खुलासा होणे आवश्यक होते. तथापि एकाही महाविद्यालयाकडे तसा खुलासा गेला नाही. संस्थेच्या एखाद्या पदाधिकाऱ्यास विचारल्यास काही अडचणी आहेत, लवकरच भरवू, दुसऱ्या सहामाहीत भरवू इत्यादि उत्तरे मिळाली. पण प्रत्यक्षात काही हालचाल झाली नाही. अखेरीस गेल्या वर्षीच्या दुसऱ्या सहामाहीत रोटरी क्लब ऑफ पूना वेस्ट या संस्थेने पुढाकार घेऊन स्पर्धा पार पाडल्या.

चालू वर्षी जून पासूनच महाविद्यालयीन नाट्य-वर्तुळामध्ये रोटरी का कलोपासक ही चर्चा सुरू होती. कलोपासकांची काही हालचाल नाही असे पाहून त्यांचे चिटणीस श्री. राजा नातू यांचेकडे मी स्वत: विचारणा केली. 'दुसऱ्या सहामाहीत भरवणार' असे उत्तर मिळाले. गेल्या वर्षीच्या रोटरीच्या स्पर्धा या 'पर्यायी' म्हणून भरवल्या गेल्या. चालू वर्षी मात्र पुरुषोत्तम करंडक स्पर्धांची वाट न पहाता आपल्या स्पर्धा जाहीर केल्या आणि उत्सव सोहळ्यात पार पाडल्या.

स्पर्धेमध्ये एकूण तेरा नाट्य संघांनी व दहा महाविद्यालयांनी भाग घेतला. फर्ग्युसन, स. प. व बी. एम्. सी. सी. या महाविद्यालयांनी प्रत्येकी दोन एकांकिका

सादर केल्या. स्पर्धांची चुरस फारशी जाणवली नाही. सर्व संघांची ताकद यथातथाच होती. तथापि त्यातल्या त्यात मला गुणानुक्रमे ज्या पहिल्या पाच सरस वाटल्या त्या प्रयोगांची त्या क्रमाने दखल घेतो.

## 'पिंजरा'

फर्ग्युसन महाविद्यालयानें सादर केलेल्या दोन्ही प्रयोगांचा दर्जा समाधानकारक होता. झालेल्या सर्व प्रयोगात या महाविद्यालयाने सादर केलेली 'पिंजरा' ही प्रतिकात्मक एकांकिका, लेखन, प्रयोग, अभिनय, आणि कलाकारांची समज, या दृष्टीनें सरस वाटली. दिलीप जगताप यांनी लिहिलेल्या या एकांकिकेचे दिग्दर्शन अनंत कुलकर्णी यांनी केले होते. समाजजीवन नकोसें झालेल्या, आणि प्रस्थापित समाजघडी विरुद्ध, त्यातील ढोंगीपणाविरुद्ध बंड करून उठलेला तरुण या नवीन प्रवृत्तीचा द्वेष करणारा, शक्य झाल्यास सर्वशक्तीनिशी तिला ठेचू पहाणारा, प्रस्थापित व्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारा फिर्यादी – आणि स्थितिप्रिय आसन, यातील संघर्षाची परिणामकारक मांडणी या प्रयोगामध्ये पहावयास मिळते.

दिलीप जगताप यांनी बंडखोर तरुणांच्या तोंडी घातलेले संवाद आणि अवघड विषयांच एकांकिकेच्या मर्यादेत त्यांनी केलेली कौशल्यपूर्ण मांडणी त्यांच्या लेखणीची ताकद दाखवून जाते. या प्रयोगाचे सगळयात मोठे वैशिष्टय असे की भाग घेणारे कलावंत केवळ नकला पाठ केल्याप्रमाणे वाटत नव्हते. आपण करतो ते का आणि कशासाठी याची बहुतेक सर्व कलावंतांना जाणीव होती. लेखनाने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा या प्रातिनिधीक स्वरूपाच्या असल्याने त्यांना नावे नाहीत. त्यांचा उल्लेख – फिर्यादी, बाप, पोरगा, वृद्ध असा करण्यात आला आहे. या प्रतिकात्मक कलाकृतीचा प्रयोग दिग्दर्शक अनंत कुलकर्णी यांनी कौशल्याने बसवला होता. पिंजऱ्याचा सूचक वापर, आसनाची उंची, आणि कलाकारांच्या नीटस हालचाली यामुळे प्रयोगाला जिवंतपणा व दिग्दर्शकाला विषय समजल्याची प्रचिती आली. कलाकारांपैकी बंडखोर तरुणाची भूमिका करणारे सुधीर आळेकर व फिर्यादी झालेले अनंत कुलकर्णी यांना वाव होता. भूमिकेची गरज लक्षात घेतली तरी कुलकर्णी वाजवीपेक्षा जास्त आक्रमक वाटले. सुधीर आळेकरची संवाद बोलण्याची पद्धत वेगळी वाटली. बापाची भूमिका करणारा भालचंद्र गानू एवढा एकच कलावंत काहीसा गोंधळलेला वाटला. अर्थात मुख्य संघर्षामध्ये त्याला महत्त्वाचे स्थान नसल्याने स्वाभाविकपणे तो अलग पडला. निर्मितीची बाजू समाधानकारक होती.

## स. प. महाविद्यालय– 'मात'

आपल्या वडिलांचा आणि पहिल्या पतीचा खून केलेली एक तरुणी श्री. भागवत यांच्याशी विवाह करते. पहिल्या दोन्ही खुनांचा ज्यांनी तपास केलेला असतो असा इन्स्पेक्टर तिचा मागोवा घेत तिथे येतो. आणि तिसरा खून होण्यापूर्वी अतिशय

नाटयपूर्ण रीतीने तिच्यावर मात करतो. वास्तवतेचा भाग क्षणभर बाजूला ठेवला तर रमेश टिळेकर यांची ही एकांकिका परिणामकारक वाटते. मोहन गोखले यांनी एकांकिकेचे दिग्दर्शन केले. इन्स्पेक्टरची महत्त्वाची भूमिकाही त्यांनी केली. कथानक साधे, सरळ, बांधेसूद. पात्रे दोनच. त्यामुळे प्रयोग बसवणे सोपे गेले असावे. वीस मिनिटाच्या मर्यादेत त्यांनी दाखवलेले नेपथ्य-कौशल्यही वाखाणण्यासारखे होते. मोहन गोखले वावरले अतिशय मोकळेपणाने, संवादही पुष्कळच व्यवस्थित बोलले. त्यांचे उच्चार मात्र काही वेळा खटकले. अरुणा भागवत यांनी त्यांना चांगली साथ दिली. मात्र भूमिकेला ज्या व्यक्तिमत्त्वाची अपेक्षा आहे ते व्यक्तिमत्त्व त्या दाखवू शकल्या नाहीत. त्यांची सौ. भागवत साधी, सरळ, नवविवाहिता वाटली. दोन्ही कलावंतांना अभिनयाचे दुसरे पारितोषिक मिळाले. पण एकांकिकेच्या वाटयाला मात्र यश आले नाही.

### बी. जे. मेडीकल – नेहमीची प्रथा

मेडीकल महाविद्यालयाने आपल्या नेहमीच्याच प्रथेप्रमाणे वेगळा मांड मांडला. अनील जोगळेकर यांचे 'प्रवासी' हे ताजे, करायला काहीसे अवघड 'स्क्रीप्ट' मेडीकलने संपूर्ण नवीन तंत्र वापरून सादर केले. नेपथ्याचा बडेजाव नाही. तंत्राचे अवडंबर नाही. कलाकारांचे अभिनयकौशल्य हीच मुख्य मदार ठेऊन पानवलकरांनी हा सुखकारक 'प्रवास' घडवला. आजारी मुलीला भेटण्यासाठी माईणकर कुटुंब हा प्रवास करते. प्रत्यक्षात रंगभूमीवर एक छानसा ठोकळा ठेवण्यात येतो – नाटकातला दिग्दर्शक मदतनिसाचे सहाय्याने या ठोकळयावर चार खुर्च्या ठेवतो.

– आणि ठोकळयाची मोटार बनते व माईणकर, त्यांचे कुटुंब व एक छोकरा, छोकरी, यांचा प्रवास सुरू होतो. मोटारीत बसल्याची कल्पना करून वागायची सूचना मिळाल्याने पुढले काम तुलनेने सोपे होते. गाडी रस्त्यावरून जात असताना जाहिरातींचे फलक दाखवण्याची कल्पना, आणि मुंबईला पोचल्यावर गच्चीतून बघणारी मुलं, व वरती बघणारे माईणकर कुटुंबीय, या दिग्दर्शकांच्या दोन कल्पना


पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

व. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन



मीना पुराणिक
सर्वोत्कृष्ट महिला कलावंत

चांगल्या वाटल्या. नाटकाचं हे 'बोलाची कढी, बोलाचाच भात' तंत्र आता काही नवीन राहिलं नाही. मंडळी फक्त करतात किती चांगले याला महत्त्व आहे. त्या दृष्टीने डॉक्टर मंडळींचे कौतुक केले पाहिजे. मीना पुराणिक (सौ. माईणकर) यांनी सर्वोत्कृष्ट महिला कलावंताचे पारितोषिक पटकावून आपली पात्रता सिद्ध केली.

रंगायन या संस्थेने काही दिवसापूर्वी पुण्यात केलेल्या एकांकिकांपैकी सुलतान उचलली जाण्याची शक्यता वाटत होती. फर्ग्युसनच्या विद्यार्थ्यांनी हे धाडस केले. राजशेखरच्या प्रमुख भूमिकेसाठी विश्वास पटवर्धन यांची निवड योग्य वाटली. त्यांनी काम चांगले केले. विशेषत: तुलनेने बाकीचे सर्व कलावंत फिके पडल्याने पटवर्धन अधिक प्रभावी वाटले. स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट पुरुष कलावंत म्हणून परीक्षकांनी त्यांची निवड केली. यंदाच्या स्पर्धेतील कलाकारांचा एकंदर दर्जा पाहता ही निवड आक्षेपार्ह वाटू नये.

पुणे विद्यापीठ जिमखान्याने सादर केलेली भेकड ही एकांकिकाही पुष्कळच नीटस होती. रामचे निर्मलावर खूप प्रेम आहे. निर्मलेच्या दृष्टीने मात्र राम केवळ परिचीत. निर्मलाची एक मैत्रीण रामसाठी वेडावली आहे. तर रामच्या मनात तिला स्थान नाही. निर्मलाचा विवाह झाल्यावर राम बिथरतो व सैन्यात भरती होतो. सैन्यातून आलेला राम विवाह झालेल्या निर्मलाकडे येतो. राम बोलतो आपल्यासाठी पण निर्मलाला उद्देशून, आणि निर्मला दुखावली आहे. रामने आपल्या मैत्रिणीला दगा दिला म्हणून, अशा या त्रिस्थळी यात्रेतून कथासूत्र समजते. कलाकारांपैकी मृणाल गोरे (निर्मला) दिसल्या चांगल्या, आपल्या भूमिकेचा आबही त्यांनी चांगला ठेवला, मात्र त्या 'कॉन्शस' असल्याचे जाणवत होते. रामची अवघड भूमिका अजित पारसनीस यांनी जीव ओतून केली तरी ते यशस्वी ठरले नाहीत.

स्पर्धेतील त्यातल्यात्यात सरस एकांकिकांखेरीज एम्. इ. एस्. (आर्टस, अँन्ड सायन्स) महाविद्यालयाची हिमानी, — चांगली निर्मिती (विशेषत: लेणी दर्शविणारे सूचक नेपथ्य) वेगळा विषय, आणि सविता नवरे यांची हिमानीची सुरेख भूमिका यामुळे लक्षात राहिली. (बाईंनी हसणे टाळले असते तर बरे झाले

असते ) 'तो' च्या भूमिकेसाठी दीपक दीक्षित लहान वाटले. बोलण्याची पद्धती सदोष आणि चेहरा उगाचच वेडावाकडा करण्याची खोड यामुळे 'हिमानी' चे यश मर्यादित झाले. या भूमिकेसाठी अधिक ताकदीचा कलावंत मिळाला असता तर हिमानीची झेप पारितोषिकापर्यंत निश्चित पोचली असती. उपस्थित प्रेक्षकांनी – (त्यातील बहुसंख्य विद्यार्थी – आणि त्यातही प्रामुख्याने स्पर्धक – विद्यार्थी) ही एकांकिका ऐकून घेतली नाही आणि उगाच गोंधळ घातला, त्याचा खेद वाटतो. अर्थात गोंधळाचा हा प्रकार काही निवडक एकांकिका सोडल्यास सर्रास चालू होता. रंगभूमीवरील पात्रांच्या संवादांशी मिळते जुळते प्रतिटोले प्रेक्षकांतून भरपूर येत होते. 'काळा पहाड' ही शेवटच्या दिवशीची शेवटची एकांकिका तर विद्यार्थ्यांनी 'गणपती बाप्पा मोरया' च्या गजरात बुडवून टाकली. मॉडर्न कॉलेजची 'एका अशा रात्री', बी. एम्. सी. सी. ने केलेल्या 'बळी' व 'मार्ग' व स. प. महाविद्यालयाची 'तीस मिनिटे', या गंभीर प्रवृत्तीच्या अन्य चार एकांकिका,–बेताच्या कुवतीचे कलावंत, भूमिकांसाठी अयोग्य कलावंतांची निवड, यामुळे यशाची किमान पातळी गाठू शकल्या नाहीत. तथापि त्यातल्या त्यात प्रताप गोंदकर (मार्ग–फर्नांडिस) ज्योती जुठाणी (मार्ग – वसुंधरा). मंगला बनवट (बळी – कमला) हे कलावंत ठीक वाटले. एका ओल्या रात्री मधील माणिकराव (राजीव वेलणकर) आणि ताई (माधुरी हळवे) यांच्या बोलण्यात कृत्रिमपणा होता. माणिकरावांच्या हालचाली भूमिकेस मारक होत्या तर माधुरी हळवे यांचे बोलणे अतिशय नाटकी होते. 'तीस मिनिटे' करणाऱ्या स. प. च्या पाटणकर-बेदरकर या कलावंताना एकांकिका पेलली नाही.

स्पर्धेसाठी हलक्या फुलक्या एकांकिका करणे महा कर्मकठीण. – पारितोषिक मिळवण्याच्या, आणि यशस्वी प्रयोग करण्याच्या दृष्टीनेही, या पद्धतीच्या एकांकिकांची संख्या – स्पर्धेमधून प्रतिवर्षी कमी होत चालली आहे. या वर्षी काळा पहाड (लॉ कॉलेज, व एम्. इ. एस्. कॉमर्स) या शं. ना. नवरे यांच्या एकांकिकेचे दोन प्रयोग व शाम फडके यांची 'एक होता औरंगजेब' (नेस वाडिया–कॉमर्स) अशा तीन एकांकिका स्पर्धेत करण्यात आल्या. दोन्ही काळा पहाडांचा अक्षरशः धुव्वा उडाला. एकांकिकेला आवश्यक असलेली ट्रीटमेन्ट न मिळाल्याने, आणि कलावंतांची कुवत अतिशय सामान्य असल्याने एकांकिका जीव धरू शकल्या नाहीत. एम्. इ. एम्. कॉमर्सने आपल्या काळा पहाडसाठी योजलेले पार्श्वसंगीत छान वाटले. पण प्रयोग मात्र भुईसपाट झाला. पात्रांचे बोलणे एकमेकांना तरी ऐकू येत होते की नाही याची शंका वाटावी, असा स्पेशल आवाज मंडळींनी लावला होता. यांच्या काळा पहाडमधील विलास नाईक (चाचा) बरा वाटला.

'एक होता औरंगजेब' या नेस वाडिया कॉमर्सच्या एकांकिकेचा प्रयोग सुमार झाला. सतीश पाटोळे (आरे मुमताझ) एवढा एकच कलावंत बरा वाटला. प्रेक्षकांना

उद्देशून बोलण्याची चंद्रकांत कुडाळ व पाटोळे यांची पद्धत आक्षेपार्ह वाटली.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून असणाऱ्या अपेक्षा लक्षात घेऊन, त्यातल्या त्यात जे कलावंत चांगले वाटले अशा तीन विद्यार्थ्यांची व विद्यार्थिनींची नावे गुणानुक्रमे महाविद्यालयाचे नाव, एकांकिकेचे नाव व केलेली भूमिका अशा क्रमाने मुद्दाम देत आहे.

विद्यार्थी : विश्वास पटवर्धन (फर्ग्युसन – सुलतान–राजशेखर)
सुधीर आळेकर (फर्ग्युसन – पिंजरा – पोरगा.)
मोहन गोखले (स. प. मात–इन्स्पेक्टर.)

विद्यार्थिनी : मीना पुराणिक (बी. जे. एम्. सी.–प्रवासी–सौ. माईणकर.)
सविता नवरे (एम्. इ. एस्. – हिमानी.)
अरुणा भागवत (स. प. – मात–सौ. भागवत.)

## संयोजकांविषयी थोडेसे......

रोटरी क्लबने व रोटरॅक्ट यांनी या स्पर्धा भरवल्या खऱ्या; परंतु स्पर्धेविषयी त्यांना किंचितही आस्था असल्याचे कुठेही जाणवले नाही. सर्वसाधारणपणे कधीही होत नाही इतका गोंधळ विद्यार्थ्यांनी घातला. कलेच्या क्षेत्रात महाविद्यालयीन स्पर्धेला इतके हिणकस वळण लागावयास नको होते. तथापि (त्यातील बहुसंख्य स्पर्धक) जर आपली जबाबदारी पार पाडू शकले नाहीत तरी संयोजकांनी व्यवस्थापनाबाबत योग्य ती काळजी घेणे आवश्यक होते, नव्हे त्यांची ती जबाबदारी होती. दंगा फारच वाढतो आहे असे लक्षात आल्यावर – कोणी रोटेरियन पदाधिकारी रंगमंचावर येऊन बोलले. 'साहेबाच्या भाषेत' चार शब्द त्यांनी सुनावले. त्यात ना आत्मीयता, ना दरारा. केवळ एक उपचार म्हणून त्यांनी कर्तव्य बजावले. भले मोठे बिल्ले लावून फिरणारे रोटरॅक्टचे स्वयंसेवक कशासाठी होते ? स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या अनेक संस्थांच्या कलावंतांनी, मार्गदर्शकांनी, जबाबदार प्राध्यापकांनी, माझ्याजवळ या सर्व प्रकाराबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. एक प्राध्यापक तर म्हणाले, चार ऑगस्टला आम्हाला स्पर्धेसंबंधीचे अधिकृत पत्र मिळाले. पंधरा ऑगस्टपूर्वी एकांकिका व भाग घेणाऱ्या कलाकारांसंबंधी आवश्यक तपशील कळवण्याचे बंधन होते. आणि चोवीस तारखेपासून स्पर्धा सुरू झाल्या. इतक्या थोड्या कालावधीत दर्जेदार एकांकिकांची अपेक्षा कशी करणार? विद्यार्थ्यांचा दांडगा उत्साह असल्याने स्पर्धा झाल्या इतकेच.

पुढील वर्षी पुरुषोत्तम करंडक स्पर्धा होणार आणि रोटरीला आपला उपक्रम चालू ठेवण्याची इच्छा असेल तर त्यांचे यावर्षीचे अपयश पाहता आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर स्पर्धा भरवण्यापेक्षा पी. डी. ए., भरत नाट्यमंदिर अथवा रंगभूमीविषयी आच असलेल्या अन्य नाट्यसंस्थांच्या सहकार्याने च स्पर्धांचा उपक्रम हाती घ्यावा असे सुचवावेसे वाटते. ◻ ◻ ◻

# यादगार

## पडद्यावरील कीर्तन

'यादगार' चित्रपटाच्या प्रारंभीच्याच एका दृश्यात मनोजकुमार आपल्या कामगार बांधवांना उपदेश करतो की, एक कामगार एक मिनिट कामावर उशीरा आला म्हणून बिघडत नाही. पण या देशात आज क्रोडो कामगार आहेत त्या सर्वांनीच असा विचार केला तर देशाचा किती वेळ व श्रमशक्ती वाया जाईल याचा कधी विचार केला आहे काय ?

त्याचे हे विचार ऐकून त्या कारखान्यातील त्याचे २५० कामगारबंधू स्फूर्ती घेतात व अंग झटकून कामाला लागतात.

त्यानंतरच्या दृश्यात : मनोजकुमारचे वरील भाषण ऐकून प्रभावित झालेला जनरल मॅनेजर त्याला थांबवून घेतो व त्याचे कौतुक करतो. तेवढ्यात भोंगा वाजतो तेव्हा मनोजकुमार जनरल मॅनेजरला सांगतो की कामाची वेळ झाली आहे, मला निघालं पाहिजे !

मनोजकुमार जातो; तेव्हा जनरल मॅनेजर म्हणतो : या देशातला प्रत्येक माणूस जर असा असता, तर देश सुधारण्यास मुळीच वेळ लागला नसता.

या दोन प्रातिनिधीक दृश्यांवरून चित्रपटाची प्रतवारी कळायला हरकत नाही. मानवी जीवनातील उच्च आदर्श जपणारा नायक आणि त्याच्या मार्गात क्षणोक्षणी अडथळे निर्माण करणारा खलनायक (प्रेम चोप्रा) यांच्यामधील संघर्षाची ही कहाणी आहे. तिला पार्श्वभूमी आहे राजस्थानच्या वैराण वाळवंटाची. तिथल्याच एका संस्थानी राज्यात आता लोकशाही आलेली असते व निवडणुका व्हायच्या असतात. निवडणुकीला उभे असतात खुद्द महाराज (तिवारी) आणि त्यांच्याविरुद्ध जनतेचा प्रतिनिधी म्हणून मनोजकुमारही ही निवडणूक लढविण्याचे ठरवितो. निवडणूक-प्रचारासाठी महाराजांच्या मुलीची मैत्रीण (नूतन) येते आणि सध्याच्या हीन वृत्तींनी बरबटलेल्या समाजात उच्च संस्कृति-मूल्यांची बीजे पेरणाऱ्या मनोजच्या कृत्यांनी प्रभावित होते.

प्रसंगोपात्त त्यांच्यातील प्रेमबीज फुलते, डवरते. खलनायक प्रेम चोप्रा त्यांच्या मीलनात अडथळा बनतो, मजबुरी निर्माण करून नूतनला आपल्याशीच विवाह करावा लागेल अशी परिस्थिती निर्माण करतो. पण प्रत्येक वेळी प्राण (या चित्रपटात तो नूतनचा सद्प्रवृत्त बनलेला मामाजी आहे) येऊन त्यांना वाचवितो. अगदी शेवटच्या क्षणीही.

या चित्रपटाचे सरळ सरळ दोन भाग आहेत. पहिल्या भागात मनोज साऱ्या समाजात आपल्या आदर्शांचा फैलाव करीत फिरत असतो. यासाठी त्याने एक पोल खोल मंडळी खोललेली असते. ही खट्याळ तरुण मंडळी समाजातील प्रतिष्ठितांची (भेसळ करणारे बडे व्यापारी, बेपर्वा डॉक्टर, आप्पलपोटे पुढारी वगैरे) लफडी बाहेर काढतात. यासाठी त्यांचे साधन असते मनोजची एकतारी. तो आहे सिद्धहस्त शीघ्रकवी. त्यामुळे तो झपाझप कवने रचतो आणि ही मंडळी प्रतिष्ठितांच्या घरासमोर जाऊन त्यांचे सामुदायिक गान करतात, तर चित्रपटाच्या मध्यापर्यंत मनोज एकतारीवरून म्हटलेल्या भजनातून अनेक सामाजिक प्रश्न उभे करतो.

आणि मग उत्तरार्धात विशिष्ट परिस्थितीत मनोजविरुद्ध महाराजांचा पुत्र या सत्प्रवृत्त विरुद्ध खलप्रवृत्त अशा संघर्षामध्ये मनोजचा विजय होतो असे दाखवून सद्हेतूंची भलावण केली आहे. या रचनेच्या दृष्टीने चित्रपट एकाद्या कीर्तनासारखा वाटतो. मात्र या कीर्तनात रंग कधीच भरत नाही. तो सर्वसाधारण प्रचारपट वाटतो. त्यातील काळी बाजू ही अगदी काळीकुट्ट आहे व पांढरी बाजू श्वेतधवल आहे.

## प्रचारी–पट

'यादगार'ची कथा मनोजकुमारची आहे. 'शहीद' या देशभक्तीपर चित्रपटापासून मनोजकुमारने वेगवेगळ्या बॅनरखाली पण स्वतःचे असे एक युनिट प्रस्थापित केले आहे. त्याच्या चित्रपटांचे स्वरूप सर्वसाधारण असेच प्रचारी (उदा. उपकार) असते. करमणूक कर सहजपणे माफ होऊन जावा अशीच त्यांची आखणी असते. 'यादगार' याच पठडीतला आहे. 'शहीद'नंतर या चित्रपटामधील प्रचार अधिकाधिक ढोबळ बनू लागला आहे व 'यादगार'ने या ढोबळपणाचो कमाल गाठली आहे. माणसाची विकृती काय किंवा सुकृती काय अगदी वीट यावा इतक्या भडक रंगांनी रंगविलेली आहे.

या चित्रपटातील आवर्जून उल्लेख करावा असा भाग म्हणजे नूतनची प्रेक्षणीय भूमिका. मध्यंतरी 'मा', 'भाभी' वगैरे भूमिकांच्या तडाख्यात सापडलेली नूतन या चित्रपटात मनोजकुमारची प्रेयसी, त्याच्या थोर कार्यामधील त्याची साथीदार बनली आहे. या उदात्त नायकाची सहचरी एवढेच तिचे या चित्रपटातील कार्य आहे. आणि त्या दृष्टीने तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नाही. तथापि आपल्या या मर्यादित भूमिकेमध्ये काही ठिकाणी तिने दाखविलेला भावाविष्कार अविस्मरणीय आहे. प्रेमाचा तिला पहिला साक्षात्कार होतो तेव्हा झालेला तिचा कावराबावरा, आरक्त चेहरा कायमचा मनावर कोरून राहील. तिच्या नुसत्या निखळ हास्याने कितीतरी प्रसंग जिवंत होऊन जातात.

पण तिच्या या प्रत्ययकारी अभिनयाला दुर्दैवाने मर्यादा आणल्या आहेत त्या दिग्दर्शक एस. राम शर्मा यांच्या प्रसंगांच्या चित्रीकरणाच्या पद्धतींनी. वर उल्लेखिलेला प्रेमाच्या पहिल्या साक्षात्काराचा प्रसंग घ्या. काही निमित्ताने मनोजची व

नूतनची एका खेड्यात एका घरी गाठ पडते. रात्र त्यांना तेथेच काढावी लागते. बोलता-बोलता हळूहळू मने एकमेकांच्या जवळ येत असतात. यातूनच खरे तर त्यांचे प्रेम प्रतिकात्मक रीत्या प्रकट करता आले असते पण मध्येच तो खेडूत येतो व त्यांच्या दोघांच्या हृदयाचा मार्ग एकच आहे असे काहीतरी बेढब वाक्य बोलतो व निघून जातो. मनोमीलनाची जाणीव झाल्याने दोघांच्याही चेहऱ्यावर एक वेगळीच उत्कटता येते व झोपायला जायची वेळ येते. नेहमीप्रमाणे नूतन आतल्या खोलीत झोपायला जाते. मनोज बाहेरच कॉटवर पडतो. झोप न येणे स्वाभाविकच. नूतन अस्वस्थपणे बिछान्यावर पडलेली असते. एवढ्यात मनोज बाहेर एकतारी वाजवायला लागतो. वास्तविक यावेळीच एकतारीवरील संगीत अधिक परिणामकारक करून प्रसंगाचा प्रभाव वाढविता आला असता. पण नूतन उठून बाहेर येते व काहीतरी बोलून आपली अस्वस्थता प्रकट करते. सुदैव असे की त्या ठिकाणी गाणं नाही. असे आणखी कितीतरी प्रसंग देता येतील. राम शर्मा यांनी अत्यंत सरधोपटपण, दिग्दर्शनाचे जराही बारकावे न जाणता या चित्रपटाचे चित्रीकरण केले आहे.

साऱ्या चित्रपटाची मदार मनोजवर आहे, पण तो तर गांभीर्याचा मुखवटा घालून साऱ्या चित्रपटभर वावरत असतो. त्याच्या भावदर्शनात गांभीर्य हा एकमेव भाव आहे. पोल खोल मंडळींच्या एखाद्या खटयाळ कृत्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर जाता जाता पुसटसे मिस्कील हास्य दिसते तेव्हा त्याचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न वाटते. नाहीतर हा आपला गांभीर्याचाच पुतळा.

या चित्रपटातील प्राणची भूमिका वैशिष्ट्यपूर्ण आहे. नूतनचा हितकर्ता म्हणून वावरताना तो पूर्ण सद्गृहस्थ वाटतो. प्रेम चोप्रा, तिवारी, कामिनी कौशल आपआपली कामे निभावून नेतात.

या चित्रपटातील पोल खोल मंडळींना खरे कार्य हिंदी चित्रपटाच्या संगीत क्षेत्रात सध्या आहे. कल्याणजी आनंदजी यांच्या संगीतचोरीचे लफडे त्यांनी खरं तर बाहेर काढले पाहिजे. चित्रपट-संगीताचा जाणीवपूर्वक अभ्यास करणारा प्रेक्षक या चित्रपटामधील गाण्यांची प्रत्येक ओळीची चाल व वाद्यांची प्रत्येक सुरावट पूर्वी (म्हणजे फार पूर्वी पण नव्हे हं, अगदी उपकार, सरस्वतीचंद्र वगैरेंसारख्या) चित्रपटांतून कशी वापरलेली आहे ते सांगू शकेल. आपल्या कानांना जाणवत रहातो तो चालीचा व सुरांचा परिचय.

उद्बोधनासाठी चित्रपटकला राबविण्याला काहीच हरकत नाही. पण त्यासाठी कलात्मकता हरवूनच टाकली पाहिजे का ? मनोजकुमारचे युनिट 'शहीद' सारखे चित्रपट निर्माण करीत राहिले तर त्यांचे स्वागतच होईल.

— मुंबईकर


 पृष्ठ १६ वरून

मुंबईत नोकरी करीत असता इतरही उद्योग करीत असत. मृत्यूसमयी त्यांचे पांडु-रंग अँड कंपनी नावाचे कापडाचे दुकान होते. त्याकडे कोणीतरी लक्ष देणे आवश्यक होते. वडिलांनी दोन्ही ठिकाणी लक्ष देणे नायम्पल्लीना आवडेना. शिवाय ह्या दोघांनाही आपापल्या भावाला ह्या व्यवसायात गुंतवायचे होते. यातून भागीदारी सुटली.

ही भागीदारी सुटल्यानंतर वडिलांनी कापड दुकानात गुंतणे क्रमप्राप्त होते. तसे झाले असते तर मी आज कदाचित मुळजी जेठा मार्केटमध्ये जाऊन बसलो असतो. पण तो उद्योग चालू न करता त्यांनी स्वतःचे पुस्तकांचे दुकान चालू केले. हा निर्णय त्यांनी का घेतला असावा याचे उत्तर शोधण्याचा मी प्रयत्न करतो. पण नक्की उत्तर सापडत नाही. त्यांना तोपर्यंत पुस्तक व्यवसायाचा बराच अनुभव होता हे खरे. पण इतर उद्योग वर्ज नव्हते. त्यावेळी त्यांच्यासमोर जे वेगवेगळे मार्ग होते त्याविषयी त्यांनी काय कोष्टक मांडले असेल, प्रत्येक सूचनेच्या बाजूने आणि त्याविरुद्ध कोणते मुद्दे विचारात घेतले असतील त्यासंबंधी तर्क करतो. मग हळूहळू लक्षात येते की ह्याच निर्णयात काय पण पुढील सर्व आयुष्यात असा पुस्तकी विचार त्यांनी कधी केलेलाच नाही. त्यांनी पुढील सर्व आयुष्य पुस्तक व्यवसायात काढले; पण शिकले ते पुस्तकातून नव्हे तर व्यवहारातून. गंमत म्हणून मग त्यांच्या आणि माझ्या दृष्टिकोनातील आणि वागण्यातील फरक माझ्या लक्षात येऊ लागतो. मी कोणतीही गोष्ट शिकायची म्हटली की पुस्तकापासून सुरुवात करतो. परवा मुलांना पोहायला शिकवायचे ठरवले तर मी प्रथम 'हाऊ टू स्विम' पुस्तक आणले. त्यानंतर चारसहा महिने प्रत्यक्ष पाण्यात उडी टाकलीच नाही. माझे म्हणणे जेव्हा काही मी पोहणे शिकेन–शिकवेन तेव्हा अगदी व्यवस्थित, पद्धतशीर, फ्रीस्टाईल, ब्रेस्ट स्ट्रोक, बटरफ्लाय स्ट्रोक असे शिकेन. वडिलांनी ठरवायच्या आत धोतराचा काचा मारून पाण्यात उडी मारली असणार.

धंद्यातही तशीच. १९१४ साली त्यांनी पॉप्युलर बुक डेपोची सुरुवात केली. ती का व कशी केली याचा विचार करायला त्यांना अजूनही वेळ नाही. इतकी कामे पडली आहेत अशा वेळी विचार कोण करणार?

वडिलांच्या मामांचे घर म्हणजे एक प्रकारे धर्मशाळाच होती. गावाहून आलेली अनेक मुले तिथे राहत असत. यापैकी दोघे–शांताराम शिरूर आणि शांताराम सम्प्रोडी हे लगेच वडिलांना येऊन मिळाले. धंदा हां हां म्हणता वाढू लागला आणि चारएक वर्षांतच मूळ नाना चौकातील दुकान लॅमिंग्टन रोडवर हातपाय पसरू लागले. आम्ही आमच्या भाबड्या पुस्तकी पद्धतीने वडिलांना विचारतो, 'तुम्ही



सर स्टॅनले अन्‌विन यांची पॉप्युलर भेट । १९४८

सुरुवातीला कोणत्या प्रकारची पुस्तके विकत होता आणि ती कोणत्या पद्धतीनें विकत होता ?' त्यांना पुस्तके विकणे तेवढे माहीत. त्यासाठी ते काय हवे ते करीत. मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी बहुतेक हॉस्टेलमध्ये राहत. तेथे जाऊन त्यांना पुस्तके विकण्यात यायची. आजचे जवळजवळ सर्व मोठे डॉक्टर हे त्यावेळचे विद्यार्थी. वडिलांनी आणून दिलेल्या पुस्तकांवर शिकलेले. एका बाजूने ही जाडजूड मेडिकल पुस्तके विकायची तर समोरच वडिलांची जुनी शाळा टयुटोरियल हायस्कूल होती तिथे स्टोर्स उघडून शाळेची पुस्तके, वह्या स्टेशनरी यांचा उद्योगही करायचा. तिसरी एक कल्पना मंगेशरावांच्या कर्नाटक पूर्वकाळातून घेतलेली. ती म्हणजे मुंबईबाहेरील छोटया गावात जी मुले वसतिगृहात राहात त्यांना पुस्तके पुरवायची. त्यांनी केला नाही असा उद्योग नाही.

त्यांनी जुनी भागिदारी सोडून नवीन धंदा सुरू केला त्याकाळची एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. त्यांचे नवे दुकान हे जुन्या दुकानच्या बाजूलाच सुरू झाले. साहजिकच थोडया फार प्रमाणात दोहोंत स्पर्धा राहणारच. जुने भागीदार त्यामुळे नाराज असत. त्यावेळी काही लहानसहान भांडणेही होत. वडिलांचे

एक नातेवाईक जुन्या दुकानात काम करत. त्यांच्यावर मुद्दाम आळ आणून त्यांना तुरुंगातही पाठवण्यात आले होते. वडिलांनी त्यांना सोडवून आणून आपल्या नव्या धंद्यात गुंतवले. पण मुख्य म्हणजे त्यांनी वर्षा दोन वर्षांतच नायम्पल्लींना दाखवून दिले की ह्या काळात दोघांचाही धंदा वाढला आहे. आपल्या करीयरच्या सुरुवातीलाच हा जो धडा ते शिकले त्याचा त्यांच्या आणि पॉप्युलरमधील सर्वांवर फार मोठा परिणाम झालेला आहे. आम्ही कोणी स्पर्धेला घाबरत नाही, उलट स्पर्धा ही पथ्यकारक मानतो. स्पर्धकाचे नुकसान झाले तर आम्हांला वाईट तर वाटतेच पण काही प्रमाणात भीतीही वाटते. अर्थात वडिलांनी ह्या अनुभवातून काही तत्त्व मांडण्याचा कधी प्रयत्न केला नाही. ते वृत्तीनेच तसे वागतात. आम्ही आमच्या विचारपद्धतीप्रमाणे त्यातून तत्त्वमीमांसा मांडतो की एकंदर व्यवसायाची उन्नती झाली की त्यातील प्रत्येक घटकाला त्याचा फायदा मिळतो आणि एकादा घटक जरी नुकसानीत आला तर त्याचा एकंदर व्यवसायावर परिणाम होतो.

१९२४ ते १९४४ ह्या वीस वर्षांच्या काळात वडिलांनी दुकानाचा व्याप खूपच वाढविला. पण धंद्याची खरी वाढ झाली ती दुसऱ्या महायुद्धाच्या काळात. एकंदर युद्धकालीन 'सुबत्ते'चा फायदा तर मिळालाच पण प्रत्यक्ष सैन्यासाठी सुद्धा पुष्कळ खरेदी व्हायची. एक मोठी इंग्लिश कंपनी 'कॉलिन्स' यांच्या हिंदुस्थानातील विक्रीची व्यवस्था पॉप्युलरकडेच होती.

ह्या वीस वर्षांच्या काळात वडिलांनी पुष्कळ पुस्तके प्रसिद्ध केली. पण ते वृत्तीने प्रकाशक नव्हते. त्यांनी पुस्तकविक्रीचा कोणताच प्रकार वर्ज्य मानला नाही. प्रकाशन हा त्यातीलच एक भाग. हे काऊंटरवर उभे असताना कोणी लेखक यायचा आणि काही सांगायचा. काही पुस्तके वडिलांनी स्वतःच्या खर्चाने काढली. काही लेखकांच्या. त्यातील पहिले पुस्तक कोणते याचा शोध घेणे कठीणच. पण आतापर्यंत केलेल्या संशोधनावरून सापडलेले पहिले पुस्तक १९२९ साली छापलेले 'क्रिस्टलायझ्ड थेरापी—अ हँडबुक फॉर स्टुडंटस् अँड प्रॅक्टिशनर्स' हे त्यावेळचे एक यशस्वी डॉक्टर परुळेकर यांनी लिहिलेले आणि त्याला डॉक्टर भडकमकरांची प्रस्तावना होती. पुस्तक चांगले जाडजूड सव्वाचारशे पानांचे. पुस्तकाच्या शेवटी काही जाहिराती छापलेल्या. पुस्तक छापले होते गंभीरांनी. त्यावेळी त्यांच्या पॉप्युलर प्रेसची सुरुवात झालेली नव्हती. परंतु पुढे अनेक वर्षे दृढतर होत गेलेले वडिलांचे आणि त्यांचे संबंध इतके जुने.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती एका वर्षात संपली. पण दुसरी आवृत्ती पॉप्युलरने काढली नाही. 'का ?' वडील काही उत्तर देऊ शकले नाहीत. पण सहज म्हणाले की दुसरी आवृत्ती दुसऱ्या एका प्रकाशकाने काढली आणि ती संपायला दहा वर्षे लागली.

ह्या काळात त्यांनी छापलेल्या पुस्तकात सर्व तऱ्हेची पुस्तके आहेत. शास्त्रीय

पुस्तके आहेत तशीच धार्मिक आहेत. मी म्हणेन अशास्त्रीय अशीसुद्धा आहेत. यशस्वी आहेत आणि अयशस्वी आहेत. काही इतकी चांगली की आज दोन-तीन दशकांनंतर अजूनही चालू आहेत. उदाहरणार्थ नाडकर्णी आणि कोठारे यांची 'ऑर्गॅनिक केमिस्ट्री.' तर काही यशस्वी असूनही वाईट पुस्तके होती. माझ्या हाती सत्ता आल्यानंतर मीही मुद्दाम आमच्या यादीतून ती वगळून टाकली. आज आम्ही प्रकाशनविभाग खूपच पद्धतशीररीत्या चालविण्याचा प्रयत्न करतो. हस्तलिखित स्वीकारण्याआधी त्याची चिकित्सा करतो. त्याला येणारा खर्च, त्याला मिळू शकणारे मार्केट याचे गणित मांडतो. वडिलांनी यापैकी काहीच केले नाही. लेखक आणि मुद्रक परस्पर पुस्तके तयार करायचे आणि ज्यांना जसे हवे तसे पैसे वडील द्यायचे. मी एकदा असाच त्यांनी छापलेली पुस्तके घेऊन बसलो आणि त्यापैकी यशस्वी किती आणि अयशस्वी किती यांचे गणित मांडू लागलो. मी झटकन हा हिशेब आवरला. टक्केवारीने पाहता पारडे त्या काळाकडेच अधिक झुकण्याची शक्यता दिसू लागली.

४५–४६ च्या सुमारास माझा मोठा भाऊ सदानंद आपले शिक्षण संपवून वडिलांना धंद्यात मदत करू लागला. त्याने दोन प्रश्न निर्माण करून ठेवले. एकतर नवीन पिढी आणि जुनी यांचे संघर्ष निर्माण होऊ लागले. वडिलांच्या बरोबरीने १५–२० वर्षे काम केलेले काही जुने सहकारी सिनियॉरिटीच्या अधिकाराने वागायचे तर अंशत: शिक्षणामुळे आणि अंशत: वारसाहक्कामुळे सदानंद आपला हट्ट सोडायचा नाही. पण एकत्र कुटुंबात कर्ता पुरुष ज्या हिकमतीने राज्य चालवितो त्याच पद्धतीने वडिलांनी हे गुंते सोडविले आणि अजूनही सोडवीत असतात.

दुसरी समस्या फार वेगळ्या प्रकारची होती. सदानंदची पिढी ही बेचाळीसच्या वातावरणाने भारलेली. तो आणि त्याचे मित्र यांनी जे अनेक संकल्प सोडले त्यापैकी एक आंतरजातीय विवाहासंबंधीचा. त्यांनी वडिलांना आपली भूमिका समजावून दिली की मला अमूक मुलीशी लग्न करायचे आहे असे नाही, पण तत्त्व म्हणून मुलगी अन्य जातीची निदान सारस्वतांपैकी दुसऱ्या उपशाखेतील असावी. वडिलांचा तात्त्विक विरोध असायचे कारण नव्हते. पण त्यांनी ठरविले की आपला धंदा जर कुटुंबपद्धतीने चालणार असेल तर कुटुंबाला फाटे फुटता कामा नयेत. त्यांनी सदानंदला सांगितले की, 'तू जर असे काही करणार असशील तर माझी हरकत नाही, पण मग मी धंद्याची काही दुसरी व्यवस्था करतो.'

मोठ्या कुटुंबातील मोठ्या मुलाला नेहमी शहाण्यासारखे वागावे लागते. त्याचप्रमाणे तो वागला. धंदा पुढे चालू राहिला. पण स्वातंत्र्योत्तर काळात धंद्याचे स्वरूप बदलायला लागले काहीसे बदलत्या परिस्थितीमुळे आणि बरेचसे सदानंदच्या आणि पुढे माझ्या वेगळ्या कार्यपद्धतीमुळे. हे बदल होत गेले ते संघर्षाशिवाय नव्हे. पण त्याला भांडणतंट्याचे स्वरूप कधी आले नाही. अनेकजण

आम्हाला म्हणतात, 'तुम्हाला काय, सगळं वडिलांनी करून ठेवलंय' अनेकजण वडिलांना सांगतात, 'तुमचं बरंय्, मुलं धंद्यात नीट लक्ष घालतात.' ते आणि आम्ही दोघंही माना डोलवितो. पण खरं तर आमचे काही त्यांना पटत नाही आणि त्यांचे विचार आम्हाला रुचत नाहीत. हा फरक निव्वळ दोन पिढ्यातील नाही तर दोन वृत्तींतील आहे. आणि तरीही त्यांच्या कर्तृत्वाची आम्हाला जाण आहे आणि आमच्यावर त्यांचा विश्वास आहे.

त्यांच्या आणि आमच्या वृत्तीतील फरक जेव्हा मी लक्षात घेऊ लागतो तेव्हा पहिली गोष्ट जाणवते ती ही त्यांनी कोणतीच गोष्ट तत्त्व म्हणून टोकाला नेली नाही. तत्त्वासंबंधीचा काथ्याकूट करण्यास त्यांना वेळ नव्हता. त्यांच्या जीवनातली तत्त्वनिष्ठा आढळते ती केवळ त्यांनी जीवनाचे स्वतःवर जे संस्कार करून घेतले त्यामुळे. एक लाचलुचपतीचेच उदाहरण घ्या. वडिलांनी हा धंदा एवढा वाढविला तो सचोटीने याची ग्वाही आम्हाला भेटणारा प्रत्येकजण देतो. आम्ही हा कित्ता गिरविण्यासाठी त्याचे तत्त्व बनवितो आणि मग इन्कमटॅक्स ऑफिसरच्या शिपायाला बक्षिस देतानादेखील दहादा विचार करतो. मला वाटते वडिलांनी त्यांच्या जमान्यात आनंदाने बक्षिशी दिली असणार. आम्ही धंद्याची पद्धतशीर विभागणी करताना पुस्तकविक्रेत्याने कसे वागावे, होलसेलरने कोणते नियम पाळावेत इत्यादींसंबंधी घोळ घालत बसतो. वडिलांनी सगळ्या तऱ्हेची विक्री केली आणि तरी कुणाला दुखावले नाही. ते आपल्या गिऱ्हाईकांसाठी कोणकोणती कामे स्वीकारत याला काही मर्यादा नव्हती. पूर्वी मॅट्रीकचा निकाल मुंबईत प्रसिद्ध होत असे आणि लांबलांबच्या गावात तो पोचायला एखाद दुसरा दिवस लागायचा. आमचे वडील त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर पाचपंचवीस शाळांच्या विद्यार्थ्यांचे निकाल काढून तारेने पाठवीत. त्यात थोडीफार कमाईही होई आणि अनेकजण बांधले जात. ज्या एका निकोप अशा व्यवहारचतुर वृत्तीने ते व्यवसायात वागले त्याच वृत्तीने खाजगी जीवनात. त्यांनी आपल्या मुलाच्या आंतरजातीय विवाहाला विरोध केला तो तत्त्वासाठी नव्हे तर जगरहाटी लक्षात घेऊन. कुटुंब आणि धंदा यांचे संबंध राहायचे असतील तर ते एक आवश्यक असे पथ्य आहे असे वाटल्याने. त्यांनी स्वतः आपल्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह १९३०–३२ च्या सुमारास लावून दिला आणि आप्तांपैकी अनेकांनी आंतरजातीय विवाह त्यांच्या संमतीने आणि मदतीने केले आहेत. त्यांनी पुढे माझ्या विवाहाला मुळीच हरकत घेतली नाही. मला वाटतं की आपल्या मुलाने तत्त्व म्हणून आंतरजातीय विवाह करणे हे त्यांना मानवले नसावे. एखाद्या आवडीच्या मुलीशी लग्न करायला कदाचित त्यांनी विरोध केला नसता.

त्यांची वागण्याची पद्धत आणि आमची यात तापदायक फरक आहे. आमच्याकडे नोकरीसाठी माणूस आला की आम्ही त्याला अर्ज लिहायला सांगू. तुला अमुक



मेडिकल डिपार्टमेंटचे उद्घाटन : डॉ. गिल्डर । १९५१

अमुक पात्रता नाही तेव्हा आपले जमायचे नाही असे सांगू. ते स्वत: त्याला विचारून त्याच्याविषयी टिपण करतात. त्यात त्याच्या पात्रतेबरोबरच त्याच्या कुटुंबातील मंडळींची, त्याच्या अडचणींची चौकशी होते. मग ते त्याला काम शिकवायला लागतात.विशेषत: आता निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या घरी शाळाच चालू असते. ह्या शाळामास्तराच्या तडाख्यात जे टिकून राहतात ते खूपवेळ संस्थेत चिकटतात. अनेक इथे अनुभव घेऊन पुढे इतरत्र मान्यतेला पावतात. ते सगळे गणपतरावांचे ऋण मान्य करतात.

आम्ही लेखकांना मानतो. त्यांच्या विद्वतेची-प्रतिभेची जाण आहे असे आम्हाला वाटते. पण व्यवहाराची अनेक बंधने पाळली पाहिजेत असा आमचा - प्रयत्न चालू असतो. आमच्या वडिलांनी ह्या लेखक मंडळींना घरच्या माणसांसारखे वागविले, त्यांचे लाड केले. मध्यंतरी एक लेखक माझ्यावर रागावले. त्यांच्या पुस्तकाच्या सहासात आवृत्त्या वडिलांनी काढल्या. मी ते काम पाहू लागलो आणि काही बेबनाव निर्माण झाले. प्रोफेसर नाडकर्णी मला म्हणाले, ' तू असा वागणार असशील तर मी पुस्तक तुला छापायला देणार नाही. पण तुझ्या वडिलांनी आमच्यासाठी जे

काही केलं आहे त्यामुळे मी ते इतर कोणालाही देणार नाही. पुस्तक पडून राहिलं तरी चालेल.' सुदैवाने मीही त्या पुस्तकाच्या पाच-सहा आवृत्त्या काढल्या आहेत. पण पुण्याई कुणाची कुणास ठाऊक ?

दुसरा एक वडिलांचा वृत्तिविशेष म्हणजे त्यांची कामाविषयीची एकाग्रता. त्यांनी कामाशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही. अगदी सुरुवातीलाच ते न्यूसारख्या थोर विद्वानाच्या सहवासात होते. पुढे कर्नाटक प्रेसमध्ये काही दिवस नोकरी करताना त्यांची जयकरांची रोज भेट होत असे. पुढे पॉप्युलरच्या गिऱ्हाईकां-मध्ये आंबेडकरांसारख्या अनेक थोर पुरुषांचा समावेश होता. परंतु या सर्वांचे मोठे-पण मान्य करूनही ते या गोष्टींनी भारावून गेले नाहीत. त्यांचे लक्ष स्वतःच्या कामावरच. महात्मा गांधी ज्या काळात मणि भुवनमध्ये उतरायचे त्यावेळी माझे आई-वडील त्यांच्या शेजारच्या वायडा विलामध्ये राहात. मी वडिलांना गांधीसंबं-धींच्या आठवणी विचारू लागलो. पण ते सकाळी ८ ते रात्री १२ दुकानात. काही वेळा राहायचेही तिथेच. तेव्हा गांधीजींच्या प्रार्थना आणि भजने तिथे होत 'असावीत' हीच त्यांची आठवण. 'गांधीजींच्या सहवासात एक आठवडा' हे लुई फिशरचे पुस्तक वडिलांनी प्रसिद्ध केले. अनुवादक सत्यबोध हुदलीकर यांनी ते मुंबईत गांधीजींना प्रत्यक्ष दिले. वडिलांना तिथे जायला वेळ नव्हता कारण काऊंटरवर संध्याकाळी गर्दी असते. आम्ही पुस्तके भेट देण्याच्या निमित्ताने दिल्लीची सफर करून येतो.

काही वर्षांपूर्वी वडिलांसंबंधी एक लेख लिहिताना त्यांचे एक चाहते लिहितात की गणपतराव पुस्तकप्रेमी असून त्यांनी खूप वाचन केले आहे. पण खरे सांगायचे तर त्यांनी एकदा व्यवसायाला सुरुवात केल्यापासून फक्त एकच पुस्तक वाचले आहे आणि ते कोणतं ते त्यांना आठवत नाही.

द्रौपदी स्वयंवराच्या वेळी अर्जुनाला फक्त माशाचा डोळाच दिसत होता या कथेवर माझा विश्वास बसत नव्हता. निदान त्याचा द्रौपदीवर तरी डोळा होता की नाही असा एक खोडकर विचार मनात येऊन जायचा. पण वडिलांचे आयुष्य पाहिले की पटू लागते. धंद्याचे जे एक उघड उद्दिष्ट—पैसा—त्याकडेसुद्धा दुर्लक्ष करून केवळ आपण आणि आपले काम या वृत्तीने पन्नास वर्षे काढणे हे खरोखरीच कठीण काम.

अशा वडिलांचे पुत्रत्व पत्करणे हे सोपे नाही. त्यांच्याशी तुलना तर सारखी होत असतेच. त्यांच्या मोठेपणाच्या सावलीत सारखे रहावे लागते. अनेक वेळा याचा उबग येतो. त्यांच्या अनेक गोष्टी आपल्याला आवडत नाहीत—पटत नाहीत. त्यांना जसे आपली मुले आपले नाव सांभाळणार की नाही याची काळजी वाटते तसे आम्हाला अनेक वेळा त्यांचा चांगुलपणा निस्तरावा लागतो याबद्दल त्रास वाटतो. आपण आपले असे वेगळे कर्तृत्व दाखवावे असा मोह पडतो. त्यांनी दिलेले इशारे जुनाटपणाचे लक्षण वाटते. त्यांचा एक नियम सगळ्यात जाचक वाटतो तो हा की जे कोणी त्यांच्या जवळचे त्यांनी निःसंगपणे, निःस्वार्थीपणे

वागावे अशी त्यांची अपेक्षा असते. परक्यांच्या सुखसोयीसाठी ते काय काय करतील यासंबंधीच्या खऱ्या गोष्टी दंतकथा वाटतील. नऊ वर्षांपूर्वी मी सपत्नीक इंग्लंडला गेलो त्यावेळी त्यांनी कोणा सोम्यागोम्याला आमच्या घरी राहायची परवानगी दिली. आम्ही परतताना तो निघेना. तेव्हा त्यांनी त्याला दुसरे घर मिळवून दिले. त्या घराचे पैसे त्याला भरता येईनात म्हणून कर्ज मिळवून दिले. कर्ज भरता येईना म्हणून त्याचे काही हप्ते वडिलांनी भरले. तोपर्यंत जे भाडे भरायचे तेही वडिलांनीच भरले. हा प्रकार आठ नऊ वर्षे चालू आहे असे पाहून आम्ही त्यांना म्हटले की, 'मला आणखी एक ब्लॉक हवा आहे. गेले ते पैसे गेले. आता तरी त्याला जायला सांगा. तुम्हाला जमत नसेल तर मी सांगतो.' वडील म्हणतात, 'तू म्हणतोस ते मला पटतं. पण मी जसा गेल्या पन्नाससाठ वर्षांत वागलो नाही तसा आता वागू का?' मग आम्ही गप्प बसतो. आम्ही आमच्या परीने मोठे होऊ असा विश्वास वाटूनही लक्षात येते की आम्हाला त्यांच्यासारखे मोठं होता येणार नाही.

□ □ □

---

## दिल्ली दरबार...

पृष्ठ ६ वरून

एवढी धमक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसनेही दाखवलेली नाही. गेल्या दहा वर्षांत या प्रश्नाबाबत वाटाघाटींचा किती घोळ घातला गेला हे पाहिले म्हणजे कोणताही प्रश्न न्याय्य तत्त्वांच्या आधारे सोडवायला केंद्र सरकार उत्सुक नसते असेच दिसून येईल.

परंतु ही साधी गोष्ट आपल्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला उमजून यायला दहा वर्षांचा काळ लागला. आता प्रदेशाध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील म्हणू लागले आहेत का हा प्रश्न सोडविण्याची केंद्र सरकारची इच्छा नाही अशी आपली खात्री पटली असून प्रत्यक्ष कृतीचा मार्ग चोखाळायला हवा आणि प्रत्यक्ष कृतीची दिशा ठरविण्यासाठी त्यांनी गेल्या शनिवारी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक बोलावलेली आहे. परंतु या बैठकीत प्रत्यक्ष कृतीसंबंधी निश्चित स्वरूपाचा निर्णय होईल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे. श्री. यशवंतराव चव्हाण तर अगोदर-पासूनच 'जरा सबुरीने घ्या' असा सल्ला देऊ लागले आहेत. म्हणजे भाषा युद्धाची आणि तयारी तहाची असाच एकंदर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा पवित्रा दिसत आहे.

सीमा भागातील मराठी भाषिक जनतेबद्दल महाराष्ट्रातील काँग्रेस-नेत्यांना जर खरोखरच जिव्हाळा वाटत असेल, त्या जनतेच्या हालअपेष्टांनी त्यांची अंतःकरणे जर व्यथित झाली असतील तर सर्वमान्य तत्त्वांच्या आधारे विशिष्ट मुदतीत हा

प्रश्न सोडविण्याचे केंद्र सरकारकडून आश्वासन मिळेपर्यंत केंद्र सरकारशी असहकार करण्याची तडफ त्यांनी दाखवायला हवी. राजकारणामध्ये न्याय मागून मिळत नाही, आपल्या सामर्थ्याच्या बळावर तो मिळवावा लागतो हे यशवंतराव चव्हाणां सारख्या मुरब्बी मुत्सद्याला माहीत नाही असे कसे म्हणता येईल ? हे सामर्थ्य केवळ सत्तेवर राहूनच प्राप्त होते असे मात्र नाही. कधीकधी सत्तापद सोडून लोकांच्या बाजूने उभे राहण्याचीही धमक दाखवावी लागते. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणी-संबंधी पं. नेहरूंच्या मनात आकस आहे असे आढळून येताच श्री. चिंतामणराव देशमुखांसारख्या सत्वशील माणसाने अर्थमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्या राजीनाम्याने ताबडतोब काही साधले असे नाही. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला जी काही कारणे झाली त्यामध्ये या राजीनाम्याला नक्कीच महत्त्व आहे.

योगायोगाची गोष्ट अशी आहे की आज सीमा-प्रश्न विकोपाला गेलेला असताना आणि तो सोडविण्याची केंद्र सरकारची इच्छा नाही अशी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षांची खात्री झालेली असताना केंद्रीय अर्थमंत्रिपदावर चव्हाणांसारखी मातबर महाराष्ट्रीय व्यक्ती विराजमान झालेली आहे. मधल्या काही घटनांमुळे श्री. चव्हाण यांचे केंद्रीय राजकारणातील महत्त्व बरेचसे ओसरले असले तरी महाराष्ट्रातील काँग्रेस संघटना त्यांच्या एकट्याच्याच इशाऱ्यावर नाचत असते हे प्रधानमंत्र्यांना ठाऊक आहे, आपल्या या सामर्थ्याचा उपयोग श्री. चव्हाण सीमा-प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या कामी करतात की ज्याप्रमाणे श्री. संजीव रेड्डी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीमध्ये पराभूत होताच सिंडिकेटच्या तंबूतून बाहेर पडून इंडिकेटच्या छावणीत लगबगीने दाखल होण्याची त्यांनी जी सोयीस्कर चतुराई दाखविली तशी यावेळीही चतुराई दाखवून 'सीमा-प्रश्नापेक्षा इंदिरा गांधी मोठ्या आहेत' असा पुकारा करतात यावरच महाराष्ट्र काँग्रेसची तथाकथित कृती अवलंबून आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला तशी कृती करता येणार नसेल तर तिने दिल्ली-श्रेष्ठांच्या मेहेरबानीवर अवलंबून राहण्याची आपली आतापर्यंतची परंपरा बेलाशक चालू ठेवावी; पण त्याबरोबरच सीमा-भागातील जनतेची क्रूर फसवणूक करण्याची आपली सवयही सोडून द्यावी. जे आपल्याला जमत नाही ते 'जमत नाही' अशी कबुली देण्याचा प्रामाणिकपणा जरा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने आणि तिच्या सूत्र-धारांनी दाखविला तरीदेखील खूप झाले असेच म्हणावे लागेल. सीमाभागातील जनतेलाही त्यामुळे सिंह कोण आणि सिंहाचे कातडे पांघरणारे कोण याचाही कायमचा उलगडा होईल.

— सदाशिव पेठकर

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर




" कोण म्हणतो आम्हाला लेखनस्वातंत्र्य मान्य नाही ? पण कोणीही येऊन मन मानेल तसं लिहायचं म्हणजे काय ? ..."